खाडिलकरांची

# ॐकाराची उपासना

लेखक

श्री. कृ. प्र. खाडिलकर

किंमत १ रुपया.

॥ श्री ॥

# खाडिलकरांची
# ॐकाराची उपासना

लेखक

**श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर**

मुद्रक व प्रकाशक

श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर

श्रीदत्तात्रय प्रिंटिंग प्रेस. १३ शेणवीवाडी, कांदेवाडी, मुंबई नं. ४.

सन १९४४

किंमत १ रुपया.

# प्रस्तावना

ॐकाराची उपासना ही बालपणची सहज अवस्था आहे; प्रौढपणीं विवेकें यत्न करून हिची वाढ करावी लागते; आणि परिणत स्थितींत ही जीवन्मुक्ततेचा व मोक्षाचा मार्ग खुला करिते. ह्या ग्रन्थांत ह्या उपासनेचा उहापोह आहे. त्याला दशोपनिषदांचा आधार आहे. दशोपनिषदांमध्यें ह्या उपासनेला वाहिलेल्या 'मंडूक' उपनिषदाचा आधार मुख्य आहे. छांदोग्यांतहि उद्गीथाचें वर्णन करतांना ह्या विषयाचा बराच उहापोह केलेला आहे. बृहदारण्यकांतहि उद्गीथाचें वर्णन आहे. प्रश्नोपनिषदांतील एक प्रश्न ह्या उपासनेनें अडविला आहे. तैत्तिरीय उपनिषदांत अवांतर माहिती दिलेली आहे. दशोपनिषदांपैकीं तीन उपनिषदें वगळून बाकीच्या सातांत ॐकारासंबंधाचे मंत्र आलेले आहेत. हे सर्व मंत्र भाषांतर करून ह्या ग्रंथांत दिलेले आहेत. इतर उपनिषदांतील उल्लेखहि दिलेले आहेत. "विवेचनां"मध्यें यांना पातंजल योग सूक्तांतील कांहींची जोड देण्यांत आलेली आहे. दशोपनिषदांची शिकवणूक श्रद्धाळू विवेकवन्ताचे बुद्धीस न झेपणारी असत नाहीं, असा त्या उपनिषदांचा लौकिक आहे. सुसंगत रीत्या विषयाची मांडणावळ करणारीं या ग्रंथांतील 'विवेचनें' प्रथम वाचण्यांत यावींत व नंतर उपनिषदांकडे वळावें, अशी विनंति आहे.

गुरुवार, मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा<br>शके १८६६<br>ता. १६-११-१९४४.

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

॥ श्री ॥

# खाडिलकरांची ॐकाराची उपासना

## विवेचन पहिलें

सर्वे वेदा यत्पदमामनन्ति ।

तत्ते पदं संग्रहेण ब्रवीमि ॥ ओमित्येतत् ॥

—कठोपनिषत्

ॐकार परब्रह्माचा वाचक आहे; ॐकार परब्रह्माचें नांव आहे; ॐकार म्हणून हांक मारली असतांना हांकेसरशीं परब्रह्म ओ म्हणतें.

ॐकार ब्रह्माचें नांव आहे, ह्या म्हणण्यास आधार काय आहे ? आधार श्रुतींतला नको; श्रुतींतला आधार देण्यांत आला, तर श्रुतीला प्रमाण म्हणून मानणाऱ्याला तो आधार पटेल. श्रुतिप्रमाण न मानणाऱ्याला आधार पटला पाहिजे. युक्तिजुक्तीला आधार पटेल, युक्तीजुक्तीला नाक मुरडण्यास संधि मिळणार नाहीं आणि युक्तिजुक्तीची तक्रार विचारी लोकांकडून संग्रहणीय आहे असा शेरा मारण्यांत येणार नाहीं, इतक्या तोलाचा आधार पाहिजे. पण दशोपनिषदांतील श्रुतीची मांडणावळ युक्तिजुक्तीस सोडून नाहीं. ऋग्वेद व यजुर्वेद यांची मांडणावळ श्रद्धावानांना त्याज्य होणारी नाहीं.

दशोपनिषदांतील श्रुतीचा महिमा और आहे. श्रुतीचा आधार प्रार्थनेचे मंत्रा-संबंधानें असतो आणि प्रार्थनेचे मंत्र आत्मोन्नतीकरितां असतात. इहलोकीं आत्मोन्नतीमुळें फायदा मिळणारा असतो व मेल्यावर सद्गति मिळणारी असते. ऋग्वेदांतील मंत्र अशाच योग्यतेचे आहेत; आणि यजुर्वेदांतील मंत्र आपणाला प्रिय असतील त्या खाद्यपेयांपैकीं वस्तू अग्निमुखांत टाकून देवतेला प्रसन्न करून घेण्यासाठीं आहेत. अशा आदेशांसंबंधानें वादच नाहीं; कारण तसें वागणें त्याज्य समजलें जात नाहीं. परलोकीं फायदा दाखविणारे मंत्र विश्वास ठेवणाराला त्याज्य वाटत नाहींत. विश्वास असल्यावर श्रुति प्रमाण न मानण्यांत दोष लागतो. स्वर्गास जाणारा मार्ग मोकळा होतो, असें ऋग्वेदांत आणि यजुर्वेदांत फलप्राप्तीचें वर्णन करतांना सांगितलें आहे. कोणत्याहि धर्माच्या आज्ञा मानण्यास आधार असतो तो ह्याच स्वरूपाचा असतो. अस्तेय आणि तदङ्गभूत विषय ह्यांच्यासंबंधानें आज्ञा असतात त्यांचा उलगडा व्यवहारांतील नीतिशास्त्रालाहि धरून करतां येणारा आहे. यामुळें ‘ अधिकस्य अधिकं फलं ’ या न्यायानें त्याची विल्हेवाट दाखविण्यांत येणारी आहे. परंतु ॐकाराची श्रुतीनें दशोपनिषदांतून केलेली स्तुती व त्याची सांगण्यांत आलेली उपासना ह्यांचा उलगडा अस्तेयाच्या दाखल्याकडे बोट दाखवून करतां येणार नाहीं. ॐकार ही पारमार्थिक गोष्टींपैकीं गोष्ट असल्यामुळें त्या बाबीसंबंधानें ऐहिक विचार-सरणी लावतां येणार नाहीं. पारमार्थिक गोष्टी भावप्रधान असतात; ज्याच्या त्याच्या श्रद्धेला अनुसरून वागूं देणें भावप्रधान बाबीसंबंधानें योग्य असतें. ॐकाराबद्दल मुळांत जर श्रद्धा नसेल तर तसली श्रद्धा प्रथम उत्पन्न करावी लागेल. प्रत्यक्ष कृती करून दाखवून श्रद्धा नसेल त्या ठिकाणीं ही श्रद्धा उत्पन्न करतां येते. पण त्या ठिकाणीं ऊहापोह आणि संवाद ह्यांचा कोणताहि उपयोग नाहीं. इतर पारमार्थिक बाबीसंबंधानें जेवढी श्रद्धा असते तेवढी

श्रद्धा ॐकाराबद्दल आहे असें गृहीत धरून चालूं या. श्रद्धा या सद्गुणाची वाढ झालेली नसली तरी चालेल. पण अजिबात श्रद्धा नाहीं, अशी स्थिति उपयोगाची नाहीं. महत्त्वाचे सिद्धांतांसंबंधानें इतका उल्लेख करून मुख्य विषयाकडे आतां वळूं या.

## दशोपनिषदें आणि ॐकार

दशोपनिषदांत जागोजागीं ॐकार आढळतो. दशोपनिषदांखेरीज सुमारें शंभर आणखी उपनिषदें आहेत. हटयोग, राजयोग, लययोग, प्राणायाम इत्यादींना वाहिलेलीं जीं उपनिषदें आहेत त्यांत ॐकाराची स्तुति केलेली असते असेंच नव्हे तर उपासनेचा मार्ग सांगितलेला असतो. दशोपनिषदांपैकीं मांडुक्य हें उपनिषद् सर्वस्वीं ॐकारालाच देण्यांत आलें आहे; छांदोग्याचे प्रारंभींचे कित्येक अध्यायांतून ॐकार ऊर्फ प्रणव हाच विषय आहे; बृहदारण्यक ह्या उपनिषदांतहि ॐकार हा विषय कांहीं ठिकाणीं आलेला आहे; प्रश्नोपनिषदांतील एक प्रश्न सर्वस्वीं ॐकारासंबंधाचाच आहे; तैत्तिरीयोपनिषदांत शिक्षाध्यायांतील एक भाग ॐकाराचे स्तुतीलाच खर्च करण्यांत आलेला आहे. साधारणतः एकंदर दहा प्रधान उपनिषदें आहेत तर कांहींच्या मतें ही संख्या तेरा चौदापर्यंत जाते; असें असल्यामुळें तेरा चौदाहि उपनिषदांना आरण्यकांतील तो भाग असल्यामुळें श्रुती म्हणून संबोधिलें जातें. तेरा चौदाहून बाकीच्यांना तो मान नाहीं. श्रुतीचा मान मिळालेला असो वा नसो, जेथें जेथें ॐकाराचा विषय असेल तीं उपनिषदांपैकीं स्थळें निवडून काढण्यांत आलेलीं आहेत, आणि त्या स्थळांचें मुळासकट मराठी भाषांतर देण्याचें योजिलें आहे.

## न मातुः परं दैवतं

आतां दशोपनिषदांपैकीं ॐकारास वाहिलेलें असें जें मांडुक्य उपनिषद् आहे त्याकडे वळण्यापूर्वी ॐकार हें ब्रह्माचें ऊर्फ आत्म्याचें नांव असून,

हांक मारिली असतां ओ देतो, ह्या विधानाचा ऊहापोह होणें इष्ट आहे. आईनें हांक मारली असतांना मूल 'काय आई' म्हणून म्हणतें किंवा ओ देतें,– आईची वृत्ति मुलास हांक मारतांना कशा प्रकारची असते आणि मुलाची वृत्ति कशा प्रकारची असते ? आई मुलाला हांक मारतांना प्रेमळ वृत्तींत असते. प्रेमळ वृत्ति असणें म्हणजे ब्रह्मानंदांत असण्यासारखें आहे. कारण सच्चिदानंद स्वरूपीं ब्रह्म आहे. ह्या ब्रह्माचे सच्चिदानंद स्वरूपापैकीं कांहीं ना कांहीं अंश आईच्या अंगीं प्रेमळतेनें मुलाला हांक मारतांना उतरत असतात. आईचे व तान्हुल्यांचे या प्रकारचेच संबंध असतात. आई इतर आचरणाचे वेळीं कितीहि पापी असली तरी मूल जन्मास यावयाचे वेळीं शुद्ध मनाचीच असते आणि आपल्या मुलाकडे माता ह्या नात्याच्या प्रेमळपणानें ज्या ज्या वेळीं तिला पहावेसें वाटतें त्यावेळीं तिच्या मनाचे शुद्धींत काडीमात्र कमीपणा येत नाहीं. गर्भार असतांनाच ह्या शुद्धतेच्या भूमिकेवर ती आरूढ असलेली असते. 'न मातुः परं दैवतं' हें वर्णन अगदीं यथार्थ आहे. माता होऊन प्रथम स्तनपान करण्यास आपल्या मुलाला स्त्री जवळ घेते त्यावेळीं तिच्या मनाची वृत्ति अत्यंत प्रसन्नतेची असते. प्रसन्नतेचा क्षण आणि शुद्धतेचा क्षण ह्यांत कांहीं अंतर नाहीं. प्रसन्नतेमुळें मातेला आपल्या मुलाकडे स्मितहास्यानें पहावेसें वाटतें. आपली आई प्रसन्नतेच्या स्मितहास्यानें आपल्याकडे पहात आहे असा अनुभव येऊन तान्हुलें मूलहि तिच्याकडे पूर्ण समाधानाचे दृष्टीनें पाहूं लागतें. दृष्टीस दृष्ट भिडते. नेत्रपल्लवी वाचा सुरू होते. प्रत्यक्ष वाचेनें हांक मारण्यास आणि ओ म्हणून उत्तर येण्यास कांहीं काळ लागतो. ह्या वेळेला माता अत्यंत शुद्ध मानसिक स्थितींतच असतें. हा मातेचा स्वभाव आहे. तान्हुलेंहि सहज स्थितींत असतें. पाप त्याच्या अंगांत घुसूं लागलेलें नसतें. ही वृत्ति त्याची स्वाभाविक असते. " उद्धरेदात्मनाऽत्मानं नात्मानमवसादयेत् । आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव

रिपुरात्मनः " ह्या श्लोकांत सुचविल्याप्रमाणें 'आत्महा' झालेली माताहि नसते आणि तान्हुलेंहि नसतें. त्यांना परमेश्वरानें घडविलेल्या प्रसन्न स्थितींतच ते दोघेहि असतात. प्रसन्नतेच्या शुद्ध भावामध्यें ते दोघेहि असतात. हें जें प्रसन्नतेंचें भाषण सुरू झालेलें असतें त्यावेळीं 'परब्रह्म' माझ्या पोटीं जन्मास आलें आहे असें मातेला वाटतें आणि ती 'परब्रह्मा'चें नांव ॐ असें आहे हें ठाऊक नसल्यामुळें व्यावहारिक नांवानें संबोधिते आणि व्यावहारिक नांवानें संबोधित झालेलें तान्हुलें प्रसन्नतेच्या स्मित हास्यानें आईच्या हांकेस ओ देतें. ॐकार मातेच्या ओळखीचा नसतो; म्हणून माता ॐ अशा नांवानें हांका मारीत नाहीं आणि मातेनें तशी हांक न मारली तरी प्रसन्न मुद्रेनें मातेनें पाहिल्याबरोबर तान्हुलेंहि स्मित हास्याची ओ देतें. आईचें व तान्हुल्याचें नातें तूर्त बाजूस ठेवून आपण पुढील मार्गाला लागूं या.

## उच्च हेतूंची हेळसांड

व्यवहारांत आपणास काय दिसतें? 'राम' 'कृष्ण' हीं देवतेचीं नांवें आहेत तशीं व्यवहारांतील नांवें आहेत. 'राम' व 'कृष्ण' हीं देवतेचीं नांवें व्यवहारांत ठेवतांना देवतेचें नांव उठल्या बसल्या तोंडीं यावें म्हणून नांव ठेवतांना जो सकृद्दर्शनीं हेतु असतो तो हळुहळू मागें पडतो; व्यवहाराचें दडपण आस्ते आस्ते वाढत जाऊन 'राम्या' व 'कृष्ण्या' म्हणण्यावर पाळी येते. चांगला हेतु असतो तो मागें पडतो; उपहासगर्भित व्यावहारिक हेतूपुढें कांहीं न चालल्यामुळें चांगल्या हेतूला मागें पडावें लागतें. ज्यांच्या मनावर उच्च हेतूचा कांहींएक परिणाम झालेला नसतो असले आईबाप आजूबाजूच्या लोकांचा सल्ला घेऊन मग 'तुकाराम' म्हणून व्यावहारिक नांव प्रथमपासूनच ठेवतात. मोठ्या कवीचें हें नांव आहे, असें नांव ठेवीत असतांना व मागाहूनहि त्यांच्या ध्यानीं येत नाहीं. नांव ठेवतांना उच्च हेतु मनांत असो वा नसो, इ०२

देवतेचें नांव ठेवल्यानंतर त्या नांवाची हेळसांड व्यवहाराचे दडपणानें होते असें क्वचित्च लक्षांत येतें. उच्च हेतूचें ज्ञान असतांना देखील ही हेळसांड होते. ह्याचें कारण काय? व्यवसायात्मिका बुद्धीचा अभाव हेंच मुख्य कारण होय. बुद्धीचा निश्चय होऊन निश्चयास अनुसरून कर्म हातून घडेल तर असें होणार नाहीं. बुद्धीस स्थिरता येत नाहीं; स्थितधीः मुनिरुच्यते ह्या योग्यतेला चढतां येत नाहीं. निश्चयी होऊन तुकारामबुवांचे म्हणण्याप्रमाणें "निश्चयाचें बळ तुका म्हणे तेंचि फळ" ह्या म्हणीला अनुसरून सुखाचें तें फळ सेवितां येत नाहीं. पुढील मार्गांत बुद्धीची हेळसांड अंगलट येते. बुद्धीला नाद लागला पाहिजे; नादिष्ट बुद्धि झाली पाहिजे. नादिष्ट याचा अर्थ व्यवहाराचे दृष्टीनें निंद्य असा केला जातो. त्या अर्थानें बुद्धि नादिष्ट होतां कामा नये. "असा धरि बा छंद। जेणें तुटेल भवबंध" अशा दृष्टीचा बुद्धीला छंद लागला पाहिजे. निश्चयी व करारी वळण बुद्धीला लागल्याशिवाय बुद्धीला तेज चढत नाहीं. करारीपणा वाईट अर्थानेंहि होऊं शकतो. उठल्या बसल्या अपमान झाला असें म्हणून वागणारा मनुष्य करारी असूं शकतो; त्या अर्थानें करारी शब्द येथें वापरला नाहीं. 'सत्याग्रह' ह्या शब्दांतील अर्थ पाहून त्याप्रमाणें वागणारा असा अर्थ येथें विवक्षित आहे. 'सत्य' म्हणजे काय आहे, ह्याविषयीं वितंडवाद जो घालीत बसत नाहीं आणि आग्रहाचा अर्थ 'दुराग्रह' असा करीत नाहीं तो सत्याग्रही मानण्यास कांहीं हरकत नाहीं. सत्याचें उल्लंघन होत आहे किंवा काय अशी मनाला चुटपुट लागली पाहिजे; विचार-सरणी कांहीं विचारी लोकांना पटवितां येण्यासारखी असली पाहिजे; आणि 'आग्रह' सोसण्याची मानसिक तयारी असली पाहिजे; हीं सत्याग्रहांतील मुख्य अंगें आहेत. विनयानें सत्याग्रह करतां आला पाहिजे; उच्छृंखलपणा सत्याग्रह करतांना उपयोगाचा नाहीं; आततायीपणा उपयोगाचा नाहीं; हमरी तुमरीपणा उपयोगाचा नाहीं. एवंगुणविशिष्ट सत्याग्रही कार्यक्षम होत असतो. पारमार्थिक

दृष्टि सत्याग्रहाची नसते असें नाहीं; पण ती गौण असते. मला सद्गति दे, ही प्रार्थना करण्याशिवाय सत्याग्रही कांहीं करीत नाहीं. जगाच्या कल्याणाकडे सत्याग्रहाची नजर असते, केवळ आत्म्याचे कल्याणाकडे दृष्टि ठेवून सत्याग्रही वागत नसतो. जगाच्या ऐहिक कल्याणाकडे सत्याग्रहाची दृष्टि लागलेली असते. जगाचे कल्याणार्थ संतांच्या विभूति, ह्या कोटींतला सत्याग्रही असतो. सत्याग्रहाला विचारी लोक मानितात. ते कां मान देतात ?

## एक ना धड भाराभर चिंध्या

सत्याग्रह, निश्चयी बुद्धि आणि करारीपणा–वाईट अर्थानें नव्हे तर चांगल्या अर्थानें–जगाचें कल्याण करणाऱ्या ह्या शक्ती आहेत. पारमार्थिक कल्याण म्हणजे अखिल मानवांचें, म्हणजे जगाचें कल्याण होय. श्रेयस आणि प्रेयस ह्या जोडीपैकीं प्रेयस म्हणजे एका व्यक्तीला गोड, जिभेला गोड, कानाला गोड, त्वचेला गोड, रूपाला गोड वाटणारें; आणि श्रेयस म्हणजे असंख्याक मानवांना गोड वाटणारें, असें समजलें जातें. प्रेयसच्या नादीं मनुष्य सामान्येंकरून असतो; श्रेयसच्या नादीं असणारा विरळा. श्रेयस व प्रेयस यांच्या अनुयायांत असा फरक कां ? सत्याग्रही ठिकठिकाणीं कां आढळत नाहींत ? निश्चयी बुद्धि हरजागीं कां दिसत नाहीं ? करारीपणा हरहमेष कां भेटत नाहीं ? प्रेयस अंगवळणीं असतें; सत्याग्रह हा उपजत स्वभाव नाहीं. मन चंचल आहे आणि तें जागोजागीं बुद्धीला घेऊन फिरतें; मनाची मोट बांधावी लागते, आणि नंतरच बुद्धि कह्यांत येते. सत्याग्रह काय, निश्चयी बुद्धि काय आणि करारीपणा काय, ह्या गोष्टींना प्रयत्न लागतो. श्रेयस आणि प्रेयस यांचा विवेक करण्याचें सामर्थ्य प्रयत्नांखेरीज अंगीं येत नसतें. सुसंस्कृत मन असावें लागतें, बुद्धि सुसंस्कृत असावी लागते; मन आणि बुद्धि सुसंस्कृत नसतील तर मानसिक धैर्य उत्पन्न होऊं शकत नाहीं. अनुकरण करण्याची इच्छा उत्पन्न होण्याइतका बुद्धीवर संस्कार झालेला असला पाहिजे. हा संस्कार

सामान्यतः मानवी बुद्धीवर झालेला नसल्यास त्या बुद्धीचा उपयोग करून घेतां येणें जड जातें. योग्य शिक्षण झाल्यानन्तर मनावर व बुद्धीवर योग्य संस्कार झाल्यावांचून रहात नाहींत. अनिष्ट संस्कार होणार नाहींत अशी खबरदारी घेतली पाहिजे. किंचित् विवेक असावा, आणि देहधर्म ताब्यांतले असावेत म्हणजे योगाभ्यासास लायक समजला जाईल, असा शेरा श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं सहाव्या अध्यायांत मारला आहे. सामान्यतः आईबापांकडून इतपत तजवीज झालेली असते. पण मन चंचल असल्याकारणानें तें आपणच आपल्याभोंवतीं फिरत राहतें. 'एक ना धड भाराभर चिंध्या' अशी गत हें चंचल मन मनुष्याची करीत असतें. अभ्यास करावयास ह्या चंचल मनास शिकविलें पाहिजे. अभ्यास म्हणजे वारंवार तीच गोष्ट करणें. एखाद्या शब्दाचा अर्थ नडत असल्यास 'घोकणें' हा त्याच्यावर इलाज आहे. एखादा मनुष्य एकपाठी असेल त्याला एकदां घोकून पाठ येईल; पण सर्वच एकपाठी नसतात. त्यांचें मन 'प्रमाथि' असतें. ह्या विषयाचे नादीं मन एका वेळीं लागलेलें असेल, तर दुसऱ्या वेळीं दुसराच नाद ह्या मनानें घेतलेला आढळेल. हें मन आपली बुद्धि प्रसन्न करते, त्या बुद्धीला 'आत्मबुद्धिप्रसादजं सुखं' काय तें समजतें, आणि हा अनुभव 'कौतुकें दावीत जावें, कारण हें मन 'देखलिया' सुखाचे ठायीं 'सोकलेलें' असतें, अशी चंचल मन स्थिर करण्याची युक्ति श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं सांगितली आहे. अभ्यासेन तु वैराग्येण गृह्यते मनः—ही अभ्यास आणि वैराग्य ह्यांची युक्ति मनोनिग्रहास्तव श्रीमद्भगवत्गीतेंत सांगितलेली आहे.

अभ्यास म्हणजे काय, हें वर सांगितलेंच आहे. आतां वैराग्य म्हणजे काय तें पाहूं. इष्ट—साध्य हेतूला जी जी गोष्ट वावडी असेल त्या त्या गोष्टींसंबंधानें मनांत तिटकारा उत्पन्न झाला कीं वैराग्याची स्थिति उत्पन्न झाली म्हणून समजावें. वि गत आहे राग (प्रेम) ज्याविषयीं, हा वैराग्याचा अर्थ

आहे. वैराग्य म्हणजे प्रेमविरहितपणा. वैराग्य म्हणजे अनासक्तियोग. इष्ट कार्यसिद्धीस जितक्या गोष्टी वावड्या म्हणून असतील त्यांच्याबद्दल मनांत प्रेम असतां कामा नये, इतकेंच नव्हे तर प्रेमाच्या ऐवजीं तिटकारा उत्पन्न झाला पाहिजे. असें नसेल तर अभ्यासानें जें कमवावयाचें तें वैराग्यानें गमवावयाचें असें होईल. कधीं कधीं वेरीज वजावाकी शून्य, इतक्यानें भागणारें नसतें. तर अंगलट वाजू येऊं लागते व भीक नको पण कुत्रा आवर असें म्हणण्याची पाळी येते. सद्‌गुणांचे मागें लागतां लागतां अवगुणांची वृद्धि होते आणि मनुष्य अधोगतीला लागतो. प्रयत्न करणें ही गोष्ट मनुष्याच्या आधीन आहे. करणी करे तो नरका नारायण हो जाय. प्रयत्नाला योग्य दिशा दाखविणाऱ्याला 'सद्‌गुरु' म्हणतात. हा सद्‌गुरु केव्हां केव्हां मानवाचे रूपानें भेटत असतो; केव्हां केव्हां पुस्तकाचे रूपानें भेटत असतो. पुस्तक वाचून अमुक गोष्ट ह्या रीतीनें करावयाची आहे अशी प्रेरणा होते. पुस्तक वाचल्यावर प्रेरणा झालेली असो किंवा सद्‌गुरूंनीं उपदेश केलेला असो, प्रेरणेचा भाग राजयोग, हठयोग किंवा लययोग ह्यांचे सदराखालीं पडतो. प्रयत्न करा, प्रयत्न करा, म्हणून सांगतांना राजयोग, हठयोग किंवा लययोग ह्यांना धरूनच प्रयत्न करणें भाग आहे. ह्या गोष्टींचा उलगडा विषयानुषंगानें करण्यांत येईल. पाल्हाळाचे गोष्टी एका बाजूला ठेवूं या, आणि मुख्य विषयाकडे वळूं या. ॐ म्हणून हांक मारल्यावरोवर ब्रह्मानें ओ दिली पाहिजे, कारण ॐकाराची उपासना इतर उपासनेपेक्षां अधिक श्रेष्ठ दर्जाची आहे. हें कसें काय आहे, तें मांडुक्य उपनिषदांत सांगितलेलें आहे. आतां त्याच उपनिषदाकडे वळूं.

---

# विवेचन दुसरें

ओमित्येतदात्माऽभवत्स त्रेधाऽऽत्मानं व्यकुरुतोमिति तिस्रो मात्रा, एताभिः सर्वमिदमोतं प्रोतं चैवास्मिन्नित्येवम् ।

—मैत्रायणीयोपनिषत्.

ॐकार ब्रह्माचा वाचक आहे; ॐकार ब्रह्माचें नांव आहे. आणि प्रथम जो ध्वनि उत्पन्न झाला तो हा होय. म्हणून त्यास नादब्रह्म असेंहि म्हटलें आहे. ॐकाराचें तादात्म्य आत्म्याशीं मांडुक्य उपनिषदांत दाखविलें आहे. आत्मा हाच ब्रह्म आहे असें श्रुतिवचन आहे. "अयं आत्मा ब्रह्म" म्हणून ॐकार किंवा 'प्रणव' हा आत्म्याचा वाचक आहे. ब्रह्माचा किंवा आत्म्याचा वाचक ॐकार ऊर्फ प्रणव हा असल्यामुळें ब्रह्म ऊर्फ आत्मा हें तत्त्व वाच्य ठरतें आणि ॐकार वाचक ठरतो. ज्याच्या गुणांचें निदर्शन करावयाचें त्याला वाच्य समजतात आणि निदर्शन करणारें तत्त्व वाचक समजलें जातें. येथें ब्रह्म ऊर्फ आत्मा हें तत्त्व वाच्य आहे, ॐकार त्याचें वाचक आहे. एकमेवाद्वितीय हें ब्रह्म असल्यामुळें त्याला वाच्य कसें म्हणावयाचें? ऊहापोह आणि प्रचार करण्याकरितां ब्रह्माचे ऊर्फ आत्म्याचे गुण दाखविणें सोईचें आहे. ब्रह्म किंवा आत्मा हें तत्त्व अनिर्वाच्य असल्यामुळें त्याला बोलामध्यें पकडावयाचें अशी सोय पहाण्यावांचून गत्यंतर नाहीं; नाहीं तर भाषेमध्यें हें तत्त्व उतरणार कसें?

## 'राम राम' आणि 'कृष्ण कृष्ण'

वाच्य आणि वाचक ह्यासंबंधानें विचार करितांना व्यवहारांत चांगल्या हेतूनें 'राम' असें नांव ठेवल्यावर राम असें ठेवलेलें नांव कोणाचें वाचक

असतें? रामायणांतील 'राम' हा वाच्य असून व्यवहारांतील राम त्याचा वाचक नसतो काय? महाभारतांतील 'कृष्ण' हा वाच्य असून व्यवहारांतील कृष्ण त्याचा वाचक नसतो काय? राम व कृष्ण हीं व्यवहारांतलीं नांवें कोणाचीं वाच्य ह्या अर्थानें प्रतीक आहेत? राम व कृष्ण हीं नांवें ठेवितांना डोळ्यांपुढें कोणचा राम असतो किंवा कृष्ण असतो? सल्लागार मंडळींचे दृष्टीपुढें राम कोणता असतो? कृष्ण कोणता असतो? मरायचे वेळेला राम रामायणांतील आठवावा आणि कृष्ण महाभारतांतील आठवावा अशी योजना नसते काय? मुलाचें नांव राम अगर कृष्ण ठेवल्यावर मरतांना मुलाला हांक मारण्याचे वेळीं देवतांचे नामोच्चार निदान व्हावे असा हेतु नसतो काय? हा हेतु साधला; मग स्वर्ग दिसायला लागतो असें थोडेंच आहे? स्वर्ग दिसला नाहीं तर नाहीं, पण महाभारतांतील कृष्ण किंवा रामायणांतील राम यांच्याकडे आमचें लक्ष कांहीं खोटें नाहीं. अस्सल राम अगर कृष्ण हे वाच्य आहेत, आणि व्यवहारांतील राम अगर कृष्ण हे वाचक आहेत. परंतु व्यवहारांतील राम–कृष्णांच्या नांवांचा उच्चार करीत असतांना हे ज्या अस्सलांचे वाचक म्हणून उच्चार केला जातो त्यांचे अंगीं असलेले कांहीं गुण आठवले जातात का? एकवचनी राम, एकबाणी राम, एकपत्नी राम, ह्यांपैकीं कांहींची आठवण होते काय? अर्जुनाला गीतेचा उपदेश करणारा श्रीकृष्ण, 'न धरी शस्त्र करीं मी गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' असें अर्जुनाला बजावणारा श्रीकृष्ण, कौरव व पांडव लढाईला जाण्यास उद्युक्त आहेत असें पाहून 'पांच गांवांपुरती' मागणी करून शिष्टाईला तयार होणारा श्रीकृष्ण–ह्या परमात्म्यानें केलेल्या पांडवांच्या सेवेपैकीं कांहींची तरी आठवण होते काय? 'राम राम' आणि 'कृष्ण कृष्ण' म्हणून वाचेनें उच्चार करीत असतांना वरीलपैकीं कोणचा सद्गुण आठवतो? राम–कृष्ण म्हणून आवडीनें उच्चार करीत असतांना मन भांबावून गेल्यामुळें वरीलपैकीं एकादि सद्गुणाची स्मृति

न होतां केवळ कवाइतीप्रमाणें आपण उच्चार करीत असतो ना! ह्यावेळीं मन भांबावून कां जातें? मनाचा निश्चय कोठें जातो? अस्सलांच्या सद्गुणांवरील दृष्टि हालते कां? सहजासहजीं साध्य होणाऱ्या सुखावर मन कां धावून जातें? श्रेयस दूर लोटून देऊन प्रेयसकडे मन वळतें कां? अस्सल रामाचे गुणाकडे डोळेझांक कां करावीशी वाटते? अस्सल श्रीकृष्णाचे गुण पहाण्यास कंटाळा कां येतो?

## पन्नाशी उलटल्यावर ॐकाराचा जप

त्या प्रश्नांचें उत्तर असें आहे कीं राम–कृष्ण ह्यांचें ध्यान घटका अर्धघटिका करीत बसण्यापेक्षां त्याऐवजीं तो वेळ इतर सुखावह किंवा दुःखविसर्जनाचें कामीं उपयोगास आणावा, असें आपणांस वाटत असतें. "राम–कृष्ण" ह्यांचें आम्हांस अगत्य नसतें असें नव्हे. राम–कृष्ण ह्यांचे सद्गुण ऐकत असतांना त्या सद्गुणांचे लायक आम्हीहि कृती करून दाखवावी असें मनांत आल्यावरूनच ध्यानाचा उद्योग आम्ही करण्यास प्रवृत्त होतो. मनांत आलेल्या ध्यानाच्या उद्योगाला आड कोण येतें? आमचें पाप येतें. उठल्या बसल्या पापाचरण आम्ही करावयास लागतों. हें पापाचरण हलके हलके अंगवळणीं पडतें व आम्ही निर्ढावलेले पापी बनतो! व्यवहारांतील फायद्याकरतां आम्ही खोटें बोलतों; मग फायदा असो वा नसो आम्ही खोटें बोलण्यास मागेंपुढें पाहत नाहीं. आमच्या खोटें बोलण्याला सराईतपणाचें स्वरूप प्राप्त होतें. मोठीं मोठीं पापें आमच्या हातून घडतात. आमच्या मनास पश्चात्ताप न होतां आम्ही त्या पापासंबंधानें बेफिकीर असतों. एकीकडे लहानमोठीं पापें करीत असावयाचीं आणि ध्यानाचें नुसतें ढोंग करावयाचें, अशा रीतीनें आमचा कांहीं काळ जातो. आम्हास पश्चात्ताप झाल्यावर खरोखर वाईट वाटल्यास पश्चात्तापाची शक्ति दुणावते. पश्चात्तापेन शुद्ध्यति, असा अनुभव येऊं लागतो. आणि नंतर पुन्हां शुद्धीवर येऊन ध्यानाचें ढोंग न

करतां ध्यानाचे पवित्र मार्गाला आम्ही लागतों. पण राम किंवा कृष्ण किंवा आणखी कोणतेंहि दैवत घ्या—त्यांचें भक्तीनें केलेलें ध्यान म्हणजे परमात्म्याचें ध्यान नव्हे. रामाला परमात्मा समजून त्याचें ध्यान करतां येत नाहीं असें नाहीं. सदासर्वदा सत्य भाषण करणारा राम त्याचें केवळ ध्यान-गम्य स्वरूप आठवून आपण जेव्हां त्याची भक्ति करूं लागतों तेव्हां खोटें बोलण्याचें पाप आमचे हातून सहसा होत नाहीं. त्या ध्यानाचें हें पुण्य आम्हाला लागतें. परंतु व्यापक परमात्म्याच्या ध्यानाचें हें पुण्य नव्हे. पुण्यांत पुण्यांत फरक आहे. देवता प्रसन्न करण्याचें काम दुष्ट माणसांच्या हातूनहि घडतें. व्यवहारांत 'राज्यकर्ती' माणसेंहि दुष्ट स्वभावाचीं असूं शकतात. देवता किंवा राज्य-यंत्र प्रसन्न करून घेणें त्यांना साधलेलें असतें. देवतेची प्रकृति ओळखून किंवा राज्य-यंत्राची प्रकृती ओळखून त्यांच्याशीं तादात्म्य पावण्याची भावना उत्पन्न झाल्यामुळें त्यांच्या पदरांत तादात्म्याचें फळ पडतें; तसेंच देशाभिमानाचे वारें अंगांत शिरल्यामुळें देशाभिमानाची जी भावना दृढावते तीमुळें व्यावहारिक पुण्य लागतें. पण तें पुण्य परमात्म्याच्या नांवाचा जप करून मिळणारें पुण्य नव्हे. व्यापक परमात्म्याचें नांव घेणें निराळें आणि एखाद्या अवतार मानलेल्या विभूतीचें नांव घेणें निराळें. राम-कृष्ण हे अवतार मानलेल्या विभूतीहून थोर आहेत; परमात्म्याचे स्वरूपांतहि ह्यांच्या नांवाचा जप आपण करितो. पण तो जप करीत असतांना परमात्म्याचें स्वरूप आपणांपुढें उभें राहूं शकत नाहीं. परमात्म्याचें शाब्दिक रीतीनेंहि स्वरूप आकलन करण्याइतकी आमच्या बुद्धीची वाढ न झाल्यामुळें वयाचीं पन्नास वर्षें उलटून जाईतों वाट पहावी. वयाची इयत्ता घालण्याचें कारण आहे. त्या वयांत येऊन पोंचल्यानंतर बुद्धिमंतांचे अंगींहि—अलौकिक माणसें एका बाजूस ठेवून द्या—निष्पाप राजसी गुणांचें वजन असलेलें दिसत नाहीं—राजसीहि गुणांचें दडपण झुगारून देण्याइतकें माणसांनीं असलें पाहिजे, आणि

पन्नाशी उलटून गेल्यावर हें वजन असलेलीं माणसें क्वचित् दृष्टीस पडतात. असल्यांना परमात्म्याचें शाब्दिक वर्णन करतां येतें. शाब्दिक वर्णनावरून निर्गुण वर्णनाकडे झुकणें अवघड जरी असलें तरी कष्टसाध्य नाहीं. म्हणून असें प्रतिपादण्यांत येत आहे कीं आपणास तितका दर्जा प्राप्त झाला असतां मनुष्यांनीं पन्नाशी उलटल्यावर ॐकाराचा जप करण्यास सुरवात करावी. प्रारंभीं राम–कृष्णाची दीक्षा ज्यांनीं घेतली असेल त्यांनीं तीच दीक्षा पुढें चालू ठेवावी; पण पन्नाशी उलटल्यावर निर्गुण परमेश्वराकडे झुकूं लागलें असतांना आपला नवा दर्जा ओळखून ॐकाराचा जप सुरू करावा. राम–कृष्ण प्रारंभीं प्रारंभीं पापाचरणापासून त्यांचें संरक्षण करतील, आणि नंतर ॐकार त्यांचें संरक्षण करील. प्रारंभापासूनच ॐकाराचा जप केलेला बरा. ह्या जपाचें अंगीं पापाचरणाचे बाबींत तुमचें सर्वकाळ संरक्षण करण्याचें सामर्थ्य आहे. स्वभावतः जे दुष्ट असतात त्यांचा दुष्टपणा कमी करण्याची ताकद नुसत्या देशाभिमानाचे अंगीं नसते. राष्ट्राचा बचाव होण्याकरितां ते देशाभिमानी असले तर लढतील; पण आपल्या राष्ट्राबाहेरच्या इतरांशीं वागण्यांत ते ताठरच आहेत असें आढळून येईल. परमात्म्याची भक्ति आणि निव्वळ देशाभिमान ह्यांत मुळांतच हा फरक मोठा. परमात्म्याची भक्ति करणारांचे स्वभावच धैर्यशील असून लीनपणानें सत्याकडे वळलेले असतात.

## आत्मा आणि ब्रह्म एकच

आतां मांडुक्योपनिषदांतील प्रतिपादनाकडे वळूं. आत्मा आणि ब्रह्म एकच, असें येथें प्रतिपादिलेलें आहे. पहिल्या मंत्राचा प्रारंभ येणेंप्रमाणें आहे:–ॐ इत्येदक्षरमिदं सर्वं. ॐ ह्या अक्षरानें सर्व जग व्यापून टाकलें आहे. हें सर्व विश्व ॐ हें अक्षर आहे. त्याचें विवरण असें करण्यांत येणारें आहे. झालेलें, होत असलेलें व होणारें हें सर्व ॐकार स्वरूपच आहे. जें दुसरें या तीन काळापलीकडचें तेंहि ॐकार स्वरूपच आहे." पहिला विस्तृत

मंत्र येथें संपला. ह्या मंत्रांतील अक्षर ह्याचे अर्थ दोन आहेत. अविनाशी असा एक अर्थ असून दुसरा अर्थ वर्ण असा आहे. अक्षरांमध्यें ॐ हें ब्रह्माचें नांव असा एक अर्थ होतो. अविनाशी (अ+क्षर) असा अर्थ केल्यास ब्रह्मास वाच्य आणि ॐकारास वाचक असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. छांदोग्यांत अशी एक गोष्ट आहे कीं कोणी एका काळीं देवतांस मृत्यूचें भय वाटलें. त्यामुळें त्यांनीं वेदांतील छंदांचा आश्रय केला. पण तेथेंहि मरणाची भीति वाटलीच. मग ॐ ह्यांत प्रवेश केला आणि मरणाचे भीतींतून ते मुक्त झाले. ॐ हें अक्षर अविनाशी ब्रह्माचें प्रतीक असल्या-मुळें मालकाप्रमाणेंच चिन्हहि अविनाशी झालें. अविनाशी ब्रह्म म्हणून त्याचें प्रतीक अविनाशी. ब्रह्म हें अविनाशी आहे (अ+क्षर) इतकेंच नव्हे तर कालातीत आहे. ॐकाराची आणि ब्रह्माची वाचक आणि वाच्य ह्या नात्याची सांगड असल्यामुळें वाच्यांतील गुण वाचकांत उतरलेले आहेत, असें वर्णन आहे. दिक्कालातीत ब्रह्म आहे. दिशा व काल ही जोडी उत्पन्न होण्या-पूर्वींचें ब्रह्म आहे. पावलें टाकीत आपण मोजूं लागलों म्हणजे दिशांना स्पर्श होऊन त्यांचें अस्तित्व आम्हांस समजूं लागतें. मोजण्याची क्रिया म्हणजे कालाच्या जाणीवेची क्रिया होय. दिशा व काल हीं उत्पन्न न झाल्यावेळींहि ब्रह्म होतें; असें असल्यामुळें ब्रह्म हें कालातीत आहे, पलिकडचें आहे असें वर्णन करण्यांत आलेलें आहे. ब्रह्माचा वाचक ॐकार असल्यामुळें त्याचें वर्णन ब्रह्माचे वर्णनाबरहुकूम असल्यास नवल नाहीं.

ब्रह्म आणि आत्मा एकच आहेत असें दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे आणि आत्म्याचें वर्णन 'चतुष्पात्' असें केलें आहे. ह्या दुसऱ्या मंत्राचा प्रारंभ येणेंप्रमाणें आहे. "सर्वं ह्येतद्ब्रह्मायमात्मा ब्रह्म". "ज्याअर्थीं हें सर्व ब्रह्म आहे त्याअर्थीं हा आत्माहि ब्रह्मच होय". अद्वैत सिद्धांताला परिपोषक जे कांहीं उद्गार श्रुतींमध्यें सांपडतात त्या उद्गारांमध्यें ह्या वाक्याचा

समावेश करण्यांत येत असतो. अशा रीतीनें ब्रह्म आणि आत्मा एकच आहेत असें प्रतिपादन करून त्या आत्म्याचे चार अंश (भाग) आहेत असें सांगण्यांत आलें आहे. आत्म्याचे ब्रह्मप्रमाणेंच निरनिराळे भाग करतां येत नाहींत. परंतु विषय समजावा म्हणून भाषेच्या सोयीसाठीं येथें चार भाग मानण्यांत आले आहेत.

## आत्म्याचा 'वैश्वानर' भाग

आत्म्याच्या पहिल्या अंशाचें (भागाचें) वर्णन करण्यास आतां सुरुवात करितात. ह्याला 'वैश्वानर' असें म्हणतात. हा जागेपणीं अनुभवास येतो. जागृतावस्थेंतच किंवा जागेपणीं, पारमार्थिक असो किंवा ऐहिक असो, आत्म्याच्या प्रेरणेला अनुसरून क्रिया होतात. जागृतावस्थेंतच वैश्वानराचा अनुभव येतो. वैश्वानर ह्या नांवांत दोन भाग पडतात. विश्व आणि नर असे ते दोन भाग होत. सर्व मानवी प्राणी असा त्याचा अर्थ आहे. मानवी समुच्चयांत प्रकट होणाऱ्या सामुदायिक शक्तीच्या देवतेला वैश्वानर म्हणतात. त्याला नारायण असें म्हणून 'नारायणं नमस्कृत्य' असा महाभारताचा प्रारंभ केला आहे. सर्व संसार आणि व्यवहार ते ह्या भगवान वैश्वानराचें वसतिस्थान. त्याची सत्ता (बुद्धि) बाहेरच्या गोष्टींचा विचार करते. म्हणून हा वैश्वानर बहिःप्रज्ञ आहे; आंतून बाहेर पहाणारा आहे; आंतल्या आंत पहाणारा नाहीं. त्याला अंगें सात आहेत. सप्ताङ्गांचा विचार पिंड–ब्रम्हांडाच्या दृष्टीनेंच झाला पाहिजे. अखिल मानव जातीचा ह्या दृष्टीनें विचार जो करावयाचा तो विचार व्यष्टीला साजेसाच असला पाहिजे. पृथ्वी आदिकरून पंचमहाभूतें मानवी देहांतील घेतल्यानें त्यांची बेरीज पांच होते; आणि मन व बुद्धि मिळून सात अंगें आहेत. मानवी देहाच्या दृष्टीनें असें केलेलें वर्णन समष्टीच्या केलेल्या वर्णनाशीं जुळणारें आहे. सप्ताङ्ग असून एकोणीस मुखांचा हा देव आहे. पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पांच प्राण, चार अन्तःकरणें

मिळून एकोणीस भरतात. ह्या एकोणीस मुखांचे मार्फत हा देव विषयांचें ग्रहण करतो. वैश्वानर हा स्थूल विषयांचा उपभोक्ता आहे. म्हणून त्याचें वर्णन स्थूल–भुक् ह्या शब्दानें केलेलें आहे. स्थूल म्हणजे प्रत्यक्ष. हा देव प्रत्यक्ष विषयांत रममाण होतो. झोपेंतील स्वप्नांतल्याप्रमाणें काल्पनिक स्थितीचा उपभोक्ता हा नव्हे. जागेपणीं संसारांतील प्रत्यक्ष वस्तूंचें सुख किंवा दुःख हा उपभोगणारा असल्यामुळें काल्पनिक सुख–दुःखांशीं कांहीं संबंध येत नाहीं. अखिल संसाराचा देव वैश्वानर आहे.

## ॐकार आत्म्याचें विशेषण

ॐकार ब्रह्माचा ऊर्फ आत्म्याचा प्रतिवाचक शब्द किंवा विशेषण आहे, असें म्हणण्यास आधार काय ? ॐकार हा प्रतीक नव्हे. विष्णूचें प्रतीक म्हणजे पाषाणाची किंवा धातूची मूर्ति. विष्णूची कल्पना ह्या मूर्तीवर केल्यामुळें विष्णूचें प्रतीक ही मूर्ति होऊं शकते. तसल्या अर्थी ॐकाराचे वेळेला तो शब्द वापरलेला नाहीं. विशेष्य असलेल्या आत्म्याचा अंश जो वैश्वानर त्याचें अंशाच्या वैश्वानराचें सादृश्य असल्याशिवाय ॐकारास त्याचें विशेषण मानतां यावयाचें नाहीं. सादृश्य कशांत आहे ? वैश्वानरांत व ॐकाराच्या एक अंशांत 'अ'कारामध्यें सादृश्य आहे, असें नवव्या मंत्रांत सांगण्यांत आलेलें आहे. 'अ'कार, 'उ'कार 'म्'कार, असें ॐकारास अंश किंवा भाग आहेत. ह्या तीन भागांची मिळवणी केली असतां ॐकाराला त्याचें स्वरूप प्राप्त होतें. ॐकार आत्म्याचें नांव आहे; आत्म्याचे एका अंशास वैश्वानर म्हणतात म्हणून वैश्वानरांत व ॐकाराचा एक अंश असलेल्या 'अ'कारांत साम्य दाखविण्यांत आलें आहे. कशा रीतीनें साम्य प्रतिपादण्यांत आलें आहे ? नवव्या मंत्रांत येणेंप्रमाणें साम्य दाखविण्यांत आलें आहे.–" जागरितस्थानो वैश्वानरोऽकारः प्रथमा मात्राप्तेरादिमत्वाद्वाप्नोति ह वै सर्वान् कामानादिश्च भवति य एवं वेद ॥"

वैश्वानर व त्याचें नांव असलेला 'अ'कार ह्यांचें साम्य कोणत्या बाबींत आहे ? हे दोघेहि व्यापक आहेत. वैश्वानरानें सर्व प्रपंचाला व्यापून टाकलें आहे; 'अ'देखील सर्व उच्चारांना व्यापक आहे. कोणतेंहि अक्षर उच्चारतांना 'अ'काराच्या ध्वनीचा प्रथम उच्चार होतो, आणि कंठव्य, तालव्य, ओष्ठव्य, असेल त्या प्रमाणें मागून उच्चार करण्यांत येतो. अशा रीतीनें सर्व उच्चारांना 'अ'कार व्यापून राहिला आहे. 'अ'कार पहिला ( श्रेष्ठ ) स्वर आहे. रोमन लिपीला प्रारंभ 'ए'च्या ध्वनीनें म्हणजे 'अ'कारानें झालेला आहे; संस्कृतांत 'अ'काराला पहिला ऊर्फ श्रेष्ठ समजतात. मानवी उच्चारांत सर्व उच्चारांना 'अ' हा स्वर व्यापक आहे; आणि सर्व अक्षरांचा 'आदि' म्हणजे श्रेष्ठ आहे. आत्म्याचा वैश्वानर सर्व–व्यापक असून सर्वांत श्रेष्ठ आहे. वैश्वानरावर सर्व कांहीं दुनियेंत अवलंबून आहे. व्यापकपणा आणि श्रेष्ठपणा ह्या गुणांत 'अ'चें वैश्वानराशीं साम्य असल्यामुळें वैश्वानराचे किंवा आत्म्याचे जपाकरितां ॐचा जप करण्यास काय हरकत ? ॐचाच जप विहित आहे. ॐचा जप कांहीं काळ करीत राहिल्यानें किंवा रोजच्यारोज नियमित काळीं हा जप केल्यानें सर्वांत श्रेष्ठ होऊन सर्व कामनांची तृप्ति होते, असें पुण्य संपादन करून मानव कृतकृत्य होतो, असा नवव्या मंत्राचा अभिप्राय आहे.

## सद्वर्तनी शीलधर प्रसवणारी ओंकाराची मूस

वैश्वानराचा 'अ' हें अक्षर प्रतिनिधि आहे; तेव्हां वाच्य वैश्वानर आणि वाचक 'अ' हें अक्षर असा वाच्य–वाचकांमधील त्यांचा संबंध आहे. परंतु ॐ ह्या सबंध मंत्राचा जप केल्यानें वैश्वानराची आराधना केल्यासारखें होऊन तो देव संतुष्ट होतो आणि भजन करणाराला पुण्य लागतें. ॐ ह्याचाच जप नियमित काळीं केल्यानें 'उ' आणि 'म्' यांच्याशीं ज्यांचें वाच्य आणि वाचक असले संबंध आहेत त्या देवताहि संतुष्ट होतात. तिसऱ्या विवेचनांत हा भाग पुढें यावयाचाच आहे. तिसऱ्या विवेचनास आरंभ

करण्यापूर्वी ॐकारावर एक आक्षेप घेण्यांत येतो त्याची विल्हेवाट लावली पाहिजे. राष्ट्रीय भावना असली म्हणजे झालें; ह्या भावनेमुळें रणाङ्गणावर प्राण अर्पण करण्यासहि मानव मागेंपुढें पहात नाहीं; मग ॐकाराचा जप नियमितपणें करा कशाला? ही उठाठेव कोणी सांगितली आहे! शत्रूचें भय न राखितां रणाङ्गणावर प्राणहि अर्पण करण्याची वेळ आली असतांना प्राणावर उदार झालें पाहिजे; आणि ही बाब राष्ट्रीय भावनेसहि साधते; हें कबूल केलें पाहिजे. पण मूळचा दुष्ट असलेला मनुष्य त्यामुळें निष्पाप होत नाहीं. आणि तो दुष्ट असल्यामुळें त्याच्या लोभास इतर देशांतील लोकांशीं वागतांना आळा बसत नाहीं. ह्यामुळें मानवी जातीचें अपरंपार नुकसान झाल्याचीं उदाहरणें इतिहासांत सांपडतात. प्रत्येकानें आपली उन्नति आपल्या हातूनच करून घेतली पाहिजे, हें खरें आहे. पण जितांशीं संबंध आल्यावर सत्ताधारी साधुपुरुषसुद्धां आपल्या शीलापासून च्युत होतात; स्वराज्यांतसुद्धां सत्ताधारी हे शीलवंत अर्थात् निष्पाप जर नसतील तर प्रजाजनांवर जुलूम होईल आणि प्रजा गांजलेली दिसेल. स्वराज्य असो किंवा परराज्य असो, लोकांचें कल्याण व्हावें ह्या हेतूनें वागणारे सत्ताधारी असले पाहिजेत. शीलधर म्हणजेच निष्पाप सत्ताधारी निर्माण करण्याचा मार्ग कोणता? परमेश्वराचें भय ज्याला वाटतें त्याचे हातून गैरवाजवी गोष्ट सहसा होत नसते. प्रत्येक धर्मामध्यें परमेश्वराला भिणारे सद्वर्तनी लोक असतात, नाहीं असें नाहीं. परंतु दुष्ट लोक त्यांना सत्ताधारी करण्यास आडवे येतात. म्हणून परमात्म्याची आराधना करून आत्मशुद्धि केल्याशिवाय गत्यन्तर नाहीं. ही आराधना करावयास ॐकाराचा जप नियमित काळीं केला पाहिजे. 'अ'कार, 'उ'कार आणि 'म'कार हे कोणत्या शक्तीचे प्रतिनिधि आहेत ह्याचें ज्ञान झाल्यावर त्या त्या शक्तीचें ध्यान लावतां आलें पाहिजे; म्हणजे मानव धुवून काढल्याप्रमाणें निष्पाप होतो. आधींच हें विवेचन लांबल्यामुळें पुढील विवेचनावर हा विषय टाकणें भाग आहे.

# विवेचन तिसरें

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात् कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥

भगवद्गीता

## वैश्वानर देवतेचें म्हणजेच प्रत्यक्ष संसाराचें ज्ञान

भगवद्गीतेंतील ह्या श्लोकांत अभ्यास, ज्ञान, ध्यान, आणि कर्मफलत्याग, ह्यांचें तारतम्यानें वर्णन केलें आहे. ह्या तारतम्याचा उपयोग करून ॐकाराचे जपाला सुरवात केली पाहिजे. राम–कृष्णाचे पराक्रम आठवून आणि त्यांच्या मूर्ति पुढें ठेवून 'हरे राम' किंवा ' हरे कृष्ण ' ह्या जपाचें आवर्तन करावयाचें झाल्यास गीतेंतील ह्या श्लोकांतील तारतम्याकडे तितकेसें लक्ष न पुरविल्यास चालणारें आहे. तारतम्यांतील शेवटच्या दोन पायऱ्यांचा–कर्मफलत्याग आणि शान्ति–ह्यांचा विचार प्रारंभीं करणें भाग आहे. पहिल्या तीन पायऱ्यांचा नित्य अभ्यास केला असतांना बाकी राहिलेल्या दोन पायऱ्यांचे विचार आपोआपच सुचणारे आहेत. ' हरे राम ' किंवा ' हरे कृष्ण ' ह्यांचे जपाची स्थिति निराळी आणि ॐकाराचे जपाची गोष्ट निराळी. पराक्रमाची बाब हरएक मानवास समजते; समज किंवा ज्ञान ह्यांचा प्रश्नच येथें उरत नाहीं; आणि असें असल्यामुळें अभ्यासाला कवाइती स्वरूप येत नाहीं. कर्मांची किंवा अभ्यासाची आणि समजेची किंवा ज्ञानाची येथें गांठ सहज पडत असल्यामुळें निदिध्यास किंवा ध्यान या पायरीचाच विचार करावा लागतो. पण ॐकाराचा प्रश्न वेगळा आहे. ॐकाराचा विचार करीत असतांना बुद्धीला प्रौढावस्था प्राप्त झालेली असावी लागते. बुद्धीला प्रौढ विचार करून समजूं लागेपर्यंत ॐकाराचा जप करणें आणि कवाइत करणें सारखेंच.

ॐकाराचें नुसतें पुस्तकी ज्ञान असूं शकतें. पण ह्या पुस्तकी ज्ञानाचा अनुभव आला पाहिजे. बुद्धीच्या प्रौढ अवस्थेंतच हा अनुभव येतो. वैश्वानर देवता म्हणजे प्रत्यक्ष संसार होय; संसारांतील सुखदुःखांची जाणीव असल्याशिवाय कोणासहि अनुभवी असें म्हणतां येणार नाहीं, आणि असल्या प्रकारचा प्रत्यक्ष अनुभव आल्याशिवाय देवतेचें यथार्थ ज्ञानहि असणें दुरापास्त. व्यापकपणा आणि श्रेष्ठपणा हे गुण 'अ'काराचे आणि वैश्वानर ह्यांचे अंगीं असल्यामुळें साम्य उत्पन्न होणें आणि हें साम्य ओळखतां येणें बुद्धि प्रौढ नसेल तर कठिण होय. बुद्धि प्रौढ दशेंत वावरणारी असल्याशिवाय वरील प्रकारचें साम्य ओळखणें तिला झेपणार नाहीं. राम-कृष्णांचे पराक्रम ओळखणें तितकेसें कठिण नाहीं. संसारांतील एक सद्गुण ओळखून आणि त्याला अनुसरून त्याचें ध्यान किंवा निदिध्यास करणें सत्संग घडला असतांना बुद्धीला प्रौढावस्था आली नसतांहि होणारें आहे. बुद्धीला न झेपणारें तें ध्यानाच्या कामीं त्याज्य होय. मूर्तीला पुढें ठेवून ध्यान लावणें निराळें आणि वैश्वानर व 'अ'कार यामधील साम्य ओळखून ध्यान लावणें निराळें. पुस्तकी ज्ञान असल्यावरहि संसाराच्या प्रत्यक्ष सुखदुःखांचा जर अनुभव नसला तर ध्यान लावणें हें बुद्धीच्या आटोक्याच्या बाहेरचें ठरल्यावांचून राहणार नाहीं. ॐकाराचेसंबंधानें विचार करीत असतांना हें ध्यान बुद्धीला झेपणारें असलें पाहिजे, ह्या बाबीला महत्त्व येतें. बुद्धीलाहि व्यापकपणा आल्यावांचून श्रीकृष्ण किंवा श्रीरामाच्या पराक्रमाचें ध्यान करण्यावर संतुष्ट असावयास पाहिजे. संसाराचा प्रत्यक्ष अनुभव नसतांहि पुस्तकी ज्ञानाच्या साहाय्यानें बुद्धीला राबविण्याची ताकद ज्यांच्या अंगीं असेल किंवा आपण तल्लख बुद्धीचे आहोंत असा ज्यांचा अनुभव असेल, अशांनीं ॐकाराचीं पुस्तकें वाचून आणि तीं समजावून घेऊन पुस्तकी ज्ञानावर अवलंबून रहावें, व इतरांनीं आपली बुद्धि

प्रौढावस्थेला जाईपर्यंत वाट पहावी, असा इषारा देऊन, स्वप्नस्थानाच्या देवतेकडे आणि ॐकारापैकीं 'उ'काराकडे आतां आपण वळूं या.

## माझा 'केसरीं'त प्रवेश आणि त्याबद्दलची प्रेरणा

मांडुक्योपनिषदांत स्वप्नस्थानाचे देवतेविषयींचें वर्णन चौथ्या मंत्रांत केलेलें आहे. आत्म्याचें म्हणजे ब्रह्माचें हें द्वितीयस्थान होय. ह्याचा अनुभव स्वप्नांत येतो, म्हणून या देवतेला 'स्वप्नस्थान' असें संबोधिलें आहे. स्वप्नें पडत असलीं म्हणजे ह्या देवतेच्या हालचालींचें निरीक्षण करण्यास सांपडतें. स्वप्नें पडत असलीं तरी तीं लहानपणीं आठवत नाहींत, प्रौढपणीं तीं आठवूं लागतात. नजर ठेविली असतांना तीं आठवूं लागतात; आणि लक्ष ठेविलें असतां सबंधच्या सबंध आठवतात! संसाराचे काळजीखालीं मन खचून गेल्यावर जीं स्वप्नें पडतात तीं सूचक असतात. काळजीचें ओझें मनाला असह्य वाटूं लागलें म्हणजे आत्म्याची शक्ति जागी होते; आणि असें असें कर म्हणून स्वप्नामार्फत अर्धवट मार्ग दाखविते. सेकंड एल्.एल्. बी. टर्म संपल्यावर पुढें काय करावयाचें ह्याची मला काळजी लागलेली होती; परीक्षेला बसण्याइतपत अभ्यास झालेला नव्हता; कोठें लिहिण्याची सोय होईल काय ह्या विवंचनेंत मी होतों; ही विवंचना सुरू झाल्यानंतर स्वप्नांत 'केसरी' हीं अक्षरें दोनदां स्पष्ट दिसलीं. जागेपणींहि लय लाविला असतांना तोच प्रकार स्पष्टपणें अनुभवास आला. पुढें दे. नारायण बापुजी कानिटकर ह्यांची व माझी गांठ श्री. गणपतराव पागे ह्यांचेमार्फत पडली. त्यावेळीं मीं लिहिलेलें 'सवाई माधवराव' हें नाटक आणि श्री. गोळ्यांनीं लिहिलेल्या 'ब्राम्हण व त्यांची विद्या' ह्या पुस्तकावरील माझी टीका 'विविधज्ञान विस्तार' ह्या मासिकांतून प्रसिद्ध झाली होती. 'विविधज्ञान विस्तार' हें मासिक दे. नारायण बापुजी कानिटकर ह्यांच्या वाचण्यांत येत असे. माझे दोनहि लेख त्यांच्या

वाचनांत आलेले होते. माझा अभ्यास झालेला नाहीं असें शेवटची टर्म भरीत असतांना मीं म्हटल्यावरून त्यांनीं 'केसरी'चें नांव सुचविलें. पुढें टर्मचे दिवस पुरे होतांच शुक्रवारीं मुंबई सोडून शनिवारीं सकाळीं पुण्यास गेलों. जातांक्षणीं दे. नारायण बापुजी कानिटकर ह्यांना भेटलों. दोनप्रहरीं लो. टिळकांना भेटून काय तें सांगतों, असें उत्तर आलें. मी संध्याकाळीं पुन्हां भेटावयास गेलों तेव्हां मला 'लो. टिळकांकडे उद्यां घेऊन जातों' असें दे. कानिटकरांनीं सांगितलें. मी कोण आहें, आणि माझे लेख कसे आहेत, ह्याविषयीं दे. कानिटकरांनीं सर्व कांहीं सांगावयाचें होतें तें सांगून टाकलेलें होतें. म्हणून रविवारीं गांठ पडली असतांना एकदम 'केसरी' साठीं अग्रलेख लिहिण्यास लो. टिळकांनीं मला सांगितलें. तो विषय "राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता" हा होता. श्रीगणपतिमहोत्सवाला आरंभ होण्यास १८९६ सालीं दोन आठवड्यांचा अवधि होता. मला विषय देतांना कशा तऱ्हेनें लिहिला असतां त्यांना तो पसंत पडेल हें सांगून अमुक अमुक पुस्तकांतून त्याची माहिती आलेली आहे हेंहि मला सांगून टाकलें! रविवारचा दिवस माहिती गोळा करण्यांत मीं घालविला आणि सोमवारीं सकाळीं अग्रलेख लिहून टाकला. माझा तो लेख माझे मित्र रा. वामनराव पटवर्धन व रा. गणपतराव अभ्यंकर ह्यांना वाचावयास दिला. त्यांनीं पसंत केल्यावर लो. टिळक यांचेकडे तो लेख घेऊन गेलों. लो. टिळकांनीं वाचून पाहिला आणि प्रुफें तपासण्याकरितां तुम्हांस येण्याची आवश्यकता नाहीं, मीच प्रूफें तपासून देतों, असें मला सांगितलें. दुसऱ्या दिवशीं 'केसरी'त माझा अग्रलेख प्रसिद्ध झाला. नंतर लो. टिळकांनीं त्याच विषयावर दुसरा लेख लिहिण्यास मला सांगितलें. तोहि लेख 'राष्ट्रीय महोत्सवाच्या वेळीं सुशिक्षितांनीं काय केलें पाहिजे' हा मीं लिहिला आणि दुसऱ्याच दिवशीं तोहि प्रसिद्ध झाला. इतक्यांत श्रीगणपति महोत्सवास १८९६ सालीं प्रारंभ झाला होता आणि

व्याख्यानांची झोड उठून गेली होती. त्या व्याख्यानांची हकीकत लिहून काढण्याचें काम माझ्यावरच लो. टिळकांनीं सोंपविलें होतें. त्यावेळीं माझे वडील बंधु मंगळवेढयास मुन्सफ होते; त्यांना समजलें कीं पुण्यास येऊन मीं 'केसरीं'त नोकरी करीत आहें. माझे दोन लेख वाचून ते खूष झाले, आणि मीं लिहिलेली व्याख्यानांची केसरींतील हकीकत वाचून त्यांनीं माझें कौतुक केलें आणि तसें पत्रीं लिहून मला कळविलेंहि. वडील बंधु काय म्हणतील ह्या काळजींतून मी मुक्त झालों. स्वप्नांत दोनदां आणि जागेपणीं एकदां 'केसरी' हीं अक्षरें मला कशीं दिसलीं आणि 'केसरी'चा व माझा संबंध कसा जुळून आला; ह्यासंबंधानें हकीकत जशी घडून आली तशी विस्तारानें येथें देण्यांत आली आहे.

## स्वप्न स्थिति म्हणजे लिंगदेहाची स्थिति

स्वप्नस्थानांचा विचार करितांना इंद्र आणि प्रजापति ह्यांमध्यें झालेल्या आणि छांदोग्योपनिषदांतून आलेल्या संवादाची आठवण होते. स्वप्नस्थानासंबंधानें इंद्राचें असें म्हणणें आहे कीं स्वप्नांतील स्थितींत कांहीं 'भोग्य' दिसत नाहीं. शरीराला लागलेलें रोगाचें दर्शन जरी ह्या स्थितींत झालें नाहीं आणि 'श्रान्त' शरीर जरी दिसलें नाहीं तरी शरीर रडतें असा अनुभव येत असल्यामुळें ' भोग्य ' किंवा ' मंगलादायक ' कांहीं मला दिसत नाहीं अशी तक्रार इंद्रानें प्रजापतीपुढें मांडली आहे. भयरहित आणि अमर ब्रह्म असें या स्थितीला कोणी म्हणणार नाहीं, असें इंद्रानें प्रतिपादन केलें आहे. स्वप्नस्थितींत लिंग देहाचा विचार करावयाचा असतो. स्थूल देहाचे विकार लिंगदेहाशीं संबद्ध असतातच असें नाहीं. बाहेरच्या कारणामुळें स्थूल देह अंध झाला असेल तर ह्या अंधत्वाचा अनुभव स्वप्नस्थितींतहि येतो असें नाहीं. स्थूल देहापेक्षां लिंगदेह निराळा आहे आणि स्थूल देहाचे नाशावरोबरच लिंगदेहाचाहि

नाश होत नसल्यामुळें अमर आत्मा किंवा ब्रह्म हेंच होय अशी इंद्राला भ्रांति झाली. पण हें ब्रह्म रडवें आहे असें कांहीं विचार केल्यावर त्याला कळून आलें; म्हणून तो प्रजापतीकडे फिरून आला ! स्थूल देहाबरोबर लिंगदेह नाश पावत नाहीं, असें टीकाकारांचें म्हणणें आहे. कारण मन व बुद्धि यांचा मिलाफ सूक्ष्म स्थितींतील पंचज्ञानेंद्रियांशीं होऊन लिंगदेह झालेला असतो. स्वप्नस्थितींत एकटें मनच जागें असतें. आपण काय पाहिजे तें आहोंत, अशी त्या मनाला कल्पना करतां येते. म्हणून ज्याचा उपभोग मनानें घेतला असेल त्या स्थितींत—व्यंगरहित स्थितींत मन जातें. पण मनाला आपण मरतों आहोंत असें वाटून तें रडूं लागतें. हा स्वप्नस्थितीचा अनुभव हरएक माणासाला येतो. म्हणून स्वप्नस्थितींत असतांना लिंगदेहाचे अनुभव आपणास येतात. आपण महाराज आहोंत असा भास मनाला होऊन तें महाराजासारखें वागूं लागतें. आपण गुदमुरलों जात आहोंत व मरण अगदीं जवळ ठेपलेलें आहे, असें त्याला वाटून तें रडवें होतें. स्वप्नस्थिति म्हणजे लिंगदेहाची स्थिति होय, किंबहुना लिंगदेह म्हणजे काय ह्याचीं वर्णनें स्वप्नस्थितीचें अवलोकन करूनच केलेलीं असलीं पाहिजेत. स्वप्नस्थितीचें असलें वर्णन मांडुक्योपनिषदांतील विवेचनाशीं कसें जळतें आहे हें पहाण्यापूर्वी जागृतस्थानाचा अधिपति असलेल्या वैश्वानराच्या वर्णनाशीं छांदोग्योपनिषदांतील प्रजापति—इंद्र संवादाचें साम्य कोठें आहे, हें पाहू या.

## देह—ब्रह्म—वाद आणि वैश्वानर—वाद

कसें जुळतें हें पाहूं लागल्यास असें आढळून येतें कीं हें साम्य बाहेरच्या वर्णनांत आहे. छांदोग्यांत वैश्वानराचें वर्णन कोठेंहि नाहीं. वैश्वानर ही देवता आहे, ह्या वर्णनास बगल देऊन प्रजापतीकडे दैत्यांचा विरोचन व देवांचा इंद्र हे गेले असतांना प्रजापतीनें सांगितलें कीं आपला देह स्वच्छ केल्यावर

आणि सुशोभित केल्यावर पाण्यांत किंवा आरशांत पाहिलें असतांना जें दिसतें तेंच अमर व अभय ब्रह्म किंवा आत्मा होय. विरोचन व इंद्र दोघेहि ह्या अनुभवानें खूष झाले. कारण दोघेहि अमर व अभय ब्रह्म कोणास म्हणावें हें प्रजापतीस विचारण्यास गेले होते. अशा रीतीनें ते दोघेहि संतुष्ट झाले. पण देह म्हणजे आत्मा होय ह्या शिकवणुकीवर इंद्राचा विश्वास बसला नाहीं. कारण देहास मरण असतें; आणि आत्मा अविनाशी अशी इंद्राची समजूत होती. असें असल्यामुळें 'भोगी' किंवा मंगलदायक अशा ह्या वर्णनांत कांहींच तथ्य दिसलें नाहीं. पण विरोचनाची तशी स्थिति नव्हती. दैत्यांत तो गेला, त्यानें देह–ब्रह्म–वाद दैत्यांना शिकविला. दैत्यांचा हाच सांप्रदाय होऊन बसलेला आहे. ह्या सांप्रदायांत देहाला संभाळलें म्हणजे सर्व कांहीं संभाळलें जातें असें वर्णन आहे. देह–ब्रह्म–वाद व वैश्वानर–वाद ह्यांत मोठा फरक आहे. देहाला नटवावें व ख्यालीखुशालींत आपण असावें असें सांगणें हें वैश्वानर ह्या देवतेची उपासना करावी असें सांगण्याहून निराळें आहे. देह–ब्रह्म–वाद ही दैत्यांची शिकवणूक आहे. अजूनहि आपलपोटे लोक ही शिकवणूक पाळतात. त्यांचें आणि निर्लोभी माणसांचें कसें जमावें ? परमेश्वरावर भरंवसा न ठेवणारे देखील निर्लोभी असतात; पण क्वचित्! परमेश्वर आहे असें म्हणणारे आणि 'तेन त्यक्तेन भुंजीथाः' त्यानें त्याग केला असेल त्याचा उपभोग घ्यावा, अशी त्याची आज्ञा पाळणारे लोक आणि दैत्य स्वभावाचे लोक यांचें कांहीं केल्या पटणार नाहीं. परमेश्वर आहे म्हणजे वैश्वानर ही देवताहि आहे. ॐकाराचा जप केल्यानें वैश्वानर देवता प्रसन्न करून घेतां येते. निर्लोभी माणसें ह्याच मार्गानें जावयाचीं! 'लोभमूलानि पापानि' ह्या वचनावर त्यांचा विश्वास असून निर्लोभपणा व निष्पापपणा हीं एकच आहेत असें त्यांना वाटत असतें. स्वराज्यांतसुद्धां निर्लोभ माणसांच्या हातीं सत्ता असावी लागते, हें मागें

सांगण्यांत आलेंच आहे. परमेश्वराचें ज्याला भय वाटत नाहीं तो निर्लोभ माणूस होऊंच शकत नाहीं. अस्तु; अशा रीतीनें छांदोग्यांतील प्रजापति–इंद्र संवादांतील जागृतावस्था व स्वप्नस्थिति ह्यांचीं वर्णनें संपवून सुषुप्ति अवस्थेस आरंभ करण्यापूर्वी मांडुक्योपनिषदांतील राहिलेल्या स्वप्नस्थितीच्या वर्णनाकडे मागें वळूं या.

## स्वप्नस्थानाची तैजस देवता

मांडुक्याप्रमाणें स्वप्नस्थानाच्या ह्या देवतेचें नांव तैजस असें आहे. सविता देवाच्या तेजाची किंवा दीप्तीची आराधना व तप केलें असतांना सविता देव प्रसन्न होऊन, अमुक प्रसंगीं असा वागूं नकोस तमुक प्रसंगीं तसा वाग अशी बुद्धीला प्रेरणा करितो. म्हणून ॐकाराचा जप करावा आणि दैदिप्यमान सविता देवाचें ध्यान करावें, असें टीकाकारांनीं सुचविलें आहे. स्वप्नस्थानाच्या मांडुक्यांतील तैजस नांवावरून हे विचार सुचलेले असावेत आणि गायत्री मंत्राला एका बाजूस सारण्याचा विचार नसावा, असें आम्हांस वाटतें. तैजस असें नांव सांगून त्या देवतेला सात अंगें आणि एकोणीस मुखें आहेत, असें वर्णन आहे. लिंग देहांतील जी मानसिक स्थिति असते, त्या स्थितीचा अनुभव स्वप्नांत येत असतो. आपण महाराजा आहोंत, आपण आपल्या नोकरांना हुकूम करीत आहोंत, कधीं कधीं हत्तीला जसा कोंडमाऱ्यांत पकडण्यांत येतें तसें गुदमरून आपण जात आहोंत आणि मरणाची पाळी आल्यामुळें आपण रडत आहोंत, असें भिन्न भिन्न स्थितीचें बृहदारण्यक उपनिषदांत स्वप्नस्थानाचें वर्णन केलेलें आढळतें. स्वप्नस्थानांत मनाला बेछूट होतां येतें; आणि जागृतस्थानाप्रमाणें वस्तुस्थितीस मनाला संभाळावें लागत नाहीं. मनाच्या व्यापाराला त्या स्थितींत कोणताहि अडथळा होत नाहीं. पण मनाला झालें तरी बाकीच्या अंगांचा उपयोग करून घेणें भाग आहे.

जागृतावस्थेंत वैश्वानर देवतेला जीं अंगें सांगितलीं आहेत, तींच अंगें मनोमय तैजस देवतेचीं सांगण्यांत आलीं आहेत. मानसिक स्थिति म्हणजे तेजाची स्थिति होय, म्हणून वैश्वानर देवतेहून भिन्न अंगांचें वर्णन केलेलें नाहीं. मनानें जागृतावस्थेमध्यें प्रत्यक्ष उपभोग घेतले असतील किंवा तर्कावर अवलंबून राहून मनाला जे उपभोग काल्पनिक रीतीनें घ्यावेसे वाटत असतील त्याहून भिन्न असें मनाचें जरी राज्य असलें तरी मनाला स्वप्नस्थितींत तसें होतां यावयाचें नाहीं. एवंच वैश्वानर देवतेला जीं अंगें आहेत आणि जीं मुखें सांगितलीं आहेत तींच अंगें आणि तींच मुखें तैजस देवतेचीं आहेत, असें म्हणणें भाग पडतें. स्वप्नस्थितींत ह्या मनोराज्यांत मनाला कोणचें सुख उपभोगावयास मिळतें? मनाच्या मार्फत 'प्रविविक्त' सुख भोगावयास तैजस देवतेला मिळतें, असें वर्णन मांडुक्योपनिषदांत केलेलें आहे. 'प्रविविक्त' म्हणजे काय? ह्या प्रश्नाचें उत्तर पुढील विवेचनांत वाचकांस देण्यांत येईल.

---

# विवेचन चौथें

स्वप्नस्थानस्तैजस उकारो द्वितीया मात्रोत्कर्षादुभयत्वाद्वोत्कर्षति ह वै ज्ञानसंततिं समानश्च भवति नास्याऽब्रह्मवित्कुले भवति य एवं वेद ॥ १० ॥

—मांडूक्योपनिषत्

## तेजोमय देवतेची नितांतसुंदर आवड

तैजस देवता "प्रविविक्ता"चा उपभोग घेणारी आहे. 'प्रविविक्त' ह्याला इंग्रजी शब्द 'एक्स्विझिट' (Exquisite) 'नितांतसुंदर' असा वापरला आहे. प्रविविक्त म्हणजे प्रकर्षेण विविक्त—छानलेल्यांत छानलेलें—सूक्ष्मांत सूक्ष्म—असा अर्थ घ्यावयास कांहीं हरकत नाहीं. छानदार किंवा 'नितांतसुंदर' हाहि अर्थ जुळून दिसणारा आहे. तैजस ही देवता स्वप्नस्थानाची आहे. अगोदरच देवता तेजोमय मग तिला नितांतसुंदर पदार्थ आवडतो ह्यांत नवल नाहीं. स्वप्न पडलें असतांना ह्या देवतेच्या कब्जांत मानव जातो. उपभोगिलेल्या किंवा न उपभोगिलेल्या वस्तूंमध्यें नितांतसुंदर आपणांस असावें असें त्याला वाटतें; मरावेंसें वाटल्यास तो झोकांत मरण्यास तयार होतो. रडावेंसें वाटल्यास तो मनमुराद रडतो. सूक्ष्मांत सूक्ष्म असल्याशिवाय ह्या देवतेचें समाधान होत नाहीं. स्वप्नांत मनोराज्याला कोणताहि अडथळा येऊं शकत नाहीं; आणि तशांत तैजस ही देवता स्वप्नाचे स्थानीं असल्यामुळें मनाचे राज्याला पुष्कळ वाव मिळतो. मन दुष्ट असूं शकतें अगर चांगलेंहि असूं शकतें. मनाची रचना त्याच्या हातून घडलेल्या सुकृतावर अवलंबून रहाते. पुण्य घडलें असेल तर मनाची प्रवृत्ति अधिक पुण्य आपल्या हातून घडावें अशी असते, मन पापी असलें तर मनाची प्रवृत्ति अधिक अधिक

पाप करण्याकडेच होऊं लागते. बुद्धीला तारतम्य सुचून तिच्याकडून मनाला लगाम घातला जावा तेव्हां तें मन पापी वासना सोडून देतें. मन कह्यांत ठेवण्याचें सामर्थ्य निश्चयानें वागणाऱ्या बुद्धीच्या अंगीं असतें. अशा माणसाचें पाऊल केव्हांहि वाकडें पडत नाहीं. पण बुद्धि निस्तेज असली म्हणजे वैश्वानराचें जागृतस्थान असतांना व ती देवता स्थूलाचा उपभोग घेणारी असतांनाहि मनाच्या 'मनोराज्या'ला आळा बसूं शकत नाहीं. मग स्वप्नस्थानीं असलेल्या तैजस देवतेकडून अशा स्थितींत आळा कसा बसूं शकेल ?

## वासनांप्रमाणें स्वप्नांचा ससेमिरा

पापी मनाला जागृतावस्थेंत जे पापी विचार सुचतात आणि ज्या पापी विचाराला अनुसरून ' मनचे मांडे ' खावयास तें सोकावलेलें असतें, त्या पापी विचारांचा स्वप्नस्थितींत अतिरेक होतो. अशा माणसाला स्वप्नें फार पडतात, स्वप्नांत अतिरेक झाल्यामुळें तो गांगरून जातो. दुष्ट वासनांचे स्वप्नांपासून आपणांस देवानें सोडवावें, असें त्याला होऊन जातें. बुद्धि जागृतावस्थेंत निश्चयानें पालटल्याशिवाय कांहीं केल्या स्वप्नांतील हा त्रास सोसणें सुटत नाहीं. आपण आपल्या पापी व्यूहांत फसलों आहोंत अशा प्रकारचीं स्वप्नें वारंवार पडूं लागतात आणि मनाचें प्रायश्चित्त आपणांस घेणें स्वप्नांत भाग पडत आहे असा अनुभव येऊं लागतो. आपण अशा वेळीं गांगरून जाऊन स्वप्नांत मोठमोठ्यांदा आक्रोश करूं लागतो आणि स्वप्नस्थानीं असलेली तैजस देवता सतेज होऊनच आपणांस मारपीट करीत आहे असें वाटूं लागतें. ती देवता आपणांवर हल्ला करतांना वाघाचें रूप धारण करिते, केव्हां केव्हां मस्त हत्तीचें रूप धारण करिते आणि केव्हां केव्हां चोर होऊन छातीवर बसते. आपण ओरडूं लागलों म्हणजे शेजारीं निजलेल्यांना आपणांस जोरानें हांका

मारून जागें करणें भाग पडतें. भित्याच्या पाठीं ब्रह्मराक्षस, अशी स्थिति स्वप्नांत होऊन जाते. अशीं दुष्ट स्वप्नें फार पडूं लागलीं म्हणजे समजावें कीं आपल्या पापाचरणास धरबंध उरला नाहीं. अशा स्थितींत आपण प्रयत्न केल्यावरहि आपणांस योगाभ्यास साधेनासा होतो. मग आपल्या सुकृताचे जोराप्रमाणें सत्पुरुषाची गांठ पडून ॐ ह्या अक्षराचा जप करण्याकडे प्रवृत्ति होते.

## ॐकारांतील उन्नतिदर्शक 'उ'कार

ॐ हा मंत्र 'अ, उ, म्' ह्यांचा संधि होऊन झालेला आहे. वैश्वानराचें व 'अ' ह्या अक्षराचें साम्य कसें आहे हें मागील विवेचनांत सांगितलें आहे. वैश्वानराचें आणि 'अ' ह्या अक्षराचें साम्य असलें तरी जप करितांना ॐ ह्या सबंध मंत्राचा जप केला पाहिजे. ह्या सबंध मंत्राचा जप केल्यामुळें जसें वैश्वानर देवतेला प्रसन्न करून घेतां येतें तसेंच वैश्वानर देवतेप्रमाणें स्वप्नस्थानीं असलेल्या तैजस देवतेलाहि प्रसन्न करून घेऊन आपणांस उन्नतीचा मार्ग मोकळा करून घेतां येतो आणि 'म्'काराच्या प्राज्ञ देवतेलाहि प्रसन्न करून घेतां येऊन 'प्राज्ञ' म्हणजे 'बुद्धीला' नियमन घालतां येतें. 'अ'कार, 'उ'कार आणि 'म'कार मिळून 'ॐ' होतो आणि मिळून जप केल्यानें तीनहि देवता जागृत होऊन जप केल्याचें फळ मिळतें. श्रेष्ठपणा किंवा अभयपणा हें 'अ' काराचा जप करण्याचें फळ आहे; उन्नतीच्या मार्गाला लागून दोन्हीकडे समदृष्टि ठेवणें असें 'उ'काराचें फळ आहे, आणि संसाराचा उपशम करून निव्वळ आनंदाकडे बुद्धीच्यामार्फत लक्ष ठेवणें असें 'म्' काराचें फळ आहे. हीं फळें परस्परांना विरुद्ध नसून हीं सर्व परस्परांना पोषकच आहेत असें ध्यानीं येईल.

## केसरीकार ह्या नात्याची उन्नति

'स्वप्नांत' दोनदां आणि जागेपणीं एकदां 'केसरी' हीं अक्षरें दिसून

माझा व लो. टिळकांचा संबंध घडून आला आणि त्यामुळें लो. टिळक मला नांवें ठेवतील असा त्यांचा धाक मला वाटूं लागला. पुढें नाटकी मंडळींचा सहवास घडल्यामुळें तेथील ठळक ठळक दोष मला लागावयाला पाहिजे होते. पण लो. टिळकांच्या दराऱ्यामुळें आणि त्यांनीं मला केसरीकार ह्या नात्यानें त्यांच्या बरोबरीच्या उन्नतीच्या मार्गाला लावल्यामुळें नाटकी मंडळीच्या अंगच्या ठळक ठळक दोषांपासून माझा बचाव झाला, हे लो. टिळकांचे माझ्यावर उपकार झाले आहेत, असें येथें मी नमूद करून ठेवीत आहें. केसरीकार म्हणून ज्या उन्नतीच्या मार्गावर मी चढलों त्या मार्गाचा हा गुण आहे. अगदीं प्रारंभापासूनच मला दत्त–भक्तीचा छंद असल्यामुळें प्राणायाम करण्याकडे माझ्या मनाची प्रवृत्ति होती. ह्यामुळें ॐकाराकडे माझें लक्ष लागलें.

'ऊ' म्हणजे उत्कर्ष. वर ओढणें, वर घेणें आणि उन्नति करणें, असा 'उत्कर्ष' ह्या शब्दाचा अर्थ आहे. 'उ' हा उच्च आहे, आणि 'अ'कार व 'म'कार ह्या दोन मात्रांशीं त्याचा संबंध आहे. हा संबंध असल्यामुळें सर्वांशीं समदृष्टीनें वागण्याचें पुण्य त्याला लागतें; आणि उभयत्वाचा गुण किंवा सजोड असल्याचा गुण त्याला लागतो. 'उ'काराचा उच्चार करतांना दोन ओठांशीं त्याचा संबंध येतो, आणि त्यामुळें उभयत्वाचा हा गुण त्याच्या अंगीं आलेला दिसतो. 'उ'कार उन्नतिकारक असल्यामुळें आणि जागृतावस्थेशीं व स्वप्नस्थितीशीं 'उ'काराचा संबंध असल्यामुळें तैजस ह्या देवतेशीं 'उ'काराचें साम्य किंवा सादृश्य दिसून येतें. तैजस ही बुद्धीची देवता आहे, बुद्धि तेजोमय असते. बुद्धि म्हणजे अंतःप्रज्ञा. वैश्वानर ही देवता बहिःप्रज्ञ आहे. कारण प्रत्यक्ष संसारच वैश्वानर. स्वप्नस्थितींत बुद्धि ही मनाकडे झुकलेली असल्यामुळें मनोराज्य हां हां म्हणतां सुरू होतें आणि बुद्धीच्या मूळ अंशाला म्हणजे

तेजाला काम करण्यास सवड मिळत नाहीं. जागृतावस्थेंत ज्याची बुद्धि सतेज असते किंवा बुद्धीचा तेजाचा अंश प्रखर असतो अशा व्यक्तीला ज्ञान, सदसद्विवेक, भावना, निश्चय इत्यादि मानसिक सामर्थ्य प्राप्त होतें; कारण ह्या सामर्थ्याचें उगमस्थान तैजस ही देवता होय. मनुष्याची उन्नति होणें हें अंत:प्रज्ञेवर अवलंबून आहे.

## स्वप्नस्थितींत अचुक व प्रेरक स्वप्नें

अंत:प्रज्ञ जो माणूस असतो किंवा ज्या माणसाची आंतील–बाहेरची नव्हे–विचारशक्ति जाज्वल्य असते, म्हणजे वस्तुस्थितीपासून अलग असलेल्या विचारांतच गढून जाण्याची ज्या माणसाला संवय असते त्याला तैजस ह्या देवतेमुळें स्वप्नस्थितींत सूचक आणि प्रेरक स्वप्नें पडतात, आणि त्याचा उन्नतीचा मार्ग मोकळा होतो. कारण ज्ञान, सदसद्विवेक, भावना आणि निश्चय इत्यादि मानसिक सामर्थ्य त्याच्याच बुद्धीला स्वप्नस्थितींत प्राप्त होऊं शकते, आणि तैजस ही देवता स्वप्नांचीच असल्यामुळें प्रेरणात्मक स्वप्नें पाडण्याकरतां ही देवता स्वप्नामध्यें अंगीं असलेलें तेज मनाच्या अंगीं चढवून तें कार्यक्षम करीत असतें. 'उ' काराचें प्रतीक उन्नतिकारक असून त्याचा 'अ'काराशीं व 'म्'काराशीं संबंध येतो. त्यामुळें 'उ' काराचा वैश्वानर देवतेशीं संबंध येत असून संसाराचें उपशमन करणाऱ्या 'म'काराशींहि त्याचा संबंध येतो. संसार व त्याचें उपशमन ह्या दोहोंशीं 'उ'काराचा अन्वय असल्यामुळें सर्वांशीं समान किंवा समदृष्टि असा हा होतो. ह्याचे उपासनेमुळें उपासकाला पूर्ण ज्ञानाची प्राप्ति होते व तो सर्वांशीं समभावाचें वर्तन ठेवतो आणि त्यामुळेंच तो सर्वांना वंदनीय होतो. ज्याचें वर्तन तेजस्वी मनःपूर्वक घडतें त्याची परंपरा देखील उज्ज्वल राहते. त्याच्या कुळांत ब्रह्मज्ञान नसलेला कोणी असत नाहीं. तैजस

देवतेचें 'उ'कार हें प्रतीक मानून उपासना करणाराला पूर्ण ज्ञानप्राप्ति होते असें फळ श्रुतीनें सांगितलें आहे. ॐकाराचा जप केल्यानें 'उ'काराचाहि जप होतो. वैश्वानर, तेजस आणि प्रज्ञान ह्या देवता भिन्नभिन्न आहेत तरी सर्वेश्वराचे ठिकाणीं ह्या देवता एकच होतात आणि सर्वेश्वराचे प्राप्तीबरोबरच ह्या भिन्न देवतांची प्राप्ति आपोआप होते.

## ॐकाराच्या जपांतील लययोग

ॐकाराचा जप कसा करावयाचा? ॐ ॐ म्हणून जप करीत रहावयाचें; ॐ ह्या अक्षराचा अभ्यास करावयाचा; तोच तो उच्चार अडथळारहित अशा वृत्तीनें केल्यानें मनाचें एकीकरण ह्या वृत्तीवर होतें आणि अभ्यास आपल्या हातून घडतो. मनाचें एकीकरण होऊन मनाला ॐकाराशिवाय दुसरी तिसरी बाब सुचतां कामा नये. निश्चयानें बसल्यास ही वृत्ति साध्य होणारी आहे. ह्या मार्गानें जाणें म्हणजे लययोगानें जाणें होय. हठयोग, राजयोग आणि लययोग असे योगाभ्यासाचे तीन मार्ग आहेत. हठमार्ग ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत वर्णन केलेला आहे. ह्या वर्णनांत लययोगाची भेसळ आहे. "नाद–बिंदू–कला–ज्योति" असा ज्ञानेश्वर महाराजांनीं कुंडलिनी जागृत झाल्यानन्तरचा ऊहापोह करितांना उल्लेख केला आहे. मूलबंध बांधून झाल्यावर पाठीचा कणा ताठ ठेवून मूलबंधाचे जागीं लक्ष ठेविलें असतांना आणि जालंधरबंध व ओढियानाबंध ह्यांच्या जागीं लक्ष ठेविलें असतांना जी स्थिति उत्पन्न होते तिचें वर्णन करतांना ज्ञानेश्वरांनीं वरील ऊहापोह केला आहे. आतां नाद–बिंदू–कला–ज्योति ह्या तत्त्वांचा उपयोग नाहीं, असें ज्ञानेश्वर महाराजांचें सांगणें आहे. तीन बंधांचे ठिकाणीं ह्या तत्त्वांचा उपयोग करून घ्यावा असें महाराजांचें मत आहे. लय–योगाची भेसळ कशी होते? नादबिंदुकलाज्योति हीं लयमार्गांत नमूद केलेलीं तत्त्वें आहेत.

पाहिजे त्या ठिकाणीं मन एकाग्र करून लक्ष ठेविलें असतांना रुधिराभिसरणाचा आवाज कानांत ऐकूं येणें, ह्यालाच नाद म्हणतात. बिंदूची व्याख्या करतांना हरभरे मनांत आणावयास सांगत असतात. हरभऱ्याचा दाणा हा विश्वाचा प्रतिनिधि आहे. द्विदल असलेलें विश्व आकाशाचे गवसणींत बसविलेलें आहे; अशी कल्पना हरभऱ्याच्या दाण्यानें करतां येते. हरभऱ्याचे दाण्यानें जशी विश्वाची रचना सुचविली जाते तशी मानवी देहाची रचना कशी झाली आहे हें बिंदूवरून ध्यानीं येतें. मानवी देहांतील निरनिराळे अवयव किंवा त्यांचे घसघशीत भाग म्हणजेच निरनिराळे बिंदू होत. 'अनाहत' चक्र हृदयाचे जागेवर आहे व त्याचे ठिकाणीं मन एकाग्र करून ऐकण्याची मनास सवय लागलेली असतांना अनाहत ध्वनि ऐकूं येऊं लागतो. हा हृदयाभिसरणाचा ध्वनि आहे. आहत नाहीं अशासारखा ध्वनि असतो त्याला अनाहत ध्वनि म्हणतात.

## मला ऐकूं येणारा अनाहत ध्वनि

नाटकें लिहूं लागलें असतांना किंवा वर्तमानपत्रांतील मजकूर मी लिहीत असतांना केव्हां केव्हां माझें मन एकाग्र होत असे; आणि दहा पंधरा वर्षांपूर्वींपासून मन एकाग्र होऊं लागलें म्हणजे मला अनाहत ध्वनि ऐकूं येण्याचा पाया रचला गेला. परंतु 'बिंदू'वर प्रयोग करण्यास मला माझ्या दुर्दैवानें सवड दिली नाहीं. सहा सात वर्षांपूर्वी माझ्या अंगीं कांहीं पातकें—उदाहरणार्थ रागीटपणाचें आणि अभिमानाचें पातक—होतीं म्हणून अर्धाङ्ग वायूनें आजारी झालों; म्हणून उपनिषदें वाचणें व ह्या वाचनामुळें सुचणारे विचार एकत्र करणें ह्याखेरीज माझ्या हातून आतां कांहीं होणारें नाहीं. सध्यां मला ऐकूं येणाऱ्या अनाहत ध्वनीचा फायदा मी असा करून घेतों कीं रोग ओसरूं लागला म्हणजे त्या ठिकाणचा अनाहत ध्वनि मन एकाग्र करून

मी ऐकूं लागतों; आणि त्यामुळें अधिक जोरानें माझा रोग ओसरूं लागतो. बिंदूवर लक्ष ठेवण्याचा मीं प्रयत्न करूं लागलों म्हणजे त्या प्रयत्नांत मला आतां यश येत नाहीं; मनाची एकाग्रता सुटते आणि कांहींच्या कांहींच मनोराज्यास सुरुवात होते. वृद्धापकाळीं अजूनहि माझ्या पातकांचा जोर आहे, पण भेसळ करावयास ज्ञानेश्वर महाराज कां सांगतात हें माझ्या बुद्धीला समजतें व पटतें. हठयोगांत आणि राजयोगांत लययोगाची भेसळ केल्यावांचून दुसरा मार्ग नाहीं.

## बंध, चक्र आणि ॐकार

हठयोग आसनांचा योग आहे. मूलबंधाचे जागीं लक्ष ठेवून मनुष्य बसला म्हणजे कार्यसिद्धि होते, असें महाराजांचें म्हणणें आहे; आसनसिद्धि म्हणजेच कार्यसिद्धि होय! मात्र मुळांतच मनुष्य निष्पाप असला पाहिजे. एरवीं मूलबंधाचे जागीं मन एकाग्र करून रुधिराभिसरण ऐकणें म्हणजे नाद ऐकणें ह्यावांचून सुटका नाहीं. नाद ऐकूं येऊं लागल्यावर बिंदूच्या वरच्या पायरीला सुरवात होते. 'योगेन योगमवाप्स्यते' ही विचारसरणी येथें लागू होणारी आहे. मानवी अवयव बिंदूंनीं झालेले असतात, हें वर सांगितलेंच आहे. मन एकाग्र करून पहाण्याची संवय केली असतांना निरनिराळे अवयवांची ठेवण कशी आहे, अवयवांचे परस्परांशीं कसे संबंध आहेत ह्याचें ज्ञान होतें म्हणजे 'कले'चें ज्ञान होतें, आणि प्रत्यक्ष अवयवांचें दर्शनहि म्हणजे दृष्टीस पडणेंहि होतें. मूलबंध, जालंधरबंध आणि ओढियानबंध, ही ज्ञानेश्वरींत असलेली बंधांची भाषा हठयोगांतून घेतलेली आहे. येथें ती सोडून षट्चक्रांच्या भेदांतील शब्द वापरण्यांत येत आहेत. मूलाधार चक्राचे ठिकाणीं मन एकाग्र केल्यानें मूलाधार चक्राचे ठिकाणीं असलेल्या देवतांचें दर्शन घडतें. निष्पाप मन नसल्यास पापक्षालन होण्यास कांहीं मुदतीची जरुरी आहे. अशा रीतीनें मूलाधार चक्राच्या ठिकाणींच्या देवतांचें दर्शन झाल्यावर स्वाधिष्टान चक्रावर म्हणजे

दुसऱ्या चक्रावर बिंदूचा प्रयोग करावा. स्वाधिष्टान चक्र म्हणजे देहांतील आनंदाचें स्थान होय, आणि बिंदूचा प्रयोग केल्यावर देहांतील आनंदावर ताबा मिळतो. तिसरें चक्र नाभीचक्र होय. येथें असलेली कुंडलिनी देवी बिंदूचा प्रयोग केल्यावर जागी होते. आपण भक्षण केलेल्या पदार्थांपासून, पाण्यापासून आणि वायूपासून रक्त उत्पन्न करणें आणि शरीरास लागणारे हरप्रकारचे जिन्नस उत्पन्न करणें हें काम कुंडलिनीदेवीचें आहे. ही जागी झाल्यावर आपल्याला शरीरावरचा ताबा मिळतो आणि आपण आपल्या शरीराची घडण आपल्या इच्छेनुरूप करूं शकतो. हृदयाचे जागीं असणारें 'अनाहत' हें चौथें चक्र आहे; आणि ह्यापासून अनाहत ध्वनि उत्पन्न होतो. हृदयाचे ठोके इच्छित ठिकाणीं ऐकूं येणें, ह्याला नाद म्हणतात. कवि म्हणजे क्रांतदर्शी जे असतात त्यांना अनाहत ध्वनि ऐकूं येतो. कंठाचे ठिकाणीं पांचवें चक्र आहे आणि सहावें चक्र—आज्ञा चक्र—भिवयांचे मध्यावर आहे. कंठाचा गुण माधुर्य आहे आणि सहाव्या म्हणजे आज्ञाचक्राचा मालक मन आहे. ह्या चंचल मनास स्थिरता प्राप्त झाली असतांना कार्यसिद्धि होते. स्थिरता हा मनाचा गुण आहे. पांचव्या चक्राचे आणि सहाव्या चक्राचे वेळीं गुणाचें ध्यान करावें लागतें. षड्चक्रांचा भेद करून परमेश्वराचें दर्शन घेऊं इच्छिणाराला पहिल्या चार चक्रांचे वेळीं देहाच्या अवयवांचें ध्यान करावें लागतें आणि बाकीच्या दोन चक्रांचे वेळीं गुणांचें ध्यान करावें लागतें. निश्चयेंकरून मन एकाग्र करणें म्हणजे मनाला त्या त्या गुणाचे ठिकाणीं स्थिरता प्राप्त होणें हा लयमार्ग आहे. राजयोगांतहि प्राणायामाला प्राधान्य दिलेलें आहे आणि कांहीं लाख प्राणायाम झाल्यावर अनाहत ध्वनि ऐकूं येऊं लागतो व प्रवृत्तयोग या पदवीस मनुष्य लायक होतो असें वर्णन केलेलें आहे. राजयोगापैकीं ध्यानधारणेचा अभ्यास करून समाधि स्थितीस पोहोंचावें लागतें. ध्यानधारणेचा अभ्यास म्हणजेच लय—योग होय. राजयोगांतहि

लययोगाची भेसळ झालेली आहे. लय-योगानें मनाचें एकीकरण करून ॐकाराचा जप चालू असतांना 'अ' ह्या अक्षराचें प्रतीक मनांत आणून वैश्वानराशीं त्याचें साम्य आठवून आपण सर्वांत श्रेष्ठ व्हावें ह्या गुणाचें ध्यान करावें, 'उ'काराचें प्रतीक आठवून तैजस देवतेशीं त्याचें असलेल्या साम्याचे जोरावर आपला उत्कर्ष व्हावा व आपण सर्वांशीं समदृष्टि ठेवावी ह्या गुणाचें ध्यान करावें, आणि 'म्'काराचें प्रतीक आठवून प्राज्ञ देवतेशीं असलेल्या साम्याचे जोरावर सर्वेश्वराची प्राप्ति करून घ्यावी. सर्वेश्वराची प्राप्ति कशी होते, ह्याचा विचार पुढील विवेचनांत करण्यांत येईल.

---

# विवेचन पांचवें

**एष सर्वेश्वर एष सर्वज्ञ एषोऽन्तर्याम्येष योनिः सर्वस्य प्रभवाप्ययौ हि भूतानाम् ॥ ६ ॥**

मांडुक्योपनिषत्

( हा [ वैश्वानर, तैजस व प्राज्ञ ह्या स्वरूपांचा ] सर्व जगाचा अधिपति, सर्व जाणणारा, सर्वांच्या अंतःकरणांत राहून त्यांचें नियमन करणारा, सर्वांचें उत्पत्तिस्थान आणि भूतांची उत्पत्ति व लय करणारा आहे. )

## सुषुप्ति–स्थानाची प्राज्ञ देवता

प्राज्ञ ही देवता कशाची आहे? प्राज्ञ देवता सुषुप्ति–स्थानाची आहे. सुषुप्त म्हणजे काय? शुद्ध गाढ झोंप हीच सुषुप्तावस्था होय. गाढ झोंप घेणें म्हणजेच सुषुप्त होणें होय. सु अधिक सुप्त मिळून सुषुप्त शब्द झालेला आहे. गाढ निद्रा हा त्या शब्दाचा अर्थ आंहे. ह्यावेळीं बाह्य विषयांचें आकलन करणारी विवेकशक्ति व कल्पनाशक्ति ह्या निजलेल्या असतात. ह्यामुळें त्या कोणत्याहि विषयाची इच्छा करीत नाहींत. विषयांची इच्छा निद्रित असते. स्वप्नस्थानीं असलेली आंतील बुद्धीहि जागी नसते. त्यामुळें ती कोणतेंहि स्वप्न पहात नाहीं. विवेकशक्ति आणि कल्पनाशक्ति गाढ झोंपेच्या अवस्थेंत बुद्धीच्या मूळ स्वरूपाशीं एकीभूत झाल्यामुळें सुषुप्तस्थानीं बुद्धीच्या ह्या निरनिराळ्या शाखांशीं संलग्न ऊर्फ एकीभूत असलेला प्राज्ञ दृष्टीस पडतो. बुद्धीच्या शाखांची गठडी बांधण्यांत आली आहे असें प्राज्ञ देवतेचा अंमल सुरू झाल्यावर म्हणजे मनुष्याला गाढनिद्रा लागली असतांना अनुभव येतो. म्हणून सुषुप्तस्थानीं असलेल्या प्राज्ञ देवतेला "एकीभूत" हें विशेषण लावण्यांत आलेलें आहे. दुसरें विशेषण प्रज्ञान–घन असें आहे.

ह्या अवस्थेंत ज्ञान उत्पन्न होणें बंद झालेलें असतें. ज्ञानाचा बाहेरचा व्यापार किंवा आंतरव्यापार बंद झालेला असल्यामुळें हें एकप्रकारचें ज्ञानाचें घनीभवनच होतें. इच्छा व शब्दादि विषयांची जाणीव नसल्यामुळें ज्ञानाचा संकोच होऊन प्रज्ञानघन हें विशेषण मंत्रांत आलें आहे. ह्यावेळीं बुद्धीचा कोणताहि व्यापार चालत नाहीं. ती व्यापारशून्य असल्यामुळें ब्रह्मस्वरूपाशीं किंवा आत्मस्वरूपाशीं एकरूप होते, परंतु ती अजिबात नष्ट होत नाहीं. कारण आपल्याला येऊन मिळालेल्या बुद्धीच्या द्वारानें आत्म्याला आनंद प्राप्त होत असतो. आत्मा नेहमींच आनंदस्वरूप असतो. पण जीवात्मा हा नेहमींच आनंदस्वरूप असतो असें नाहीं. बुद्धिरूप उपाधि आणि आत्मा जेव्हां संलग्न होतात त्यावेळीं जीवात्मा आनंदरूप होतो. तो गाढ निद्रावस्थेंत मात्र आनंदमय असतो.

## वैश्वानर, तैजस व प्राज्ञ देवतांचा सर्वेश्वरांत मिलाफ

प्रज्ञा म्हणजे बुद्धि ही एकच उपाधि असल्यामुळें प्राज्ञ अशी संज्ञा देण्यांत आली आहे. प्र अधिक अज्ञ असा पदच्छेद करून प्राज्ञ म्हणजे अतिशय अज्ञानी असा अर्थ कित्येक टीकाकारांनीं केला आहे पण तो श्रुतीला मुळींच संमत नाहीं. प्राज्ञाची भूमिका अत्यंत उच्च दर्जाची आहे. प्राज्ञ म्हणजे अज्ञानी हा अर्थ मायावादी लोकांचा आहे. अज्ञानी लोकांस उपदेश करावयास श्रुतीनें आतां प्रारंभ केला आहे, असें म्हणावयास सांपडावें म्हणून मायावादी अशी टीका नेहमींच करीत असतात. पण श्रुति आडवी येऊन श्रुतीनेंच ईश्वराचे जोडीला प्राज्ञ देवतेला बसविलें आहे. प्रज्ञा म्हणजे बुद्धि म्हणून प्राज्ञ ह्या देवतेला ईश्वराचा मान लाभावा ह्यांत नवल नाहीं. ही देवता आनंदमय असते. बुद्धीच्या मार्फत ह्या देवतेला आनंदाचा उपभोग घेतां येतो, म्हणूनच ह्या देवतेला 'चेतोमुख' म्हटलें आहे. चेतः म्हणजेच

अंतःकरण, म्हणजेच बुद्धि. बुद्धि जात्याच तेजाचें अधिष्टान आहे. जेथें तेज असतें तेथेंच आनंद असतो. बुद्धीची जी देवता असते ती आनंदाचा उपभोग घेणारी असतेच. म्हणून ह्या देवतेस आनंदभुक् असें म्हटलें आहे. प्राज्ञ ही देवता प्रतीश्वर आहे. हा सर्वेश्वर आहे म्हणून मथळ्यावरील श्लोकांत ह्याचें वर्णन केलें आहे. हा म्हणजे कोण? हा म्हणजे ह्यांत वैश्वानर देवता, तैजस देवता आणि प्राज्ञ देवता इतक्यांचा समावेश होतो. ह्या तीन देवता मिळून सर्वेश्वर होतो. सर्वांचा ईश्वर तो सर्वेश्वर. 'जगत्यां जगत्' व्यापून रहाणारा, असें सर्वेश्वराचें वर्णन ईशावास्योपनिषदांत केलें आहे. अखिल मानवांचे बुद्धीला प्रेरणा देणाऱ्या वैश्वानर देवतेलाच 'नारायण' देवता हें दुसरें नांव आहे. बुद्धीला प्रेरणा देणाऱ्या देवतेला वैश्वानर असें संबोधितात, त्याप्रमाणें तैजस ही देवता बुद्धीच्या तेजानें चमकणारी आहे. प्राज्ञ ही देवता मुळांतच बुद्धिरूप आहे. अशा रीतीनें बुद्धीशीं संलग्न झालेल्या ह्या तीन देवता आहेत.

## सर्वेश्वराचें प्रतीक ॐकार

आत्मा किंवा ब्रह्म बुद्धीशीं संलग्न झालें असतांना जेथें प्रत्ययास येतें तेथें तें आनंदमयच दिसतें. म्हणून उत्तर वेदांताचे शास्त्रकारांनीं आनंद, चेतना आणि सत्य ह्या पलीकडे जाऊन ह्याची छाननी केली नाहीं. सच्चिदानंद ब्रह्म अशी व्याख्या ब्रह्माची उत्तर वेदांतशास्त्रांत दिलेली आहे. उत्तर वेदांतशास्त्रांत अशी व्याख्या केल्यावर शास्त्रकारांस सत्यास सोडून व पापास कवटाळून मनुष्य जेव्हां वागतो तेव्हां दुःखांचे तावडींत तो सांपडतो असा दुःखाचा खुलासा त्यांना करतां आला. दुःखाबद्दल सर्वेश्वराला जबाबदार धरणें योग्य नाहीं असें ठरविण्यांत आलें. ब्रह्म हें आनंदमय असतांना दुःख जगतांत कां दिसतें याचा हा उलगडा आहे. असो. वैश्वानर, तैजस आणि प्राज्ञ मिळून सर्वेश्वर होतो, असें वर सांगितलें आहे.

सर्वेश्वर म्हणजे सर्व जगाचा अधिपति होय; सर्व कांहीं त्याला समजतें; सर्वांच्या अन्तःकरणांत तो राहतो व तेथूनच सर्वांचें नियमन तो करितो; सर्व विश्वाचें तो उत्पत्तिस्थान आहे; सर्व पदार्थांची उत्पत्ति त्याच्यापासूनच होते; आणि उत्पन्न झालेल्यांचा लय करणारा तो आहे, असें मंत्रांत वर्णन ह्या सर्वेश्वराचें केलें आहे. ह्या वर्णनावरून पाहतां सर्वेश्वर म्हणजेच परमेश्वर असें उघड होतें. राम–कृष्णांचे पराक्रम ऐकून आपणहि त्यांच्याप्रमाणें पराक्रमी व्हावें म्हणून ज्यांची इच्छा असेल त्यांनीं राम–कृष्णांच्या मूर्तींचें ध्यान करावें असें मागील विवेचनांतून सांगितलें आहे. पण परमेश्वर ह्या नात्याची ज्यांना उपासना करावयाची आहे त्यांनीं ब्रह्माचा किंवा परमेश्वराचा वाचक ॐकार असल्यामुळें ॐकाराचाच जप करणें उचित आहे. प्रतीक म्हणून ॐकाराचा जप जिभेनें करावा आणि तेजाचें ध्यान करावें, म्हणजे ईप्सित कार्यसिद्धि होते, असा सिद्धांत आहे. आधिभौतिक ज्ञानाची देवता वैश्वानर असून, ज्ञानाचा बुद्धीशीं संबंध असल्यामुळें आणि ज्ञान तेजोमय असल्यामुळें वैश्वानर देवतेचा आणि तेजाचा संबंध येतोच; तैजस ही देवता तेजाचीच आहे; आणि प्राज्ञ ही देवता बुद्धीची ऊर्फ तेजाचीच आहे. ह्या तेजांचें ध्यान करितांना सूर्यनारायणाचें तेज मनांत आणणें विहित आहे. पण अगोदर ॐ पैकीं मकार बुद्धीचा ऊर्फ प्रज्ञेचा प्रतीक कसा होतो ह्याचा विचार करणें जरूर आहे.

## प्राज्ञ देवतेचें प्रतीक मकार

ॐकारापैकीं मकार प्राज्ञ देवतेचें प्रतीक होय. मकार प्राज्ञ देवतेचें नांव आहे; द्योतक आहे, वाचक आहे. मकार ह्या मात्रेनें ॐकारापैकीं अ आणि उ ह्यांचें परिमाण ठरविलें जातें; मकार ही मात्रा त्यांची मर्यादा ठरविते. मकार मात्रेंत अकाराचा आणि उकाराचा लय होतो म्हणजे त्यांत ते मिळून जातात. विश्वाचा आणि प्रेरणेचा मेळ बसवून मकाराचा उच्चार

करितांना अकार व उकार हीं दोन अक्षरें मकारांतच लय पावतात. विश्वाचें व प्रेरणेचें परिमाण ठरविलें जातें आणि मेळ बसून एकरूप होतें, असें प्राज्ञाचें स्वरूप आहे. सर्व ज्ञानशक्तींचें उगमस्थान प्राज्ञांत म्हणजे बुद्धींत आहे. उच्चारांत आणि मेळ बसविण्यांस मकार आणि प्राज्ञ ह्यांचें सादृश्य आहे. सुषुप्ति अवस्थेमध्यें ब्रह्माशीं उर्फ आत्म्याशीं बुद्धि संलग्न असल्यामुळें आत्मा आनंदस्वरूपी आहे असा अनुभव येतो. सत्यस्वरूपी, चेतनास्वरूपी आणि आनंदस्वरूपी असें आत्म्याचें वर्णन आहे. आत्मा आनंदस्वरूपी असतांना आत्म्याची ती छाप व्यवहारांत कां दिसून येत नाहीं ? व्यवहारांत ऊर्फ प्रपंचांत दुःख कोठून आलें ? व्यवहारांत ऊर्फ प्रपंचांत लोभमूलक पाप आहे आणि पापापासून दुःखाचा जन्म होतो. निर्लोभ मनुष्य जर असेल तर तो पापी आणि दुःखी होणार नाहीं असा ईशावास्याचा सिद्धांत आहे.

## 'पाप्मना विद्ध' इंद्रियें आणि पापापासून दुःख.

जीभ खरें आणि खोटें बोलते; कान जसें असेल तसेंहि ऐकतात आणि विपरीतहि ऐकतात; डोळे सुंदर पाहतात आणि कुरूपहि पाहतात; नाक सुवास घेतें आणि दुर्गंधीहि घेतें; मन एकाग्र होतें आणि भरकटतेंहि; आणि स्पर्शेंद्रिय ऊबदार वस्तूंच्या स्पर्शानें उल्लसित होतें व कठोर वस्तूंच्या स्पर्शानें रडूं लागतें. इंद्रियें आणि बुद्धि ह्यांमधील सांधा मन आहे. दुर्गंधींत जेव्हां मन लोळत असतें तेव्हां बुद्धीला यमयातना होतात आणि ती दुःखी होते. सुवासांत जेव्हां इंद्रिय असतें त्यावेळीं मनासकट बुद्धीला रमवितें आणि सुखी करतें. सुख किंवा दुःख बुद्धीला प्राप्त होणें हें सर्व इंद्रियांवर अवलंबून आहे. पापाकडे इंद्रियें जर झुकत असलीं तर बुद्धीला दुःख होतें आणि इंद्रियें जर पुण्यवान असलीं तर बुद्धि सुखी होते. हा पापपुण्याचा जगांत चाललेला झगडा अनादि आहे. हें ओळखून देवांचे महायागांतील प्रतिस्पर्धी जे असुर

त्यांनीं सामगायनाचे वेळेला म्हणजे उद्गीथाचे वेळेला प्रत्येक इंद्रियाला 'पाप्मना विद्ध' केलें, असें छांदोग्योपनिषदांत वर्णन आहे. उद्गीथ म्हणजे प्रणव; आणि प्रणव म्हणजे ॐकार. ऋग्वेदांत ॐकाराला प्रणव या नांवानें ओळखतात. उद्गीथ म्हणजे ॐकाराचा आश्रय घेऊन सामांतील ऋचा गाणें. सामांतील ऋचा गायल्याशिवाय यज्ञ पुरा होत नाहीं.

## निष्पाप प्राणांपुढें असुरांचा धुव्वा

ह्या गायनासबंधानें पूर्वी एकाकाळीं देव आणि असुर ह्यांच्यामध्यें कोण जिंकतो अशी चढाओढ सुरू झाली. ह्या चढाओढीचें वर्णन छांदोग्योपनिषदांत असून, बृहदारण्यकांतहि आहे. देवांनीं डोळे इत्यादि इंद्रियांचेमार्फत सामवेदांतील ऋचांच्या गायनास सुरुवात केली. उद्गीथ म्हणजे सामगायनास देवांनीं सुरुवात केली आहे, ही बातमी असुरांना जेव्हां समजली तेव्हां त्यांनीं डोळे 'पाप्मना ह्येतद्विद्धम्' केले. डोळे पाप अंगांत संचारल्याप्रमाणें वागूं लागले, ते आपलपोटे झाले! त्यांना श्रेयस्कर जो भाग असेल तो ते आपल्याकडे ठेवत असत; त्यामुळें असुरांचें काम झालें. डोळ्यांच्याप्रमाणें बाकी राहिलेल्या इंद्रियांकडून देवांनीं उद्गीथ गायनास जेव्हां प्रारंभ केला तेव्हां असुरांनीं त्या त्या इंद्रियास 'पाप्मना ह्येतद्विद्धम्' करण्यास सोडिलें नाहीं. ह्याप्रमाणें लढाई चालू असतांना मुख्य प्राणाशीं असुरांची गांठ पडली. प्राणांत काय आहे, आपण त्याला हां हां म्हणतां जिंकूं असा विचार करून असुर मुख्य प्राणांवर धावून गेले. मुख्य प्राण ॐकाराप्रमाणें निष्पाप असतो, हें असुरांच्या ध्यानीं आलें नाहीं. वायु 'ॐ' 'ॐ' म्हणतच किंवा तत्सदृश आवाज करीतच शरिरांत शिरतो; म्हणून मुख्य प्राण ॐकाराचा जप करीत असलेला आढळून येतें. ॐकाराचा जप करणें हें पापी मनुष्याला सुचत नाहीं. ॐकाराचें अनुनयत्व पत्करून वागणाऱ्या मुख्य

प्राणांवर असुरांनीं चाल केली आणि 'पाप्मना ह्येतद्विद्धम्' म्हणून त्याचे अंगाशीं असुर चिकटले. तेव्हां ठिसूळ पदार्थ अतिशय टणक पदार्थावर आपटून जसा फुटतो तशी गत असुरांची झाली; म्हणजे असुरांचा पराजय झाला. म्हणून मुख्य प्राणाला 'अश्माखण' म्हणजे दुर्भेद्य आहे असें म्हणतात.

## व्यानाच्या प्रभावाच्या वेळीं ॐकाराचा उद्भव

ॐकार निष्पाप आहे म्हणून मुख्य प्राण निष्पाप आहे. खाल्लेलें पचवावयाचें आणि न पचणारें असेल तें बाहेर टाकून द्यावयाचें, एवढेंच काम प्राण व अपान वायूंकडे आहे; म्हणून त्यांना तें काम निष्पाप वृत्तीनें करतां येतें. परंतु व्यान वायूची गोष्ट निराळी आहे. 'न हि प्राणन् न हि अपानन्' अशा स्थितींत व्यान उत्पन्न होतो. आंत वायू शिरत नाहीं किंवा बाहेर पडत नाहीं अशा संधिकालीं व्यान आपलें काम करीत राहतो. व्यान वायू म्हणजे मनाचें आणि बुद्धीचें ठिकाण आहे. मानवी देहांत असंख्यात नाड्या पसरलेल्या आहेत. ह्या नाड्यांना धरून मन आणि बुद्धि मानवी देहांत राहतात आणि नाचतात. आपण बोलत असतांना प्राणाची आंत शिरण्याची क्रिया आणि अपानाची बाहेर जाण्याची क्रिया ह्या बंद पडतात; आणि देहावर व्यानाचा अंमल सुरू होतो. व्यानाच्या अंमलाच्या वेळेला संधि साधून ॐकार उत्पन्न होतो आणि गाण्याकडे प्रवृत्ति होते. ही गाण्याची प्रवृत्ति उत्पन्न झाली असतांना सामवेदांतील ऋचा गाण्यास आरंभ होतो. व्यान वायूपासून बोलणें सुरू होतें व बोलण्यानंतर संधीच्या ठिकाणीं ॐकार उत्पन्न होतो. ॐकार हा पृथ्वीच्या सारापैकीं अत्यंत उत्तम रस आहे. हा ॐकार उत्पन्न झाला असतांना उद्गाता हा सामवेदांतील ऋचा गाण्यास सुरुवात करतो, असें छांदोग्यांत श्रुतीनें ह्या गायनाचें वर्णन केलें आहे. उद्गाता हा यज्ञयागांतील ऋत्विजांपैकीं एक असून त्याला प्रस्तोता व प्रतिहर्ता

हे दोघेजण मदतनीस असतात. मुख्य गायनाचा बोजा उद्गात्यावरच पडतो. त्या उद्गात्याचा आवाज मधुर असावा लागतो. आवाजदार हूडकून काढून त्याला सामगायनाचें हें काम देण्यांत येतें. सामवेदांतील ऋचा शेंकडा नव्वदाहून अधिक ऋग्वेदांतूनच घेतल्या आहेत. सामवेदांत ऋग्वेदांतील ऋचा तालसुरावर गाण्यांत येत असल्यामुळें बाष्कळ शृंगारिक गायन वर्जच आहे. आत्म्याचें स्मरण करून प्रत्येकानें एकाग्रचित्तानें सामगायन करावयाचें आहे असा छांदोग्य श्रुतीनें दंडक घालून दिला आहे, आणि हा दंडक वैदिक काळांत पाळला जात असे. एकाग्रचित्त झालें कीं अध्यात्माचा अंमल सुरू होतो आणि तेथें बाष्कळपणाचें कांहीं चालत नाहीं. तालसुरावर सामवेदांतील गायन मधुर आवाजानें गाण्याची पद्धत जेव्हां यज्ञयागांत सुरू झाली तेव्हां एकाग्रचित्तानें आणि आध्यात्मिक रीतीनें तें गायन गाइलें जात असल्यामुळें लोकप्रिय झालें. आणि हजारों सुवर्ण नाण्यांची दक्षणा उद्गात्यास मिळून त्याचा लौकिक वाढला असल्यास त्यांत नवल नाहीं. छांदोग्य श्रुतीनें ह्या कामीं चांगलेंच मार्गदर्शन केलें आहे.

## बाष्कळ गाण्यांवर आध्यात्मिक शांतरसाचा तोडगा !

गायचें तें तालसुरावर गावें असें आम्ही जेव्हां म्हणतों तेव्हां सुरांचा अर्थ काय होतो? तंबोऱ्याच्या तारा किंवा बाजाचे पेटींतील सूर षड्ज–पंचमांत लावण्यांत येतात. केव्हां केव्हां ज्या चालींतून मध्यमच वारंवार येणारा असतो तेव्हां षड्ज–पंचमांत सूर न लावतां षड्ज–मध्यमांत लावण्यांत येतो. ह्या सुराला धरून गाणारानें गायचें असतें. सूर सुरू झाला म्हणजे आम्, आम्, असा ध्वनि सुरांतून निघूं लागतो. तोच ॲंकार होय. ह्या सुराला चिकटवून अ, आ, ई, ऊ, ए, ओ हे बोल (स्वर) आलाप घेतांना गाणाराला सोपें जातें. सामवेदाचें गायन करतांना ह्या स्वरांचे ई, ऊ चे आलाप घेतात.

अ अधिक ऊ म्हणजे ओ होतो; ह्या ओचा उपयोग सामवेदाचे आलाप घेतांना केव्हां केव्हां करण्यांत येतो. ओकार सिद्ध झाला म्हणजे त्याला म् जोडून दिला कीं अम् किंवा आम् किंवा ओम् रूप होतें. अम्, आम्, ईम्, ऊम्, किंवा ओम् ह्याचा उच्चार सुराला धरूनच झाला पाहिजे. गवई लोक स्वर–साधन पहांटे उठून करीत असतात. हें स्वर–साधन करण्याचे पूर्वी सूर्यनारायणाच्या तेजाचें ध्यान करून आपल्या कामाकडे लक्ष दिलें असतांना गवई लोक बाष्कळ व चटोर गाण्यांत गुंग असतांना केव्हांहि सांपडणार नाहींत. अध्यात्माची अशा रीतीनें गायनास जोड दिल्यानें हा फायदा होणारा आहे. बाष्कळ व चटोर गाण्यापासून अध्यात्म गवयांना परावृत्त करतो. देवतांचें वर्णन असलेलीं पदें गायल्यानें शांतरस उत्पन्न होतो. राम, राम या नांवाचा जप केल्यामुळें आणि रामावरील तुळशीदासकृत चौपाया किंवा दोहे गायल्यामुळें मन शांत होऊन शांतिरसाचीं कवनें गाण्याचेंहि पुण्य लागतें, असें तुळशीदासाचें म्हणणें आहे. रामनामाच्या महिम्याचें विवरण करितांना तुळशीदासांनीं रामनाम आणि ॐकार ह्यांमध्यें फरक नाहीं, असें नमनाचे पहिल्या अध्यायांत सुचविलें आहे. रेफाची मात्रा केली असतांना ॐकार सिद्ध होतो अशी टीका तुळशी रामायणावरील टीकाकारांनीं केली आहे. एवंच ॐकारांत व रामनामांत फरक नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे. रामदासकृत रामावरचीं पदें ह्याच नमुन्याचीं आहेत. रामनाम घेत असतांना ॐकाराचा जप केल्याचें पुण्य लागतें. गवयांचा हा विषय आतां आटोपता घेतला पाहिजे. गवयांनीं भारदस्त शृंगार गाण्यास कांहीं हरकत नाहीं; पण मनाचा ओढा शांतरसाकडे असतो आणि शांतरस अध्यात्माचें अवलंबन केल्यानें साधतो; हें सिद्ध करण्याकरितां एवढा प्रपंच करावा लागला. असो.

## पंचप्राणांचें पुण्यकार्य

आंत जाणारा तो प्राण, बाहेर पडणारा तो अपान आणि तिसरा व्यान. मन

आणि बुद्धि शरिरांतील नाडयांच्या मार्फत व्यानाशीं संलग्न असतात. आध्यात्मिक विचाराशिवाय राहणाऱ्या बुद्धीला मनाच्या आहारीं जावें लागतें आणि बुद्धीचे हातून पापाचरण होतें. अध्यात्माचे विचारांनीं जर बुद्धीला आत्म्याशीं संलग्न होण्याचें वळण लागलें तर तिची मनाचे जाचांतून सुटका होईल. एवंच अध्यात्माचा मार्ग चोखाळण्याची संवय बुद्धीला नीट लावली पाहिजे. प्राणतत्त्वाचा जो 'समान' अंश आहे त्यास आहाराचे इंद्रियांमार्फत शुद्ध राहण्यास शिकविलें पाहिजे. प्राणतत्त्वाचा 'उदान' नांवाचा पांचवा अंश आहे– उदान हें तत्त्व तेजोमय आहे. पुण्य म्हणजेच तेज. घटके घटकेला ह्या तेजाचा हिशोब करण्यांत येतो. ह्या हिशोबाला धरून मनुष्याला ब्रह्मतेजस्वी होतां येतें. मेल्यावर कोणत्या जन्मास जावयाचें हें ह्या हिशोबावर अवलंबून असतें. ह्या हिशोबामुळें मनुष्य जिवंत असतांना देखील त्याचा ओढा अधिक अधिक पुण्य संपादन करण्याकडेच असतो आणि त्याच्या मुद्रेवर ब्रह्मतेज दिसूं लागतें तेव्हां तो ब्रह्मवर्चस्वी होतो. शरीरांतील उष्णता कायम राखण्याचें काम ज्याप्रमाणें प्राणशक्तीकडे त्याचप्रमाणें विश्वाची उष्णता राखण्याचें काम सूर्यनारायण देवतेकडे आहे. ह्या देवतेची उपासना केल्यानें प्राणतत्त्वांचें संरक्षण होतें. अशा रीतीनें प्राणांचें संरक्षण झालें कीं त्याचें पुण्य श्वास घेण्याच्या वेळीं ॐकाराचा जो जप होतो त्याकडेच देणें योग्य नाहीं काय?

# विवेचन सहावें

यदेव विद्यया करोति श्रद्धयोपनिषदा तदेव वीर्यवत्तरं भवति ।

छांदोग्योपनिषत्

(जें [कर्म] श्रद्धेनें [आस्तिक बुद्धीनें] आणि उपनिषदांतील विद्येनें [तत्त्वज्ञानपूर्वक] करण्यांत येतें, त्यामध्येंच अधिक वीर्य [सामर्थ्य] उत्पन्न होतें.)

## गायनाची कला ही परमेश्वरी देणगी

कशा रीतीनें कर्म करावें, ह्या ऊहापोहामध्यें ॐकाराचें वर्णन करण्याची वेळ आली असतांना वरील तऱ्हेचे उद्गार छांदोग्यांत काढण्यांत आलेले आहेत. आस्तिक बुद्धीनें आणि उपनिषदांतील तत्त्वज्ञानास अनुसरून कोणतेंहि कर्म केलें असतांना ह्यामध्यें अधिक वीर्य उत्पन्न होतें, असें छांदोग्यांत श्रुतीचें विधान आहे. गायनशास्त्र कसें उत्पन्न होतें आणि गाण्याकडे प्रवृत्ति कां होते, हें गायन कलेंतील कुशलांकडून गाण्याचे प्रारंभीं जी धून काढण्यांत येते तिच्यासंबंधानें ऊहापोह केल्यास ध्यानीं येईल. ही धून ऐकतांना कांहीं वेळां श्रोते इतके तल्लीन होऊन जातात कीं टाळ्यांचा गजर होतो. धून ऐकण्यांत आनंद कां होतो ? प्रिय असलेल्या रागाची धून मधुर आवाजानें तालसुरावर गायली जातांच आपण खूष होतों. ह्याचें कारण असें आहे कीं, उद्गीत म्हणजे गायनाची कला ही परमेश्वरी देणगी असून ॐकाराचे रसांत भिनलेल्या शांतरसाचें एखादें पद कानीं पडतांच परमेश्वरालाहि आनंद होतो. धुनींत काय काय असतें? प्रिय चिजेचे आलाप असतात. आम्, ओंम् आणि तनोम् ह्या अक्षरांच्या काढलेल्या आलापांव्यतिरिक्त धुनींत कांहीं नसतें.

रसांतील रस म्हणून समजल्या जाणाऱ्या ॐकाराहून भिन्न असें कांहीं धुनींत नसतेंहि. म्हणून रामनामावर जशी श्रीशंकर देवता प्रसन्न असते तशीच पांच मुखांनीं अनुभवास येणारी पंचमुखी देवता केवळ धुनीवर केव्हां केव्हां खूष होते. शांतरसाचीं पदें परमेश्वरास कां आवडतात ? ह्याचा भगवद्गीतेंतील दहाव्या अध्यायांत 'वेदानां सामवेदोऽस्मि' म्हणून भगवंतांनीं जें म्हटलें आहे त्यावर कै. लोक. टिळकांनीं लिहिलेल्या टीकेंत उलगडा केलेला आहे. उद्गीथाचा उल्लेख करून टीप लिहिलेली असल्यामुळें आणि ही टीप थोर विभूतीच्या लेखणींतून उतरलेली असल्यामुळें आम्ही जशीच्या तशी ही टीप खालीं देत आहों.

## कै. लोक. टिळकांची टीप

"वेदांपैकीं सामवेद मी, म्हणजे सामवेद मुख्य, असें या ठिकाणीं जें वर्णन आहे, तद्वतच महाभारतांत अनुशासनपर्वांतहि (१४. ३१७) "सामवेदश्च वेदानां यजुषां शतरुद्रीयम्" असें म्हटलें आहे. पण अनुगीतेंत 'ॐकारः सर्ववेदानां०' (अश्व. ४४. ६) असें ॐकारासच सर्व वेदांत श्रेष्ठत्व दिलें असून गीतेंतहि पूर्वीं (गी. ७. ८) "प्रणवः सर्ववेदेषु" असें सांगितलें आहे. तसेंच गीता ९. १७ यांत "ऋक्सामयजुरेवच" या वाक्यांत सामवेदापेक्षां ऋग्वेदाला अग्रस्थान दिलें असून सामान्य समजूतहि तशीच आहे. हीं परस्परविरोधी विधानें होऊन त्यावर कित्येकांनीं बऱ्याच कल्पना लढविल्या आहेत. छांदोग्योपनिषदांत ॐकारालाच 'उद्गीथ' हें नांव असून "हा उद्गीथ सामवेदाचें सार होय व सामवेद हा ऋग्वेदाचें सार होय" असें वर्णन आहे (छां. १, १. २). छांदोग्यांतील या वाक्यानें सर्व वेदांत श्रेष्ठ कोण याबद्दलच्या वरील निरनिराळ्या विधानांची एकवाक्यता होऊं शकते. कारण सामवेद झाला तरी त्यांतील मंत्र मूळ ऋग्वेदांतूनच घेतलेले आहेत.

पण तेवढ्यावर संतुष्ट न होतां सामवेदाला गीतेंत या ठिकाणीं जें प्राधान्य दिलें आहे त्यांत कांहीं तरी गूढ कारण असलें पाहिजे असें कित्येकांचें म्हणणें आहे. छांदोग्योपनिषदांत सामवेदाला जरी प्राधान्य म्हटलें आहे तरी मनूनें "सामवेदाचा ध्वनि अशुचि होय" (मनु. ४. १२४) असें मत दिलें आहे. म्हणून सामवेदाला प्राधान्य देणारी गीता मनूच्या पूर्वींची असावी असें एकानें अनुमान केलें आहे; आणि दुसरा असें म्हणतो कीं, गीतेचा कर्ता सामवेदी असल्यामुळें त्यानें सामवेदाला या ठिकाणीं प्राधान्य दिलें असावें. परंतु "वेदांपैकीं सामवेद मी" याची उपपत्ति लावण्यास आमच्या मतें इतकें लांब जावयास नको. भक्तिमार्गांत परमेश्वराच्या गानपर स्तुतीस नेहमीं प्राधान्य दिलेलें असतें. उदाहरणार्थ, नारायणीय धर्मांत "वेदेषु सपुराणेषु सांगोपांगेषु गीयसे" (म. भा. शां. ३३४. २३) असें नारदानें भगवानाचें वर्णन केलें असून वसुराजा "जप्यं जगौ"—जप्य गात होता (शां. ३३७. २७; आणि ३४२. ७० व ८१ पहा)—असा 'गै' धातूचाच प्रयोग पुनः केलेला आहे. म्हणून भक्तिपर धर्मांतून यज्ञयागादि क्रियात्मक वेदांपेक्षां गानपर म्हणजे सामवेदास अधिक महत्त्व दिलें असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं; आणि आमच्या मतें हेंच "वेदांमध्यें सामवेद मी" असें म्हणण्याचें सरळ व सोपें कारण होय."

## मन एकाग्र होण्याच्या पायऱ्या

भक्त भक्तीनें परमेश्वराचा धांवा करूं लागला म्हणजे परमेश्वर सर्व कामें सोडून त्याच्या धांव्याकडे लक्ष पुरवितो. पण भक्तीनें धांवा केलेला असला पाहिजे. भक्ति म्हणजे सहज उत्कंठेची पराकाष्ठा. ह्या स्थितींत भक्त असतांना तो गाऊं लागतो; त्याचें गायन तालबद्ध आपोआप होतें; सुराला सोडून तो जात नाहीं; त्याचे पदांतून शांतरस ओथंबलेला असतो. ह्या स्थितींत परमेश्वराला लक्ष देणें भाग पडतें. भक्तीच्या म्हणजे सहज उत्कंठेच्या

पराकाष्टेचा हा महिमा आहे. परमेश्वराचें स्तवन भक्तानें गाऊनच केलें पाहिजे. सहज उत्कंटेच्या स्थितींत म्हणजे भक्तीचे स्थितींत तो असतांना 'अजपाजप' म्हणजे ॐकाराचा जप तो करीत असतो; निष्पाप ॐकाराचा अनुभव त्याला येत असतो; 'समान' वायु नाकपुडींतून वाहूं लागतो; आणि आनंदाचे भरांत तो गाऊं लागतो. अशा रीतीनें उद्गीथ म्हणजेच ॐकाराची जबर उत्कंठा लागली असतांना त्या भरांत तो गाऊं लागतो. ॐकाराचे रसांत येणें म्हणजेच गाण्याकडे कल असणें होय. 'अजपाजप' ॐकाराकडून कसा जपला जातो? जपला न गेलेला जप म्हणजे अजपाजप होय. मनुष्यानें ऐकूं येण्यापर्यंत मोठ्यांदा नाकपुड्या वाजवाव्यात; तेव्हां त्याला 'सोऽ' असा शब्द वारा आंत येतांना ऐकूं येऊं लागतो; लगेच वारा बाहेर जाऊं लागतो व 'हुं' असा शब्द ऐकूं येऊं लागतो; वारा आंत येत असतांना आणि बाहेर जात असतांना 'स्वरन्' म्हणजेच ओम् असा उच्चार होतो. आंत बाहेरच्या प्रत्येक हेलपाट्यानें 'ओम्' म्हणजेच 'सो अहं' म्हणजेच 'स्वरन्' असा उच्चार स्पष्टपणें येऊं लागतो. अंगांतील ऊबदारपणांत चलविचल न होऊं देण्याची खबरदारी घेऊन अशा रीतीनें ॐकाराचा जप मुख्य प्राण पार पाडत असतांना अखिल ब्रह्मांतून अन्धकार हाकलण्याचें काम श्रीसूर्यनारायण ही देवता 'स्वरन्' असा शब्द करून करीत असते, असें छांदोग्य श्रुतीचें मत आहे. मुख्य प्राणांवर व श्रीसूर्यनारायणावर शरीरांत आणि विश्वांत उष्णता राखण्याची जबाबदारी आहे.त्यामुळें एक प्रकारचें ह्या दोहोंत साम्य दिसून येतें. तेव्हां प्राणांप्रमाणेंच ॐकाराचा जप श्रीसूर्यनारायण करितो किंवा कसें, ह्या प्रश्नाचें उत्तर छांदोग्यांत असें दिलें आहे कीं, हा सूर्यनारायण 'स्वरन्' 'प्रत्यास्वरन्' येतो, सूर्याचे तेजाला गति आहे, किंबहुना अखिल तेजांत हालचाल आहे; सुसंगत गति म्हणजेच 'स्वरन्' म्हणजे ॐकाराचा उच्चार. ह्याचें तेज गतिमान

असतें, अशी येथें उपपत्ति लावण्यांत येते. मुख्य प्राण आंत येतांना आणि बाहेर जातांना 'सो अहं' म्हणजेच ॐकाराचा उच्चार कसा करीत रहातो हें वर सांगितलेंच आहे. पण हा उच्चार ऐकूं येण्याकरितां नाकपुडयांतून वारा जोरानें वहावा लागतो; एरव्हीं ऐकूं येत नाहीं. नाकपुडयांतून वारा जोरानें वाहात असतांना एकप्रकारचा प्राणायामच होत असतो. अशा रीतीनें प्राणांचें यमन होत असतांना नाकपुडयांवर लक्ष ठेवावें; नाकपुडयांतून वाऱ्याची हालचाल कशी होत आहे हें ध्यानीं येईल; मग आपणांला अनुकूल अशी जागा नाकपुडयांत कोठें आहे ह्याचा तलास करावा. जागा सांपडली म्हणजे तेथें एकाग्र होणारें मनहि सांपडतें. नाद कोठेंहि ज्यास ऐकूं येतो त्यास तोच तोच ऐकत रहाण्यानें मन एकाग्र करतां येतें. जपाचा सराव झाला असतांना तल्लीनता अनुभवास येते; मग जप आपण तालसुरांत करीत आहोंत असा प्रत्यय येतो; मग सुस्वर गाण्याकडे जसें लक्ष लागावें त्याप्रमाणें जपाकडे लक्ष लागतें, व अशा रीतीनें मन लागूं झालेलें आहे असें आढळून येतें. मन एकाग्र होण्याच्या लय-योगांतील ह्या पायऱ्या होत. मन एकाग्र झाल्यावर समाधि कांहीं दूर नाहीं असें मानावें. लय-योगांतील ह्या पायऱ्यांवरून जात असतांना उपनिषदांतील तत्त्वज्ञानास आपण चिकटून राहिलों तर पायऱ्या चढण्याचे श्रम वाटेनासे होतात आणि कामांत सुकरता येऊन फल वीर्यतर व वेगानें प्राप्त होतें, असें ह्या विवेचनाच्या मथळ्यावरील मंत्रांत छांदोग्य श्रुतीनें सांगितलें आहे.

## प्रश्नोपनिषदांतील पांचवा प्रश्न

आतां आपण प्रश्नोपनिषदांतील पांचव्या प्रश्नाकडे वळूं. हा प्रश्न ॐकारासंबंधाचा आहे. सत्यकाम नांवाच्या ऋषीनें पिप्पलाद ऋषीला असा प्रश्न विचारला आहे कीं, महाराज, मनुष्यांपैकीं जो कोणी ॐकाराचें चिंतन आणि

मनन करतो तो या चिंतन–मननानें कोणता लोक मिळवितो? मनुष्यापैकीं प्रत्येकाला ॐकाराचें चिंतन करण्याचा अधिकार आहे; वैदिक मंत्र ॐकार असला तरी त्याची उपासना प्रत्येक मानवी प्राण्यानें करावी असें गृहीत धरूनच हा प्रश्न त्या थोर मनाच्या ऋषीकडून विचारण्यांत आलेला आहे. तेव्हां या उपासनेचें कोणतें फळ मिळतें, यावज्जीव ॐकाराची उपासना सांगण्यांत हेतु कोणता आहे, असे नानाविध प्रश्न सत्यकामाच्या एका प्रश्नांतून उत्पन्न होतात. ह्यावर पिप्पलाद ऋषींनीं असें उत्तर दिलें आहे कीं, जें ॐकारस्वरूप आहे तें शुद्ध किंवा शबल ब्रह्मापैकीं कोणतें तरी एक असतें. म्हणजे शुद्ध आणि शबल अशा दोन्ही ब्रह्मस्वरूपांचें तें प्रतीक म्हणजे वाचक आहे. म्हणून जो विद्वान आहे किंवा असें हें आहे हें जो कोणी जाणतो तो ॐकाराच्या उपासनेनें शबल किंवा शुद्ध ब्रह्माचे गतीला जातो. येथें मूळ मंत्रांत ब्रह्माला उद्देशून पर किंवा अपर ब्रह्म असे शब्द वापरले आहेत. पर म्हणजे निर्गुण म्हणजेच शुद्ध ब्रह्म, अपर म्हणजे सगुण म्हणजेच शबल ब्रह्म म्हणून समजण्यांत यावें. ब्रह्माचा शास्त्रीय दृष्टीनें सगुण ब्रह्म आणि निर्गुण ब्रह्म असा भेद करतां येत नाहीं. परंतु भाषेच्या सोईसाठीं ह्या भेदास संमति देण्यांत आलेली आहे. कारण ब्रह्माकडे पहातांना दृष्टीला सृष्टीच्या देखाव्याचे चष्म्यांतून पहावें लागतें. विद्वान् हा शब्द वापरल्यानें ज्ञानप्रधान भावना सूचित केली आहे. अर्थ न जाणतां केलेली उपासना व्यर्थ होय; म्हणून ॐकाराची तशी उपासना करूं नये, असें ‘विद्वान्’ हा शब्द योजून ध्वनित केलें आहे.

## वैश्वानर देवतेचें ध्यान

अ, ऊ, आणि म् अशा तीन मात्रांनीं मिळून ॐकार होतो. ॐकाराचा जप करीत असतांना पहिली मात्रा सामान्येंकरून जो कोणी

उपयोगांत आणील, अर्थात् वैश्वानर देवतेचें ध्यान करील तो त्या ज्ञानाचे जोरावर लवकर पृथ्वीवर येतो. आजन्म वैश्वानर देवतेचें ध्यान केलें पाहिजे. प्रपंचाचे देवतेचें ध्यान केल्यानें त्यास फळ काय मिळतें? ॐकाराचा उच्चार केला जात असतांना व प्रथम मात्रेवर जास्त जोर दिला असतांना ऋग्वेद त्याला पृथ्वीवर मनुष्य लोकांत जन्मास घालतात. ऋग्वेद काय म्हणून? ऋग्वेदाचे मंत्र आधिभौतिक स्वरूपाचे आहेत; प्रापंचिकांचा तो ज्ञाननिधि आहे. माझे डोळे गेले आहेत, ते मला दे–इत्यादि स्वरूपाच्या ऋग्वेदांत प्रार्थना आहेत. म्हणून वैश्वानर देवतेचा आणि ऋग्वेदाचा मिलाफ आहे. ऋग्वेदांतील प्रार्थनेच्या म्हणजे उपासनेच्या जोरावर त्याचे अंगीं आणखी कोणते कोणते गुण उत्पन्न होतात? तो तपाचरण करण्यास लायक होतो. कष्ट सोसून आपलीं कर्तव्यकर्मे (व्यक्तिविषयक असोत किंवा सार्वजनिक स्वरूपाचीं असोत) पार पाडणें, अशी तपाची व्याख्या आहे. अशा अर्थी तो तपस्वी होतो; तो ब्रह्मवर्चस्वी होतो म्हणजे विद्याव्यासंगी होतो; त्याची परमेश्वराचे ठिकाणीं पूर्ण श्रद्धा असते; ह्या सद्-गुणांनीं मंडित असलेला तो प्रपंचांत महत्त्व पावतो. हें महत्त्व वैश्वानर देवतेचे कृपाछत्राखालीं असल्यामुळें तें अखंड असतें आणि त्याचा अभ्युदय होतो.

## तैजस देवतेचें ध्यान

आधिभौतिक श्रेष्ठत्वाहून अधिक वरचा मार्ग मोकळा करून घेणेचें असल्यास ॐकारांतील उकाराची म्हणजे आधिदैविक सामर्थ्याची उपासना त्यानें करावी. ही उपासना करण्याचा विधि सांगतात. ॐकाराचा जप पूर्वी-प्रमाणेंच केला पाहिजे. अकार आणि उकार म्हणजे ओकार ह्यांवर प्राधान्यें-करून लक्ष ठेवून उकाराची किंवा उन्नतीची जी तैजस देवता आहे त्यांतील तेज हें ध्यान करीत असतांना उपयोगांत आणावयाचें आहे. असें केल्यानें

सूर्यनारायणाच्या कृपेनें बुद्धि तरतरीत होते; त्याच्याच कृपेनें स्वकर्तव्याविषयीं मनुष्य तत्पर रहाण्यास जें सुचावयास पाहिजे तें सुचतें, मनुष्य लावण्यसंपन्न होतो; शौर्यशाली होतो आणि वैभवाचा उपभोग घेणारा होतो. हा महिमा यजुर्वेदाचा आहे. आपल्याला प्रिय असलेल्या वस्तूंचा होम केला असतांना देवता संतुष्ट होतात आणि मनुष्याचें हित करण्यास उद्युक्त होतात, असें यजुर्वेदाचे मंत्रांतून प्रतिपादन केलेलें असतें. हा वेद सामर्थ्यवान क्षत्रियांचा आहे, वैश्यांचा ऋग्वेद आहे आणि ब्राह्मणांचा सामवेद आहे असें वर्णन 'ब्राह्मण' नांवाच्या ग्रंथांतून करण्यांत आलें आहे. ब्राह्मण गाण्याकडे कल असण्याइतके संतुष्ट असतात, म्हणून सामवेद ब्राह्मणांचे वाटणीला आला. वैश्यांच्या वाटणीला ऋग्वेद आला ह्याचें कारण धनावर नजर ठेवून प्रपंचांत उत्कर्ष कसकसा करून घ्यावा हें त्यांना समजतें. ऋग्वेद प्रापंचिकांचा वेद आहे. स्वार्थत्याग कसा करावा हें क्षत्रियांना समजतें; म्हणून यजुर्वेद म्हणजे स्वार्थत्यागाचा वेद क्षत्रियांच्या वांटणीला गेला. ब्राह्मणांचीं कर्में करीत असतील ते ब्राह्मण, क्षत्रियांचीं कर्में करीत असतील ते क्षत्रिय; आणि वैश्यांचीं कर्में करीत असतील ते वैश्य;–हा न्याय लागू करण्याखेरीज वरील व्यवस्थेस यजुर्वेदाची कां मदत होते ह्याचा उलगडा होत नाहीं. अ आणि उ वर जोर देऊन सबंध ॐकाराचा जप केल्यानें आणि तैजस देवतेच्या तेजाचें ध्यान केल्यानें जी सिद्धि प्राप्त होते ती चिरस्थायी नसते, मोठ्या काळपर्यंत टिकणारी नसते. ह्याचें कारण असें आहे कीं मनुष्य कितीहि वैभवशाली झाला तरी त्याच्या वैभवाला मर्यादा असते.

## म्‌कारासकट ॐकाराचा जप

म्‌कारासकट ॐकाराचा जेव्हां जप करील आणि ह्या जपाची जी सर्वेश्वर म्हणून देवता आहे, त्या देवतेला प्रसन्न करून घेईल तेव्हां तो

परात्पर असें जें ब्रह्म आहे त्याचा साक्षात्कार होऊन मुक्त होण्यास पात्र होईल. सूर्यलोकीं त्याला सामवेद घेऊन जातात. शबल ब्रह्माचे पलीकडे तो जाऊन शुद्ध ब्रह्माचें दर्शन होतें. ह्याविषयीं प्राचीन दोन मंत्र आहेत. पहिल्या मंत्रांत सांगितलें आहे कीं, ॐकाराच्या तीन मात्रांनीं मिळून उपासना केली असतांना आणि त्या मात्रा म्हणजे ॐकाराच्या तीनहि शक्ति बाह्यकर्मे, बौद्धिक कर्में व मानसिक कर्में ह्यांमध्यें योग्य रीतीनें योजिल्या असतां, ज्ञाता पुरुष कशानेंहि विचलित होत नाहीं. दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं विद्यासंपन्न ऋग्वेदाच्या सहाय्यानें मनुष्यलोकाप्रत प्राप्त होतो; यजुर्वेदाचे सहाय्यानें त्याची उन्नति होते व तो सोमलोकीं जातो; आणि सामवेदाचे मदतीनें ब्रह्मलोकाला पोंचून त्याला शांत, निर्विकार, अविनाशी, निर्मळ आणि शुद्ध ब्रह्माचें दर्शन घडतें. ह्या रीतीनें पिप्पलाद ऋषींनीं प्राचीन दोनहि मंत्रांचा सारांश दिला आहे आणि प्रश्नोपनिषदांतील पांचवा म्हणजे ॐकाराचा प्रश्न संपविला आहे.

ह्या विवेचनांतील मथळ्यावरील न्याय प्रश्नोपनिषदांतील पांचव्या प्रश्नासहि लागू पडत असून आस्तिक बुद्धीनें आणि उपनिषदांतील विद्येनें कर्में करावींत म्हणजे तीं अधिक वीर्यवान् होतात, असें निक्षून सांगून हें विवेचन आम्ही संपवितों.

---

# विवेचन सातवें

क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः ॥ स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् ॥ तस्य वाचकः प्रणवः ॥

—पातंजल योगशास्त्र

[ ईश्वर (अत्यंत उच्च शास्ता) पुरुषविशेष आहे; क्लेश, कर्म, त्यांचे विपाक आणि इच्छा ह्यांची बाधा त्याला होत नाहीं. पूर्वी होऊन गेलेल्या गुरूंचाहि तो गुरु आहे; काळाचें बंधन त्याला नाहीं. प्रणव म्हणजे ॐकार त्याचा वाचक आहे. ]

## पुरुषविशेष ईश्वर

पातंजल–योगशास्त्र हें सांख्यांचे मताशीं जुळतें घेणारें असलें तरी ईश्वराचे बाबतींत तें सांख्यांच्या मतांशीं जुळत नाहीं. हें शास्त्र परमेश्वरा-संबंधानें आस्तिकवादी आहे. ईश्वर हा पुरुष–विशेष आहे असें या शास्त्रांत मानलें जातें. विशेष ह्याचा अर्थ इंग्रजींत स्वामी विवेकानंदांनीं 'Special' 'वैशिष्टयाचा' असा केला आहे. ह्या पुरुष–विशेषाला क्लेश होत नाहींत, कर्मांचा लेप नाहीं, त्यांचीं फळें भोगावीं लागत नाहींत आणि इच्छा–पाशांतून तो मोकळा राहतो. इतर पुरुषांप्रमाणेंच तो आहे; पण इतरांना क्लेशादिकांची बाधा होते त्याप्रमाणें त्याला बाधा होत नाहीं, हें त्याचें वैशिष्टय आहे. हा कालातीत आहे; हा दिक्कालांनीं बांधला जात नाहीं. दिशांनीं तो मर्यादित होत नाहीं किंवा कालानें तो वेष्टिला जाणें शक्य नाहीं. दिशा व काल यांच्यापलीकडचा तो आहे. असा तो असल्यामुळें पूर्वींच्याहि गुरूंचा तो गुरु आहे. मानवांचें सत्कर्म वाढवून त्यांची उन्नति कशी करावी हा त्याचा व्यासंग आहे. ह्या पवित्र कार्यांतच त्याला आनंद होतो म्हणून

सच्चिदानंद स्वरूपी तो आहे. ब्रह्म म्हणजेच योगशास्त्रांतील ईश्वर होय; ब्रह्म आणि आत्मा ह्यांत फरक नाहीं. तेजोनिधि सूर्यानें प्रेरणा करून आमच्या बुद्धीला चेतना दिली असें म्हटलें काय, ब्रह्मानें चेतविली असें म्हटलें काय, आत्म्यानें चेतविलें म्हटलें काय, किंवा योगशास्त्रांतील पुरुष–विशेषानें चेतविलें असें म्हटलें काय, त्याच्यांत अर्थात् फरक होत नाहीं. ईश्वर सर्व सत्ताधारी असून सर्व प्रेरणा त्यापासूनच उगम पावतात. प्रेरणा करून शिकविण्याचा धंदा करणारा तो गुरूंचा गुरु आहे. त्याच्यापासूनच सर्व सृष्टि उत्पन्न झाली असें त्याचें वर्णन योग–शास्त्रकार करीत नसले तरी सर्वांच्या आधीं तो होता व कालानेंहि तो बांधला गेलेला नाहीं असें त्याचें वर्णन आहे. म्हणजे प्रेरणा करून किंवा अवतार घेऊन प्रत्यक्ष शिकविण्याचें काम आनंदानें तो करितो आणि ह्यामुळें सृष्ट जनांचा तो उद्धार करितो, असा सनातनी खाक्या आहे.

## अवतार घेऊन पुण्याची प्रत्यक्ष शिकवण

जीवसृष्टि ही हिंसामय आहे; अहिंसेचा वाली जीवनसृष्टीमध्यें कोणीहि नाहीं. मानवी सृष्टीमध्यें एखाद दुसरा अहिंसेच्या वर्तीनें बोलतांना आढळतो, आणि लाख माणसांत एखाद दुसरा 'बोले तैसा चाले' ह्यापैकीं असतो, असें मानवी समाजाचें वर्णन असल्यामुळें मानवी समाज किती पापी आहे हें समजून येईल. पापाचें निर्मूलन व्हावें म्हणून आणि साधूंचें रक्षण व्हावें म्हणून ईश्वराला अवतार घेणें प्राप्त होतें. 'अवतार' घेतला असतांना स्वतःचे कृतीनेंच ईश्वर उपदेश करूं शकतो. ईश्वराचे दोन मार्गांनीं हे उपकार पापी दुनियेवर होतात. ईश्वरापेक्षां खालील दर्जाचे गुरूहि पापी माणसांना केव्हा केव्हां भेटतात आणि ईश्वरास ॐकाराचे नांवानें संबोधण्यास शिकवितात; म्हणजे ॐकाराचा जप करण्यास सांगतात. 'तस्य वाचकः प्रणवः' असें

सूत्र आहे. पापाचा बोजा जसजसा हलका होत जाईल तसतशी ओ देण्याची ईश्वराची प्रवृत्ति वाढत जाते असें म्हणण्यापेक्षां, ओ देण्यास ईश्वर कोणत्याहि स्थितींत उत्सुक असतो पण पापाच्या बोजामुळें ओ दिलेली मनुष्यास समजत नाहीं असें म्हणणें अधिक योग्य होईल. आपण तेवढी ईश्वराची आराधना करावी आणि ईश्वरानें ढुंकूनहि पाहूं नये, असा जपाचा अनुभव मनुष्याला त्याचे पापामुळें येत असतो. पाप जसजसें हलकें होऊं लागतें तसतसा जपाचा अनुभव उलटा येऊं लागतो. पाप आडवें येतें हें मनुष्यास उमजत नाहीं. हें उमजत असतें तर पापाचरणाकडे मनुष्याची प्रवृत्ति होती ना! पुण्य म्हणजे उन्नतीला सहाय्य होणारी प्रत्येक गोष्ट, आणि पाप म्हणजे अवनतीला मदत करणारी प्रत्येक गोष्ट. अन्तःकरणाला साक्षी ठेवून मनुष्यास पाप व पुण्य ह्यांचें तारतम्य ओळखतां येतें. "आत्मैव रिपुरात्मनः" असें भगवद्गीतेंत म्हटलें आहे तें ह्याच अर्थी म्हटलें आहे. 'मनःपूतं समाचरेत्' अशी एक शिकवणूक आहे. अन्तःकरणानें पवित्र म्हणजे पुण्यकारक जें कांहीं असेल तें आचरणांत आणण्यास कांहीं हरकत नाहीं. कर्त्याच्या अन्तःकरणांत पाप नसेल तर त्याला पाप लागत नाहीं; वागतांना अन्तःकरणांत पुण्य असेल, तर त्या पुण्याचें बक्षीस त्याला मिळाल्यावांचून रहात नाहीं.

ॐकाराचा जप करण्यास शिकविण्यांत येतें, आम्हीहि तो जप करितों; पण जपाचें सार्थक होईल असें कशावरून? जप केल्यानें ईश्वर प्राप्त होतो, तें कशावरून? ईश्वराचें नांव प्रणव म्हणजे ॐकार हेंच आहे. वाच्य ईश्वर हा असून ॐकार हा वाचक म्हणजे नांव आहे. योगी हीच रूढि मानितात, उपासक ह्या रूढीलाच प्राधान्य देतात, तत्त्वज्ञानी हीच रूढि आचरणांत आणतात. 'शास्त्रात् रूढिर्बलीयसि' ह्या म्हणीप्रमाणें ह्या सर्वांचें वागणें योग्य असेल; पण आणखी कांहीं तरी बलवत्तर कारण असल्या-

शिवाय जपाचें फल मिळणार नाहीं. जप कां करावा याचें कारण समजलें पाहिजे. ॐकारामध्यें अकार वैश्वानराचें प्रतीक आहे, उकार उन्नतिदर्शक असून तैजस देवतेचें प्रतीक आहे, मकार अक्षराचा उपघटक असून प्राज्ञ देवतेचा प्रतीक आहे; हीं कारणें ॐकाराचा जप करण्याकरितां तुम्हांस लावण्यास पुरेशीं आहेत, ह्यांत संशय नाहीं. पण आणखी कांहीं कारण असेल तर सांगा. प्रणव ऊर्फ ॐकारच ईश्वराचें नांव असें समजण्यास वरील कारणां शिवाय कांहीं तरी आधार असल्यास तो आम्हांस सांगा. आधार आहे आणि त्याचाच योग्याच्या भाषेंत उलगडा करून सांगण्यांत येत आहे.

## ॐकाराच्या उच्चाराचें वैशिष्ट्य

वाच्य आणि वाचक असा संबंध असलेला विचार ( Thought ) आणि त्याचा वाचक शब्द प्रत्येक भाषेमध्यें निरनिराळा असतो. उच्चार करण्याचें अंग मनुष्यमात्रास सर्वसाधारण असलें तरी प्रत्येक देश आपआपली भाषा बोलतो. हा चमत्कार अनादि आहे. तथापि वाच्य व वाचक ह्यांचा संबंध ध्यानीं घेऊन जीभ किंवा ताळू ह्यांना स्पर्श न करितां मकारापर्यंत उच्चार होणारा असा शब्द ॐकारावांचून दुसरा नाहीं. अकाराचा उच्चार करण्यास जीभ किंवा ताळू यांचा अडथळा केव्हांहि येऊं शकत नाहीं; ॐकाराची तशीच स्थिति आहे. मकाराचे उच्चाराचे वेळीं दोन ओठ मिटतात इतकेंच, पण जीभ किंवा ताळू यांना यत्किंचितहि धक्का लागत नाहीं. ॐकाराचा उच्चार करण्यामध्यें हें एक वैशिष्टय आहे. द्वैती असोत, अद्वैती असोत, विशिष्टाद्वैती असोत, हिंदुस्थानांतील सर्व संप्रदायांनीं ईश्वराचा वाचक (नांव) ॐकार आहे, अशी मान्यता दिलेली आहे. ॐकाराचे मात्रांना प्रत्येक मात्रेगणिक अर्थ आहे. पारमार्थिक विचार हिंदुस्थानाइतका उच्च स्थितींत कोठेंच आढळत नाहीं. हिंदुस्थानचा हा दर्जा ओळखून ॐकारास

प्राधान्य देण्यास प्रत्येक देशानें पुढें येणें जरूर नाहीं काय? इंग्रजांची गोष्ट घ्या. इंग्रजींत देवाला God असें म्हणतात, परन्तु ह्या देवाला 'सर्वशक्तिमान्' ( Omnipotent ) सर्वांना पहाणारा (Omniscient) हा अर्थ सूचित करण्यांत येतो. अर्थ सूचित करणारीं विशेषणें न वापरतां नुसत्या ॐकाराचा जप केला असतांना भागणारें आहे. विशेषणें न लावतां ॐकाराचे ठिकाणीं अकार वैश्वानराचें प्रतीक समजून, उकार तैजस देवतेचें प्रतीक समजून आणि मकाराला प्राज्ञ देवतेचें प्रतीक समजून सर्व ॐकाराचा जप केल्यानें ईश्वर प्रसन्न होंतो, असें मानण्यास हरकत कोणती?

## ॐकाराच्या सत्संगानें मानसिक व शारीरिक कणखरपणा

"तज्जपस्तदर्थभावनम्" ह्या सूत्रांत ॐकाराचा जप करावा आणि त्याच्या अर्थाचें भावन म्हणजे चिंतन करावें असें सांगितलें आहे. ॐकाराचा अर्थ समजून जप केल्यानें पारमार्थिक कल्पनेंत आपण गुंगत आहोंत असें वाटून पवित्र मनुष्याच्या संगतीचा लाभ होत आहे, असें अनुभवास येतें. पवित्र माणसाचे सहवासांत प्रत्येकानें आपला काळ कंठावा. तसें केल्यानें त्याच्यांतील पुण्य–प्रवृत्ति वाढते. पापी मनुष्याची संगत धरूं नये. तसें केल्यानें दुर्गुण वाढतात. ॐकाराचा जप अर्थ समजून केल्यानें पुण्यात्म्याचे संगतींत आपण आहोंत आणि त्या योगें आपलें पुण्य वाढीस लागलें आहे, असा अनुभव येतो. ह्या बाबतींत कोणाचा अडथळा होतो?

आपण खोटें बोलूं नये म्हणून पाहिजे तितका प्रत्येकानें प्रयत्न करावा, आली वेळ म्हणजे खोटें बोलतोच; खोटें बोलल्यावांचून किंवा खोटें आचरण केल्यावांचून त्याला चैन पडेनासें होतें. हा प्रभाव कशाचा? बिनदिक्कत दुसऱ्याच्या मालावर आपली पापी नजर ठेवतो, असें कां होतें? ॐकाराचा सत्संग केल्यानें आपोआप त्याची चिंतनमननाची शक्ति वाढीस लागते व

तसें झाल्यावर मानसिक आणि शारीरिक दौर्बल्याचा अडथळा होत नाहीं. शारीरिक दौर्बल्यांत व्याधीची गणना प्रामुख्यें करून केली पाहिजे. पण ॐकाराचे सत्संगतीपुढें व्याधीचा जोर टिकत नाहीं. व्याधीचा जोर जसजसा कमी होऊं लागतो तसतसें आपले मनन-चिंतन वाढूं लागतें, आणि त्यायोगें व्याधि त्रास न देण्याइतपत नामशेष होते. शारीरिक व्याधीपेक्षां मानसिक रोगांना प्राधान्य दिलें पाहिजे. ह्यांत आळस मुख्य होय. पापी वृत्तींपासून आळस उत्पन्न होतो. आळसामुळें लक्ष लागेनासें होतें आणि लक्ष लागत नाहीं असें झाल्यावर अभ्यासाकरितां जरूर त्या बलाचा संचय कसा होणार ? यानंतर संशय उत्पन्न होतो. शास्त्रीय शोधासंबंधानें संशय येऊं लागल्यावर आपल्या मनांतील खात्री लटपटूं लागते आणि मनाला फिरून खात्री पटविण्याजोगी गोष्ट होईपर्यंत त्यासंबंधानें वाटत असलेली श्रद्धा ढासळते.

## "संशयात्मा विनश्यति"

अनुष्ठानास बसलेले असतांना मन एकाग्र झालें आहे, असा अनुभव कित्येक प्रसंगीं आल्यानंतर मन एकाग्र होण्याचें अवचित नाकारतें; कारण कांहींच समजत नाहीं. मनाची अशी लहर लागली असतांना मनाचे नादीं न लागतां अनुष्ठान तसेंच चालू ठेवावें; अशा रीतीनें आपण धैर्य धरिलें असतांना मन हलके हलके एकाग्र होऊं लागतें. "नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण" असा अनुभव आल्यावांचून प्रगति होत नाहीं. अवन. काळीं विजय प्राप्तीसाठीं करण्यांत येणाऱ्या झुंझेंतच प्रगतीचें मूळ आहे. मनःक्षोभ, मानसिक शांतीचा बिघाड, शरीरकंप, श्वासोछ्वासाचे समतोलपणांत बिघाड, हीं चिन्हें मनाचें एकीकरण होत नसतांना प्रादुर्भूत होतात. ॐचा जप आणि ईश्वरावर सर्वस्वी अवलंबून रहाणें ह्यामुळें चित्ताचा क्षोभ नाहींसा होतो. मित्रत्वाचे भावनेनें सर्वांशीं वागावें-आपण मैत्रीनें वागत

असतां, दुसरा मनुष्य निष्कारण आमचा वैरी होतो, ह्यामुळें अशा वैऱ्याशीं वैरच उपयोगांत आणावें, असें मन सांगत असतें. ह्यावेळीं मन आवरून धरल्यानें चित्त भडकत नाहीं. दुःखानें पीडलेल्यांशीं आपण सहानुभूतीनें वागावें. असें वागल्यानें चित्त प्रशांत होतें आणि प्राणायाम साधूं लागतो. प्राण म्हणजे शरीराची एकवटलेली शक्ति अशी व्याख्या करून स्वामी विवेकानंद ह्यानीं पतंजली आणि योगशास्त्राचे उत्तरकालीन प्रणेते ह्यांत अन्तर कसें कसें पडत गेलें आहे ह्याचा विचार केला आहे.

## साक्षात्कारी टेंबे स्वामींचें मार्गदर्शन

प्राणायाम करतां करतां त्यांत प्राविण्य कसें मिळतें हें सांगितल्यावर साक्षात्कारी टेंबे स्वामी हे श्रीदत्तमहात्म्य या नांवाचे ग्रंथांत ३३ साव्या अध्यायांत म्हणतात, " अंगुष्टांनीं कान । तर्जनींनीं नयन । मध्यमीं नासा धरून । धरावें आनन चौं अंगुलींनीं ॥ आपले उजवे कानीं । जो उमटे ध्वनी । तिकडे मन लावोनीं । एकाग्र मनीं ऐकावें ॥ घवराट होता त्या समयास । सोडावें वाम नासापुटास । पुन्हां धरूनि तयास । उजव्यानें श्वास सोडावा ॥ असें पुनः पुनः करावें । नादीं लक्ष्य लावावें । सूक्ष्म नाद ऐकावे । स्थूल सोडावे सर्वथा ॥ दशविध नाद होती । हे भरती चित्तीं । ये उन्मनी स्थिति । सर्व वृत्ती वारूनी ॥ येणें होईं समाहित । राही योगी प्रसन्नचित्त । होई एकांत भक्त । हा विमुक्त जाणावा॥ हें ज्याच्या हातून घडून येत नाहीं, त्यानें श्रीविष्णूचें ध्यान करावें असें २३ व्या अध्यायांत टेंबे स्वामींनीं सांगितलें आहे. ध्यान कसें करावें हें सांगून स्वामी म्हणतात "ज्या ध्यातां ये महोत्सव । ज्याचा वाचक प्रणव । तयाचे तीन अवयव । अकार उकार मकार ॥ या मात्रा तीन । ऋषि देवादि जाणून । करावें तयाचें ध्यान । पापा जाळुनी टाकी जें ॥ एकांतीं बसून ।

घालूनि दृढासन । दीर्घ उच्चार करून । भावें प्रणव जपावा ॥ अकार उकार मकार । या तीन मात्रा निर्धार । जीचा नोहे उच्चार । सूक्ष्मतर अर्धमात्रा ती ॥ ही मात्रा योगी जाणिती । जशी मुंगीची गती । तशी मस्तकीं ती । घुसे सूक्ष्म गतीनें ॥ ही गांधार स्वरासम । म्हणूनी गांधारी हें नाम । इला ध्याती योगी परम । ही विश्राम दे जीवा ॥......दीर्घ म्हणतां ओम्कार । जो होई उच्चार । मस्तकीं घुमे तो मनोहर । त्रिकाल दररोज जपतां ॥ उच्चारितां नेटें । जो ध्यानीं उमटे । तो उत्तरोत्तर गोड वाटे । मागें हटे मनोराज्य ॥ ध्यावें धनुष्य ओम्कार । अभ्यासावें ओठानें बरोबर । लावूनि मन हा शर । वेधावें परब्रह्म तें ॥

हें काम सावधान चित्तानें केलें पाहिजे, असा इषारा स्वामींनीं दिला आहे. प्रत्येक मात्रेचीं बीजें देऊन, वैश्वानर, तजस आणि प्राज्ञ, ह्या देवतांचाहि उल्लेख स्वामींनीं केलेला आहे आणि शेवटीं हें प्रणव प्रकरण प्रश्नोपनिषदांतील ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद ह्यांची माहिती देऊन संपविलें आहे.

## ॐकारभक्त सद्‌गुरु दत्तात्रेयांचे चरणीं मस्तक

स्वामी विवेकानंदांप्रमाणें टेंबे स्वामी हेसुद्धां अर्वाचीन आहेत. एकास काली देवता प्रसन्न होती तर दुसरे साक्षात्कारी म्हणून नांवाजलेले आहेत. स्वकीय अनुभवांना धरून 'प्रणवोपासना' हा ग्रंथ लिहितांना जुन्या नव्यांचें मिश्रण करण्याच्या पद्धतीनें श्री. श्री. म. वैद्य यांनीं ऊहापोह केला आहे. हीं अलिकडच्या अनुभवशीर साक्षात्कार्‍यांचीं उदाहरणें झालीं. कांहीं शतकें मागें जाऊन ॐकाराचे परमभक्त म्हणून नांवाजलेले श्रीपाद स्वामींचे अवतार श्रीनरहरस्वामी यांचा आदरणीय उल्लेख करून हें विवेचन संपविण्यांत येत आहे. श्रीनरहरस्वामी यांनीं ७ वर्षांचे होईपर्यंत अर्थात् मुंज

होईपर्यंत ॐकाराशिवाय दुसरा शब्द उच्चारिला नाहीं. ओम् ह्या अक्षरांचे जपांत त्यांनीं जन्मल्यापासूनचीं सात वर्षें घालविलीं. म्हणून त्यांना अवतारी असें लोक म्हणूं लागले. मुंजीच्या वेळीं गायत्री मंत्र सांगितला जात असतांना स्वामींनीं मनोमयच त्याचा उच्चार केला. यानंतर भिक्षा घेऊन स्वामींची माता आली! त्यावेळीं ॐकाराचा ७ वर्षें स्वामींनीं जप कां केला हें सर्वांचे ध्यानीं आलें. या प्रसंगाचें वर्णन श्रीगुरुचरित्रांत येणेंप्रमाणें करण्यांत आलें आहे. "पहिली भिक्षा येणेंपरी । देती जाहली प्रीती करी । "अग्नि मिळें" म्हणोनि उच्चारी । ब्रह्मचारी तया वेळीं ॥ दुसरी भिक्षा देत माता । उच्चार केला यजुर्वेद "इषेत्वा" । लोक समस्त तटस्था । माथा तुकविती तिये वेळीं ॥ तिसरी भिक्षा देत माता । होय सामवेद पढतां । आग्न आयाहि "गायन" करितां । वेद तीनहि म्हणत असे ॥ हें गुरुचरित्रांतील वर्णन ऐकून सद्गुरु दत्तात्रेय–चरणीं कोण मस्तक ठेवणार नाहीं ?

---

# विवेचन आठवें

**अमात्रश्चतुर्थोऽव्यवहार्यः प्रपंचोपशमः शिवोऽद्वैत एवमोङ्कार आत्मैव संविशत्यात्म्यनाऽऽत्मानं य एवं वेद !!**

( ज्याला मात्रा नाहींत, जो व्यवहाराचे बाहेरला आहे, प्रपंचाचा उपशम, जो शिव ( कल्याण ) आहे, अद्वैत असा चौथा ॐकार हाच आत्मा होय. जो हें जाणतो तो स्वतः आत्म्यांत प्रवेश करितो. )

सर्वांचा उपशम जेथें होतो त्या कल्याणस्वरूपी आणि ॐकारस्वरूपी आत्म्यानें आत्म्यांत कसा प्रवेश केला ह्याचा ऊहापोह करण्याकरितां हें आठवें विवेचन आहे. त्याला प्रारंभ करण्यापूर्वी ॐकाराविषयींची अवांतर माहिती वाचकांस कळणें जरुरीचें आहे.

## ॐकारांत शिरून देवांना मृत्यूपासून अभयत्व

छांदोग्यांत एक आख्यायिका सांगितली आहे. एकाकाळीं देवांचीं नांवें ऋषींना आठवेनाशीं झालीं. म्हणून ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद ह्यांच्यातील प्रत्येक मंत्राची व देवतांच्या नांवांची सांगड ऋषींनीं घालून दिली. विस्मृतिरूपी मृत्यूला भिऊन ' त्रयीं विद्यां प्राविशन् ' ते देव ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद ह्यांच्या आश्रयास गेले ! ते देव स्वतःला छंदांनीं आच्छादित करिते झाले. हें त्या छंदांचे छंदत्व होय. आच्छादित करणारे म्हणून त्यांना छंद म्हणण्यांत येतें. पाण्यांत जसा मासा दिसावा तसे ते देव त्रयी विद्येंत दिसूं लागले. पुनरपि देवांना मृत्यूचें भय वाटलें ! मृत्यु त्यांची पाठ सोडेना ! तेव्हां ते देव ॐ ह्या अक्षरांत शिरले आणि मृत्यूचें भय त्यांना वाटेनासें झालें. ॐकार हें तत्त्व सर्व देवांच्या नांवाखेरीज उल्लेख-

विण्याचा सांप्रदाय ह्या आख्यायिकेमुळें पडला ! श्रीगजानन हें नांव स्वरूप-दर्शक आहे; आणि असल्या देवतेऐवजीं ॐचा उच्चार करणें वाजवी होणार नाहीं. पण स्वरूपदर्शक नसणाऱ्या प्रत्येक देवाच्या नांवाचा विस्मृतीमुळें उच्चार करावयास साधलें नाहीं तर अशा प्रसंगीं त्याऐवजीं नुसत्या ॐकाराचा उपयोग करून भागणारें आहे. देव मृत्युपासून ॐकारांत शिरून जसे अभय झाले, तसें ॐकाराची उपासना करणारा प्रत्येक मनुष्य सद्गतीला जातो, असा शेरा श्रुतीनें ह्या प्रसंगीं शेवटीं मारला आहे.

## आमेन म्हणजे ॐकार

ॐ इति ब्रह्म ॥ १ ॥ ॐ इतीदं सर्वं ॥ २ ॥ ह्या दोन मंत्रांत ॐकाराचे श्रौतकाळीं कसें व्यापक स्वरूप होतें, ह्याचें वर्णन आहे. पहिल्या मंत्रांत ॐ हा ब्रह्माचा वाचक शब्द आहे, असें म्हटलें आहे. "ओमित्येतद नुकृतिर्हस्म" ॐ हें (होय हें) अनुकृतीचें (सांगितल्याप्रमाणें करण्याचें) दर्शक आहे, हें प्रसिद्ध आहे. अनुकृती म्हणजे कृतीला अनुसरून आमची कृती आहे, असें जाहीर करणें; वक्त्यानें जें कांहीं प्रतिपादलें असेल त्याशीं आमचेंहि मत जुळतें आहे असें सांगणें; वक्त्यानें जें मत प्रतिपादिलें असेल त्या मताला अनुकूल आम्हींहि आहोंत, असें निदर्शनास आणून देणें; हेहि अर्थ अनुकृति शब्दापासून निघतात. मुसलमानांच्या सभांतून "आमेन" "आमेन" म्हणून संमति दाखविण्यांत येते. आमेन म्हणजे ओम्. श्रौत-काळीं ॐच्या ऐवजीं आ उ किंवा ओ उ म् अशीं अक्षरें वापरीत असत. आमेन शब्द हेब्रू भाषेंतून आला असून संस्कृतांतील आ उ म्‌चा अपभ्रंश आहे. "तत्वा एतदनुसार" "तें हें (ॐ)" संमतिदर्शक अक्षर असतें. संमतीचें प्रदर्शन जें मुसलमानींत करण्यांत येतें तें हेब्रूवरून करण्यांत येतें आणि ती भाषा संस्कृतांतील विचार चोरण्याइतकी प्रगल्भ स्थितीला आल्या-

नंतर असले विचार चोरले गेले असले पाहिजेत हें अनुमान निघत नाहीं काय? मुसलमानी धर्म स्थापला गेला तत्पूर्वी हेब्रू भाषा कित्येक शतकें प्रगल्भ स्थितीला पोंचली होती, आणि मुसलमानांनीं संमतिदर्शक अशा 'आमेन' चा उपयोग करण्यापूर्वी आमेनचा तसा उपयोग हेब्रू भाषा बोलणारांत कित्येक शतकांचा प्रघात असावा, हें अनुमान काढण्यास कोणती हरकत?

## एकविचार हें समृद्धीच लक्षण

"एषा एव समृद्धिर्यदनुज्ञा" ही संमति हेंच समृद्धीचें लक्षण असतें. असें जो जाणतो तो इष्ट वस्तूंची समृद्धि करणारा होतो. इष्ट वस्तूंची समृद्धि झाली म्हणजे त्या त्या समाजाची भरभराट होते; आणि इष्ट वस्तूंची समृद्धि करणारालाहि समाजाचा नेता असें म्हणतात. अशी राष्ट्रीय उन्नति कोणाचे हातून घडून येते? रामदास म्हणतात 'एक विचारें' सर्व राष्ट्राला अलंकृत करितो तोच समाजांतील अग्रणी होऊं शकतो. 'एकविचारें' सर्वांना भारून टाकावयाचें कसें? आपल्या विचाराला अनुकूल मतें ज्यांचीं असतील तितक्यांना प्रथम हस्तगत करून घ्यावयाचें आणि मागाहून विरोधी मंडळीं-तील मतें फोडावयाचीं. कार्य करण्यास योग्य मतें जीं असतील तितक्यांकडून इष्ट वस्तूंचा संग्रह करण्यास प्रारंभ केला म्हणजे समृद्धि हां हां म्हणतां होते आणि समाजाच्या नेत्याची माळ गळ्यांत पडते.

## ॐकाराच्या विनियोगाचा व्यापकपणा

ॐ श्रावयेत्याश्रावयन्ति—"मंत्र ऐकवा असें म्हटल्यावर ओमकारपूर्वक ऐकवितात." ओंपूर्वक सामगायन करितात. ओं किंवा शोम् म्हणून सूक्तें वर्णितात. "ओमित्यध्वर्युः प्रतिगरं प्रतिगृणाति"—ओम् असें म्हणून अध्वर्यु प्रत्येक मंत्र उच्चारितो. "ओमिति ब्रह्मा प्रसौति."—"ओम् म्हणून ब्रह्मा

प्रेरणा देतो." "ओमित्यग्निहोत्रमनुजानाति" " ओम् म्हणून अग्नींत आहुति देण्यास अनुमोदन देतात."—श्रौत कर्मांत ब्रह्मा, अध्वर्यु, होता आणि अग्निध्र वगैरे ऋत्विज मुख्य असतात. अध्वर्यु जेव्हां अग्निध्र इत्यादिकांना मंत्र म्हणण्यास सांगतो तेव्हां त्याच्या आज्ञेस प्रैष असें म्हणतात. प्रैष देतांना तो ओ३श्राऽऽवय असें म्हणतो. प्रैष–वाक्यांतील पहिला अतिदीर्घ ओकार हें ॐकाराचेंच अनुकरण आहे. ओमच्या ऐवजीं आ३, किंवा ओ३म् असेंहि म्हणण्याची वहिवाट आहे. गवई गाण्याचे प्रारंभीं ज्याप्रमाणें आ चा उच्चार करून स्वर लावितात त्याप्रमाणें सामगायन करणारे ओम्काराचा उच्चार करितात. शास्त्र ( सूक्त ) पठण चालू असतांना ऋचेचे मध्यें आणि शेवटीं अध्वर्यूनें शाबास असें म्हणावयाचें असतें. त्याकरितां 'ओ३था मोद इव' हें वाक्य म्हणतात. तुमचें म्हणणें ऐकून आम्हास फार आनंद झाला, असा ह्या वाक्याचा अर्थ आहे. या प्रशंसोद्गाराला प्रतिगर म्हणतात. ऋत्विजामध्यें ब्रह्मा हा मुख्य असतो. बृहस्पती सर्व देवांचा मार्गदर्शक ज्याप्रमाणें आहे, त्याप्रमाणें ब्रह्मा हा मनुष्यांचा मार्गदर्शक असतो, असें तैत्तिरीय संहितेंत म्हटलें आहे. अध्वर्यूला बऱ्याच प्रसंगीं ब्रह्म्याची अनुज्ञा घ्यावी लागते. ही देतांना प्रारंभीं ओम्काराचा उच्चार करावा लागतो. म्हणून ब्रह्मादेखील " ओंऽऽऽप्रोऽऽऽक्ष " अशी ओम्पूर्वक प्रेरणा करितो. अध्वर्यूला कांहीं वेळां यजमानाला अनुज्ञा विचारावी लागते. ही देखील अनुज्ञा ओम्पूर्वक देण्यांत येते. ब्रह्मयज्ञांत प्रारंभीं संकल्पादि विधि झाल्यावर ब्रह्मयज्ञाची सुरवात ॐकारपूर्वकच होते. ब्रह्मप्राप्ति हेंच ओम्काराच्या उपासनेचें फल सांगितलें आहे. प्रणवाची पूर्ण उपासना करणारा मनुष्य ब्रह्मलोकास जाऊन पुढें तो शुद्ध ब्रह्मतत्त्वांत मिळून जातो. ओम्कारांचे योगानें प्रत्यक्ष ब्रह्मोपसनाच होते असें श्रुतीचें मत आहे.

संस्कृत काव्यांतून क्वचित् प्रसंगीं होकार ह्या अर्थी ओम्काराचा उपयोग केलेला आढळतो. होकार ह्या अर्थी " शिशुपाल वध " ह्या काव्याच्या

पहिल्या सर्गाच्या शेवटच्या श्लोकांत ओम्काराचा उपयोग करण्यांत आलेला आहे. सदर श्लोक येणेंप्रमाणें आहे:—

ओमित्युक्तवतोऽथ शार्ङ्गिण इति व्याहृत्य वाचं नभ-
स्तस्मिन्नुत्पतिते पुरः सुरमुनाविन्दोः श्रियं बिभ्रति ।
शत्रूणामनिषं विनाशपिशुनः क्रुद्धस्य चैद्यं प्रति
व्योम्नीव भ्रुकुटिच्छलेन वदने केतुश्चकारास्पदम् ॥

मराठींत हुमकार आम्हीं वापरतो; संस्कृतांतसुद्धां ओम्काराचे ऐवजीं हुमकार वापरण्यांत येतो. गुजराथी भाषेंतील एम् (असें आहे) हा शब्द देखील ओम्कारांतूनच व्यवहारांत आलेला असावा.

## आत्मदर्शनाचा मार्ग

अशा रीतीनें अवांतर गोष्टींचा उल्लेख केल्यावर, आत्मदर्शनासाठीं उत्सुक असलेल्यांना आत्मदर्शनाचा मार्ग दाखवूं या. ब्रह्म आणि आत्मा ह्यांत बिलकूल फरक नाहीं. वैश्वानर, तैजस आणि प्राज्ञ हीं सर्वव्यापी आत्म्याचीं स्वरूपें होत; आणि त्यांच्या सामर्थ्यानेंच स्थूल व सूक्ष्म सर्व व्यापार चालतात. म्हणून हीं आत्मस्वरूपें प्रणवोपासनेंतील उपास्य देवता होत, असें श्रुतीचें मत आहे. आत्मदर्शन घेऊं इच्छिणारांनीं वरील मार्गाचा विचार करावा, अशी विनंति करण्यांत येत आहे.

## परोपकारांत आत्मानुभवाचा आनंद

आत्मा अन्तःप्रज्ञ नाहीं. अन्तःप्रज्ञ म्हणजे वासनारूप नाहीं. आत्मा बहिःप्रज्ञ नाहीं; विषयरूप नाहीं. वासना आणि संसारांतील निरनिराळे विषय ह्यांच्या पलिकडचा आत्मा असून उभयविध प्रकारांपासून तो अलिप्त आहे. आत्मतत्त्व हें एकीकृत ज्ञानरूप नव्हे, बुद्धिरूप नव्हे, जडस्वरूप नव्हे; जें दृश्य आहे तेंहि नव्हे; व्यवहाराचे कक्षेंत सांपडणारें नव्हे. आत्मा इंद्रिय-

ग्राह्य नव्हे—म्हणजे रूपरसादि इंद्रियांना समजणारे जे विषय आहेत त्यांतला हा नव्हे. ह्याचें लक्षण (व्याख्या) करतां येत नाहीं. चिंतनानें हा स्पष्ट होणारा नव्हे, दाखवितां येण्यासारखा नाहीं. आत्मानुभवाचें सार हा आहे. ॐकाराला नमस्कार करून ज्ञानेश्वर महाराजांनीं 'स्वसंवेद्या' असें वर्णन केलेलें आहे. त्याची आठवण ह्या जागीं झाल्यावांचून रहात नाहीं. प्रपंच आतां पुरे आहे असें वाटविणारा आत्मा आहे. हा शांत आहे. म्हणजे उच्छृंखल जेवढें आहे त्याचा त्याग करण्यास आणि शरिरानें, मनानें व बुद्धीनें शांत रहाण्यास हा आत्मा शिकवितो. हा शिवस्वरूप आहे म्हणजे कल्याणरूप आहे. आपण जेव्हां आपल्याहून इतरांचें कल्याण करितों तेव्हां ब्रह्मानंदाचा किंवा आत्मानंदाचा अनुभव घ्यावयास मिळतो. ब्रह्म किंवा आत्मा आनंदमय असल्यामुळें व कल्याण केल्यामुळें आत्मबुद्धीच्या प्रसादाचें सुख (आत्मबुद्धिप्रसादजं सुखं) हें प्रत्यक्ष आपल्या अनुभवास येतें. परोपकारासारखें पुण्य नाहीं आणि परपीडन केल्यासारखें पाप नाहीं, असें महाभारतांत सांगितलें आहे. परोपकार करणें म्हणजे आपल्याहून दुसऱ्याचें कल्याण करणें होय. आत्मानंदाचा अनुभव हवा असल्यास परोपकार करावा लागतो आणि परपीडन टाकावें लागतें. अद्वैत म्हणजे त्याच्या तोडीचा विश्वांत सांपडणें शक्य नाहीं असा आत्मा आहे. त्याला ब्रह्माचा चौथा अंश (पाद) मानितात. चौथा पाद म्हणजेच आत्मा होय; तोच जाणला पाहिजे. आत्म्यापर्यंत ज्ञानाची सीमा पोंचविली पाहिजे.

## परहितांत पायरी पायरीनें परमेश्वरी साक्षात्कार

हें आत्म्याचें वर्णन झालें. आत्म्याची अंश—कल्पना विचाराकरितां आहे. आत्म्याशीं संलग्न असलेल्या बुद्धीच्या मार्फत जरी आत्मदर्शन घडत असलें तरी बौद्धिक ज्ञानाच्या प्रकारांहून आत्मा वेगळा आहे. बौद्धिक ज्ञानाच्या साधनाहून आत्मा वेगळा आहे असें येथें नमूद करण्यांत आलें आहे. एक अशी

आत्मरूप संवेदना ही आत्म्याचें स्वरूप होय. परमेश्वराचें दर्शन पायरी पायरीनें होतें; आणि तसें तें होऊं लागलें असतां प्रपंचाचा उपशम होऊं लागतो. परोपकाराची आपली प्रवृत्ति वाढत चालली म्हणजे पायरी पायरीचा परमेश्वरी साक्षात्कार होऊं लागला आहे, असें समजावें. परोपकाराची प्रवृत्ति वाढवणें म्हणजे परमेश्वरी साक्षात्कार होणें, असें कशावरून म्हणतां येईल ? परोपकाराची प्रवृत्ति वाढल्यानें परमेश्वरी आनंदाचा भाग आम्हांस मिळतो आणि असें होणें हा परमेश्वरी साक्षात्कार नव्हे काय ? असें होणें म्हणजे शिव ऊर्फ मंगल ऊर्फ त्यासाठींच जगावयाचें आणि मरावयाचें नव्हे काय ? संसाराचा उपशम होऊन परांचें मंगल ऊर्फ कल्याण पाहण्यासाठीं जगावयाचें किंवा मरावयाचें, ह्या स्थितीहून जीवन्मुक्त अवस्था निराळी नाहीं.

## ॐकाराच्या सिद्धीनें जीवन्मुक्त अवस्था आणि मुक्ति

मथळ्यावरील मंत्रांत ओम्काराचें वर्णन आहे. ओम्काराच्या अ, उ, आणि म् ह्या तीन मात्रा व त्यांच्या देवता ह्याविषयींचा विचार झाल्यानंतर तीनहि अवस्थांच्या पलिकडच्या ऊहापोहास प्रारंभ झाला आहे. म्हणून 'अ-मात्र' ह्या शब्दानें ती स्थिति दाखविण्यांत आलेली आहे. अकार वैश्वानर देवतेचे गुण दाखवितो. वैश्वानराचा कोणचा गुण दाखवितो? वैश्वानर म्हणजे सूर्याचे अंशीं असलेलें तेज किंवा मानवी देहांत असलेला अग्नि. उकाराची देवता तैजस ही आहे. ही तेजाची देवता आहे. म्काराची प्राज्ञ ( बुद्धीची ) देवता आहे. बुद्धि म्हणजेच तेज. ह्या तीनहि देवता तेजाच्या आहेत. तेजाचें ध्यान करतां करतां त्या ध्यानांत प्रथम गोडी उत्पन्न होते आणि मग मनाचें एकीकरण होतें, मन एकाग्र होऊं लागलें म्हणजे लय-योगांत सिद्धी मिळते, आणि साधन व साध्य-ओम्कार आणि आत्मा-ह्यामधील अंतर नाहींसें होऊन अ-मात्र ओम्कार हाच आत्मा आहे असें ज्ञान होतें. अशी जाणीव झालेल्या ओम्कारानें ऊर्फ आत्म्यानें आत्म्यांत प्रवेश केल्यावर मनुष्य मरणापूर्वी जीवन्मुक्त अवस्थेचें माहात्म्य अनुभवतो आणि मेल्यावर मनुष्य मुक्त होतो.



# खाडिलकरांची
# ॐकाराची उपासना

मांडूक्य, छांदोग्य आणि प्रश्न उपनिषदांतून ॐकाराचा सविस्तर उहापोह केलेला आहे. मांडुक्य उपनिषद् समग्र येथें दिलेलें आहे; छांदोग्या-पैकीं अवश्य भागहि येथें दिलेला आहे; आणि प्रश्नोपनिषदापैकीं पांचवा प्रश्न येथें दिलेला आहे. तैत्तिरीय उपनिषदांतील एका अनुवाकांत ॐकाराचें वर्णन आलेलें आहे; तोहि अनुवाक येथें दिलेला आहे. १०८ उपनिषदें प्रसिद्ध झालेलीं आहेत. ह्यांपैकीं 'कठ' आणि 'मुंडक' हीं दशोपनिषदांपैकीं होत. कठांत आणि मुंडकांत ॐकाराचा उल्लेख आलेला आहे, तो येथें दिलेला आहे. दशोपनिषदां खेरीज करून १०८ पैकीं बाकी राहिलेल्या ज्या उपनिषदांतून ॐकाराचा निर्देश आलेला आहे तीं स्थळें शोधून काढून तींहि देण्यांत आलेलीं आहेत.

## *मांडूक्योपनिषद्*

[ हें उपनिषद् अथर्ववेदांतील असून, मंडूकऋषि नांवाचा ऋषी हा त्याचा द्रष्टा असल्यानें मांडूक्य असें नांव उपनिषदाला पडलें आहे. ]

### शांतिमंत्र

ॐ भद्रं कर्णेभिः श्रृणुयाम देवाः ॥ भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ॥
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः । व्यशेम देवहितं यदायुः ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्ति ॥

देवांनो, आमच्या कानांनीं भद्र ऐकावें; आमच्या डोळ्यांनीं भद्र असेल तें पहावें: निश्चल इंद्रियांनीं युक्त अशा शरीरांनीं तुमचें स्तवन करूं इच्छिणारे आम्ही जें देवांना इष्ट आयुष्य ( जीवन ) आहे तें उपभोगावें.

**ओमित्येतदक्षरमिदं सर्वं तस्योपव्याख्यानं भूतं भवद्भविष्यदिति सर्वमोङ्कार एव ॥ यच्चान्यत् त्रिकालातीतं तदप्योङ्कार एव ॥ १ ॥**

हें सर्व ॐ अक्षर आहे. त्याचें विवेचन—झालेलें, होत असलेलें व होणारें हें सर्व ॐकार रूपच आहे—जें दुसरें ह्या तीन कालांच्या पलिकडचें आहे तेंहि ॐकार स्वरूपच आहे.

टीप:—उप शब्दानें गौण किंवा अंगभूत असा अर्थ सुचविला जातो, तसा अर्थ केल्यास विवेचन म्हणण्याऐवजीं अंगभूत किंवा लहानसें स्पष्टीकरण असें म्हणावें लागतें.

**सर्वंह्येतद्ब्रह्मायमात्मा ब्रह्म । सोऽयमात्मा चतुष्पात् ॥ २ ॥**

ज्या अर्थी हें सर्व ब्रह्म आहे त्याअर्थी हा आत्माहि ब्रह्मच आहे. तेव्हां आत्मा चार पायांचा ( अंशांचा ) आहे.

**जागरितस्थानो बहिःप्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः स्थूलभुग्वैश्वानरः प्रथमः पादः ॥ ३ ॥**

जागृतस्थानीं असणारा, सात अंगें ज्याला आहेत असा, ( पांच कर्मेंद्रियें, पांच ज्ञानेंद्रियें, पंचप्राण, आणि अंत:करणचतुष्टय अशीं )

एकोणीस मुखें ( विषयज्ञानाचीं द्वारें ) ज्याला आहेत असा, स्थूल विषयांचा उपभोग घेणारा वैश्वानर ( विश्वत: स्वरूप ) हा पहिला पाद ( अंश ) होय.

**स्वप्नस्थानोऽन्तःप्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः प्रविविक्तभुक् तैजसो द्वितीयः पादः ॥ ४ ॥**

स्वप्नस्थानीं असणारा, आंतील आहे प्रज्ञा ( बुद्धि ) ज्याची असा ( मनोमय विषयांचें ज्ञान असणारा ), सात अंगें असणारा, एकोणीस मुखांचा, नितांत सुंदर ( सूक्ष्म ) विषयांचा उपभोग घेणारा तैजस ( तेजोरूप ) हा दुसरा अंश होय.

**यत्र सुप्तो न कंचन कामं कामयते न कंचन स्वप्नं पश्यति तत्सुषुप्तम् ॥ सुषुप्तस्थान एकीभूतः प्रज्ञानघन एवानन्दमयो ह्यानन्दभुक् चेतोमुखः प्राज्ञस्तृतीयः पादः ॥ ५ ॥**

ज्या अवस्थेंत निजलेला मनुष्य कोणत्याहि विषयांची इच्छा करीत नाहीं, कोणतेंहि स्वप्न पहात नाहीं, ती सुषुप्ति होय. ज्याचें ज्ञानघन एकविध झालेलें म्हणजे आवरलेलें असतें, असा आनंदमय असून आनंदाचा उपभोग घेणारा, बुद्धि हेंच ज्याचें मुख आहे असा प्राज्ञ हा तिसरा अंश आहे.

**एष सर्वेश्वर एष सर्वज्ञ एषोऽन्तर्याम्येष योनिः सर्वस्य प्रभवाप्ययौ हि भूतानाम् ॥ ६ ॥**

हा ( वैश्वानर, तैजस व प्राज्ञ ह्या स्वरूपांचा ) सर्व जगाचा अधि-

पति ( सर्वेश्वर ), सर्व जाणणारा, सर्वांचे अन्तःकरणांत राहून त्यांचें नियमन करणारा, सर्व विश्वाचें उत्पत्तिस्थान आणि सर्व पदार्थांची उत्पति व लय करणारा आहे.

**नान्तःप्रज्ञं न बहिःप्रज्ञं नोभयतःप्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम् ॥ अदृष्टमव्यवहार्यमग्राह्यमलक्षणमचिन्त्यमव्यपदेश्यमेकात्मप्रत्ययसारं प्रपंचोपशमं शान्तं शिवमद्वैतं चतुर्थं मन्यन्ते स आत्मा स विज्ञेयः ॥ ७ ॥**

जें आंतील प्रज्ञा ज्याची ( वासनारूप ) आहे असें नव्हे, जें बाहेरची प्रज्ञा आहे ज्याची (विषयरूप) असें नव्हे, जें उभयस्वरूप नव्हे, जें एकवटलेलें ज्ञानरूप नव्हे, जें बुद्धिरूप नव्हे, जें जडस्वरूप नव्हे, जें दृश्य नव्हे, जें व्यवहारांत सांपडणारें नव्हे, जें इंद्रियग्राह्य नव्हे, जें विशेष लक्षणानें युक्त नव्हे, जें चिंतनांत सांपडणारें नव्हे, जें दाखवितां येण्यासारखें नव्हे, जें अद्वितीय आत्मानुभवाचें सार, प्रपंचाचा उपशम, शांत, शिव (कल्याण) रूप, अद्वैत, तें त्याचा (ब्रह्माचा) चौथा पाद (अंश) मानितात. तोच आत्मा होय; आणि तोच जाणला पाहिजे.

**सोऽयमात्माऽध्यक्षरमोङ्कारोऽधिमात्रं पादा मात्रा मात्राश्च पादा अकार उकार मकार इति ॥ ८ ॥**

तो हा अक्षररूपानें वर्णिला जाणारा आत्मा मात्रांच्या रूपानें ॐकार होय. (आत्म्याचे) पाद म्हणजे अंश ह्याच ॐकाराचा मात्रा, ॐकाराच्या मात्रा हेच आत्म्याचे पाद (अंश) होत. त्या मात्रा अकार, उकार आणि मकार ह्या होत.

**जागरितस्थानो वैश्वानरोऽकारः प्रथमा मात्राप्तेरादिमत्त्वाद्वा आप्नोति ह वै सर्वान्कामानादिश्च भवति य एवं वेद ॥ ९ ॥**

जागृतस्थानीं असलेला असा वैश्वानर हा अकार (ॐकारांतील अ) म्हणजे पहिली मात्रा होय. कारण अ हा सर्व शब्दोच्चारांना व्यापलेला म्हणून पहिला (श्रेष्ठ) आहे. जो ह्याप्रमाणें जाणतो तो सर्व मनोरथ प्राप्त करून घेतो आणि श्रेष्ठ होतो.

**स्वप्नस्थानस्तैजस उकारो द्वितीया मात्रोत्कर्षादुभयत्वाद्वोत्कर्षति ह वै ज्ञानसंततिं समानश्च भवति नास्याऽब्रह्मवित्कुले भवति य एवं वेद ॥ १० ॥**

स्वप्नस्थानीं असलेला असा तैजस उकार (ॐकाराची) दुसरी मात्रा होय; कारण उ हा उन्नतिकारक आहे आणि त्याचा (अ व म) दोन्ही मात्रांशीं संबंध आहे. हें जो जाणतो तो ज्ञानपरंपरा वाढवतो आणि समदृष्टि होतो. त्याचे कुळांत ब्रह्मज्ञानविरहित कोणीहि होत नाहीं.

**सुषुप्तस्थानः प्राज्ञो मकारस्तृतीया मात्रा मितेरपीतेर्वा मिनोति ह वा इदं सर्वमपीतिश्च भवति य एवं वेद ॥ ११ ॥**

सुषुप्तिस्थानीं असलेला असा प्राज्ञ ही ( ॐकाराची ) तिसरी मात्रा होय, कारण ( म् या मात्रेनें अ आणि उ ह्यांचें ) परिमाण ठरविलें जातें आणि त्यांतच त्यांचा लय होतो. जो ह्याप्रमाणें जाणतो तो सर्व परिमाणांना जाणतो आणि सर्व त्यांच्या ठिकाणीं एकरूप होतें.

**अमात्रश्चतुर्थोऽव्यवहार्यः प्रपंचोपशमः शिवोऽद्वैत एवमोङ्कार**

**आत्मैव संविशत्यात्मनात्मानं य एवं वेद य एवं वेद ॥ १२ ॥**

ज्याच्या मात्रा नाहींत, जो व्यवहारांत सांपडलेला नाहीं, प्रपंचाचा उपशम, जो शिव (कल्याण) स्वरूप आहे, अद्वैत असा चौथा ॐकार हाच आत्मा होय. जो हें जाणतो तो स्वतः आत्मस्वरूपांत प्रवेश करतो.

---

# छान्दोग्योपनिषद्

( दशोपनिषदांपैकीं ईशावास्योपनिषद् हें संहितेंतील असून, बाकीचीं नऊ ब्राह्मणग्रंथांतील आहेत. त्या सर्वांत छांदोग्योपनिषद् फार प्राचीन आहे. सामवेदाचें तांड्य नांवाचें ब्राह्मण प्रसिद्ध आहे. त्या तांड्य ब्राह्मणांतील हें छांदोग्योपनिषद् आहे. )

## प्रथम अध्याय; प्रथम खंड

**ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीत ओमिति ह्युद्गायति तस्योपव्याख्यानम् ॥ १ ॥**

ॐ अशा ह्या अक्षरस्वरूप उद्गीथाची उपासना करावी. कारण ॐ असें म्हणूनच उद्गाता ( यज्ञांतील सामगायक ऋत्विज ) गायन करतो. त्याचें व्याख्यान ( उपासना, सामर्थ्य, व फल ) आरंभिलें आहे.

**एषां भूतानां पृथिवी रसः पृथिव्या आपो रसोऽपामोषधयो रस ओषधीनां पुरुषो रसः पुरुषस्य वाग्रसो वाच ऋग्रस ऋचः साम रसः साम्न उद्गीथो रसः ॥ २ ॥**

ह्या भूतांचें सार ( परिणत स्वरूप ) पृथ्वी आहे. पृथ्वीचें सार

पाणी, पाण्याचें सार वनस्पति, वनस्पतींचें सार मनुष्य, मनुष्याचें सार वाचा, वाचेचें सार ऋग्वेद ( मंत्र ), ऋचांचें सार सामवेद, सामांचें सार उद्गीथ ( गायन ) होय.

**स एष रसानां रसतमः परमः परार्ध्योऽष्टमो य उद्गीथः ॥३॥**

जो आठवा उद्गीथ तो हा सारांतील सारतम असा अत्यंत श्रेष्ठ आहे.

**कतमा कतमर्क्कतमत्कतमत्साम कतमः कतम उद्गीथ इति विमृष्टं भवति ॥ ४ ॥**

ऋचा ह्मणजे काय ? साम म्हणजे काय ? उद्गीथ म्हणजे काय ? असे हे विचाराचे प्रश्न आहेत.

**वागेवर्क् प्राणः सामोमित्येतदक्षरमुद्गीथस्तद्वा एतन्मिथुनं यद्वाक् च प्राणश्चर्क् च साम च ॥ ५ ॥**

वाचा हीच ऋचा होय, वाचा हेंच साम होय. ॐ हें अक्षर उद्गीथ होय. जें वाचा व प्राण किंवा ऋचा व साम तेंच हें मिथुन म्हणजे जोडी आहे.

**तदेतन्मिथुनमोमित्येतस्मिन्नक्षरे संसृज्यते यदा वै मिथुनौ समागच्छत आपयतो वै तावन्योन्यस्य कामम् ॥ ६ ॥**

ती ही ( वाणी व प्राण ) जोडी ॐ अशा अक्षरांत एक ठिकाणीं जुळते. ज्यावेळीं दोन पदार्थांचा संयोग होतो, तेव्हांच त्या परस्परांची इच्छा पूर्ण होते.

टीपः—वाणी व प्राण यांच्या विशिष्ट संयोगानेंच ॐकाराचा उच्चार होतो.

**आपयिता ह वै कामानां भवति य एतदेवं विद्वानक्षरमुद्गीथमुपास्ते ॥ ७ ॥**

ह्याप्रमाणें ( ॐकार स्वरूप ) जाणणारा जो ह्या (ॐकार स्वरूपी) अक्षररूपी उद्गीथाची उपासना करतो तो सर्व मनोरथ पूर्ण करणारा होतो.

**तद्वा एतदनुज्ञाक्षरं यद्धि किं चानुजानात्योमित्येव तदाहैषो एव समृद्धिर्यदनुज्ञा समर्धयिता ह वै कामानां भवति य एतदेवं विद्वानक्षरमुद्गीथमुपास्ते ॥ ८ ॥**

तें हें (ॐ) संमतिदर्शक अक्षर असतें. जेव्हां ( कोणी ) कांहीं संमति देतो, तेव्हां ॐ ( होय ) असेंच म्हणतो. हीं संमति हेंच समृद्धीचें लक्षण असतें. असें जाणणारा जो त्या अक्षररूपी उद्गीथाची उपासना करतो तो सर्व इष्ट वस्तूंची समृद्धि करणारा होतो.

**तेनेयं त्रयी विद्या वर्तते ओमित्याश्रावयत्योमिति शंसत्योमित्युद्गायत्येतस्यैवाक्षरस्यापचित्यै महिम्ना रसेन ॥ ९ ॥**

त्या ॐकारानें युक्त अशी विद्या म्हणजे ऋक्, यजु, व सामवेद विद्या आहे. ह्या ॐ अक्षराचे उपासनेकरितां रसमय सामर्थ्यानें म्हणजे प्राणशक्तीनें ( होता ) ॐकारपूर्वक ( स्तोत्रें ) ऐकवितो, ( अध्वर्यु ) ॐकारपूर्वक यजनाची आज्ञा करितो; ( उद्गाता ) ॐकारपूर्वक साम गायन करितो.

**तेनोभौ कुरुतो यश्चैतदेवं वेद यश्च न वेद ॥ नाना तु विद्या**

**चाविद्या च यदेव विद्यया करोति श्रद्धयोपनिषदा तदेव वीर्य-वत्तरं भवतीति खल्वेतस्यैवाक्षरस्योपव्याख्यानं भवति ॥ १० ॥**

जो हें ( ॐकाराचें महत्व ) ह्याप्रमाणें जाणतो व जो (हें) जाणतो ते दोघेहि त्या ॐकाराचींच कर्में करीत असतात. आत्मविद्या एकविध आणि अविद्या—आधिभौतिक विद्या—मात्र नानाविध आहेत. जें हें कार्य श्रद्धेनें आणि औपनिषद ज्ञानानें करण्यांत येतें, तेंच वीर्यवत्तर होतें, असें हें खरोखर ह्या ॐकार अक्षराचें वर्णन आहे.

## देव व असुर ह्यांचा उद्गीथासंबंधाचा कलह

### द्वितीय खण्ड

**देवासुरा ह वै यत्र संयेतिरे उभये प्राजापत्यास्तद्ध देवा उद्गीथ-माजह्रुरनेनैनानभिभविष्याम इति ॥ १ ॥**

देव व असुर असे प्रजापतीचे वंशज ( उपासक ) जेव्हां कलह करूं लागले, तेव्हां देव त्या ( उद्गीथा ) नेंच ह्यांचा ( असुरांचा ) पराभव करूं अशा विचारानें उद्गीथ ( सामगायन ) विद्या जाणिते झाले.

**ते ह नासिक्यं प्राणमुद्गीथमुपासांचक्रिरे तं हासुराः पाप्मना विविधुस्तस्मात्तेनोभयं जिघ्रति सुरभि च दुर्गन्धि च पाप्मना ह्येष विद्धः ॥ २ ॥**

त्या ( देवां )नीं नाकांतून आंत बाहेर जाणाऱ्या प्राणांची उद्गीथ रूपानें उपासना केली; तेव्हां असुरांनीं त्या ( प्राणा ) ला पातकानें विद्ध केलें. ज्या अर्थीं हा (प्राण) पापयुक्त झाला, त्या अर्थीं त्या प्राणांच्या योगानें मनुष्य सुगंध व दुर्गंध हे दोन्हीहि वास घेऊं शकतो.

**अथ ह वाचमुद्गीथमुपासांचक्रिरे तांहासुराः पाप्मना विविधुस्त-स्मात्तयोभयं वदति सत्यं चानृतं च पाप्मना ह्येषा विद्धा ॥ ३ ॥**

नंतर ( देवांनीं ) वाणीची उद्गीथरूपानें उपासना केली. असुरांनीं ती ( वाणी ) पापानें विद्ध केली. ज्याअर्थीं ही (वाणी) पापयुक्त झाली, त्याअर्थी ( मनुष्य ) सत्य व असत्य दोन्हीहि बोलूं शकतो.

**अथ ह चक्षुरुद्गीथमुपासांचक्रिरे तद्धासुराः पाप्मना विविधुस्तस्मा-त्तेनोभयं पश्यति दर्शनीयं चादर्शनीयं च पाप्मना ह्येतद्विद्धम् ॥ ४ ॥**

नंतर ( देवांनीं ) डोळ्यांची उद्गीथरूपानें उपासना केली. असुरांनीं ते ( डोळे ) पापांनीं विद्ध केले. ज्याअर्थीं हे ( डोळे ) पापयुक्त झाले, त्याअर्थीं ( मनुष्य ) पहाण्यास योग्य व पहाण्यास अयोग्य दोन्हीहि पाहूं शकतो.

**अथ ह श्रोत्रमुद्गीथमुपासांचक्रिरे तद्धासुराः पाप्मना विविधुस्तस्मा-त्तेनोभयं शृणोति श्रवणीयं चाश्रवणीयं च पाप्मना ह्येतद्विद्धम् ॥ ५ ॥**

नंतर ( देवांनीं ) कर्णेंद्रियाची उद्गीथरूपानें उपासना केली. असुरांनीं तें कर्णेंद्रिय पापानें विद्ध केलें. ज्याअर्थीं हें ( कर्णेंद्रिय ) पापयुक्त झालें, त्याअर्थीं ( मनुष्य ) ऐकण्यास योग्य व ऐकण्यास अयोग्य हीं दोन्हीहि ऐकूं शकतो.

**अथ ह मन उद्गीथमुपासांचक्रिरे तद्धासुराः पाप्मना विविधुस्तस्मा-**

**तेनोभयं संकल्पयते संकल्पनीयं चासंकल्पनीयं च पाप्मना ह्येतद्विद्धम् ॥ ६ ॥**

नंतर ( देवांनीं ) मनाची उद्गीथरूपानें उपासना केली. असुरांनीं तें ( मन ) पापानें विद्ध केलें. ज्या अर्थीं हें ( मन ) पापयुक्त झालें त्या अर्थीं ( मनुष्य ) त्या मनानें कल्पना करण्यास योग्य व कल्पना करण्यास अयोग्य अशा दोन्हीहि प्रकारच्या कल्पना करूं शकतो.

**अथ ह य एवायं मुख्यः प्राणस्तमुद्गीथमुपासांचक्रिरे तं ह्यसुरा ऋत्वा विदध्वंसुर्यथाश्मानमाखणमृत्वा विध्वंसेतैवम् ॥ ७ ॥**

नंतर देवांनीं हा जो मुख्य हृदयस्थ प्राण, त्याची उद्गीथरूपानें उपासना केली. ज्याप्रमाणें एखादा ठिसूळ पदार्थ न फुटणाऱ्या कहार जातीच्या झाडावर पडून नाश पावतो, त्याचप्रमाणें असुर त्या ( मुख्य प्राणा ) वर पडून नष्ट झाले.

**यथाश्मानमाखणमृत्वा विध्वंसत एवं हैव स विध्वंसते य एवंविदि पापं कामयते यश्चैनमभिदासति स एषोऽश्माखणः ॥ ८ ॥**

जसा ( एखादा पदार्थ ) दगडावर पडला असतां फुटून जातो तसा, जो असें प्राणाचें महत्त्व जाणणाऱ्या उद्गीथोपासकाविषयीं दुष्ट वासना ठेवतो आणि त्याच्या नाशास प्रवृत्त होतो, त्याचाच नाश होतो. तो हा ( मुख्य प्राण ) अश्माखण ( दुर्भेद्य ) आहे.

**नैवैतेन सुरभि न दुर्गन्धि विजानात्यपहतपाप्मा ह्येष तेन यदश्नाति**

**यदि्यवति तेनेतरान् प्राणानवत्येतमु एवान्ततोऽवित्त्वोत्क्रामति व्याददात्येवान्तत इति ॥ ९ ॥**

हा ( मुख्य प्राण ) निष्पाप असतो; त्यामुळें तो सुगंध किंवा दुर्गंध जाणत नाहीं ( लक्षांत घेत नाहीं ). तो जें खातो व जें पितो त्याच्या योगानें इतरांचें ( इंद्रिय शक्तीचें ) संरक्षण होतें. हें ( अन्नपान ) शेवटीं न पोंचल्यामुळें तो ( देहांतून ) निघून जातो, म्हणून शेवटीं तोंड वासतें.

**तं हाङ्गिरा उद्गीथमुपासांचक्र एतमु एवाङ्गिरसं मन्यन्तेऽङ्गानां यद्रसः ॥ १० ॥**

अंङ्गिरस् ऋषीनें त्या (मुख्य प्राणा)ची उद्गीथरूपानें उपासना केली. अंगांचा ( अवयवांचा ) जो रस ( सार ) त्याला ( मुख्य प्राणाला ) अंगिरस मानतात.

**तेन तं ह बृहस्पतिरुद्गीथमुपासांचक्र एतमु एव बृहस्पतिं मन्यन्ते वाग्घि बृहती तस्या एष पतिः ॥ ११ ॥**

बृहस्पती ऋषीनें त्याची ( मुख्य प्राणा )ची उद्गीथरूपानें उपासना केली. वाणी म्हणजे बृहति, तिचा हा पति ( स्वामी ) म्हणून त्याला ( मुख्य प्राणा )लाच बृहस्पती मानतात.

**तेन तं हायास्य उद्गीथमुपासांचक्र एतमु एवायास्यं मन्यन्त आस्याद्यदयते ॥ १२ ॥**

आयास्य ऋषीनें त्याची ( मुख्य प्राणाची ) उद्गीथरूपानें उपासना केली. त्याची गति मुखांतून असते म्हणून त्याला आयास्य मानतात.

**तेन तं ह बको दाल्भ्यो विदांचकार स ह नैमिषीयानामुद्गाता बभूव स ह स्मैभ्यः कामानागायति ॥ १३ ॥**

दल्भ्याचा पुत्र बक ऋषी ही मुख्य प्राणविद्या जाणत होता. तो नैमिषीयांचा उद्गाता, ह्मणजे यज्ञांत सामगायन करणारा ऋत्विज होता. ह्मणून त्यानें त्याकरितां ( नैमिषीयांकरितां ) इष्टफलदायक मंत्रानें गायन केलें.

**आगाता ह वै कामानां भवति य एतदेवं विद्वानक्षरमुद्गीथमुपास्त इत्यध्यात्मम् ॥ १४ ॥**

जो हें ( मुख्य प्राणज्ञान ) जाणणारा ( ॐकार ) अक्षररूप उद्गीथाची उपासना करतो, तो इष्ट फलदायक मंत्रांचा गायनकर्ता ( यज्ञांतील उद्गाता ) होतो. हें ( उद्गीथ उपासनेंतील ) अध्यात्म प्रकरण होय.

( बृहदारण्यकांत देव व असुर ह्यांच्यामधील उद्गीथासंबंधाच्या कलहाची हीच कथा अधिक विस्तारानें दिलेली आहे. )

## तृतीय खण्ड

**अथाधिदैवतं य एवासौ तपति तमुद्गीथमुपासीतोद्यन्वा एष प्रजाभ्य उद्गायति उद्यंस्तमो भयमपहन्त्यपहन्ता ह वै भयस्य तमसो भवति य एवं वेद ॥ १ ॥**

आतां उद्गीथाचें देवतास्वरूप सांगतात. जो हा ( सूर्य ) प्रकाशतो त्याचीच उद्गीथरूपानें उपासना करावी. हा सूर्य उदय पावून सर्वांच्या-

करितां गायन करतो. तो उदय पावून अंधकार व भीति नष्ट करतो. जो ह्याप्रमाणें जाणतो तो अंधकार व भीति ह्यांचा नाश करणारा होतो.

**समान उ एवायं चासौ चोष्णोऽयमुष्णोऽसौ स्वर इतीममाचक्षते स्वर इति प्रत्यास्वर इत्यमुं तस्माद्वा एतमिममम मुं चोद्गीथमुपासीत ॥ २ ॥**

हा ( प्राण ) व हा ( सूर्य ) सारखेच आहेत. हा प्राण उष्ण आहे आणि हा सूर्य उष्ण आहे. स्वर ह्मणजे गतिमान असें ह्या प्राणाला ह्मणतात. तसे स्वर ( गतिमान ) प्रत्यास्वर ( परत येणारा ) असें ह्या सूर्यालाहि ह्मणतात; ह्मणून ह्या प्राणाची आणि त्या सूर्याची उद्गीथ-रूपानें उपासना करावी.

**अथ खलु व्यानमेवोद्गीथमुपासीत यद्वै प्राणिति स प्राणो यद-पानिति सोऽपानोऽथ यः प्राणापानयोः सन्धिः स व्यानो यो व्यानः सा वाक् तस्मादप्राणन्ननपानन्वाचमभिव्याहरति ॥३॥**

आतां:—व्यानाचीच उद्गीथरूपानें उपासना करावी. (मनुष्य) जें वायूचें आकर्षण करून घेतो (नाकांतून आंत ओढून घेतो) तो प्राण होय; आणि जें निःसारण करतो (बाहेर सोडतो) तो अपान होय, आणि जी प्राण व अपान ह्यांची मधली स्थिति (वायूचा निरोध) तो व्यान होय. जो व्यान तीच वाणी होय. (कारण बोलण्याचे वेळीं श्वासोच्छ्वासाचा निरोधच असतो) म्हणून वायू आंत घेत नसतां किंवा बाहेर सोडीत नसतां वाणीचा उच्चार होत असतो.

**या वाक्सर्क्तस्माद्प्राणन्ननपानन्नृचमभिव्याहरति यर्क्तत्साम तस्माद्प्राणन्ननपानन्साम गायति यत्साम स उद्गीथस्तस्माद्-प्राणन्ननपानन्नुद्गायति ॥ ४ ॥**

जी वाणी तीच ऋचा (मंत्र); म्हणून प्राण व अपान ह्यांच्या क्रिया चालत नसतांना मंत्राचा उच्चार करण्यांत येतो. जी ही ऋचा तेच साम; म्हणून प्राणापान क्रिया बंद असतांनाच साम गाइलें जातें. जें साम तेंच उद्गीथ; म्हणून प्राणापान क्रिया बंद असतां उद्गीथाचें गायन करितां येतें.

टीप:—गवई प्रभातकाळीं मंद्र सप्तकांत जें स्वरसाधन करितात त्याच्या योगानें व्यानसामर्थ्य वृद्धिंगत होतें. एकाग्र चित्तानें परमेश्वराचें ध्यान करीत ॐकाराचें स्वरसाधन करणें हीच ती उपासना होय.

**अतो यान्यन्यानि वीर्यवन्ति कर्माणि यथाग्नेर्मन्थनमाजेः सरणं दृढस्य धनुष आयमनमप्राणन्ननपानंस्तानि करोत्येतस्य हेतो-र्व्यानमेवोद्गीथमुपासीत ॥ ५ ॥**

म्हणून जीं निरनिराळीं सामर्थ्याचीं कामें असतात; उदाहरणार्थ अग्नीचें मंथन (लांकडावर लांकूड घांसून अग्नि उत्पन्न करणें), सीमेपर्यंत धांवणें, बळकट धनुष्य वांकविणें, हीं (कामें) प्राणापानाची क्रिया बंद ठेवूनच करितात. ह्या व्यानाची उद्गीथरूपानें उपासना करावी.

## चतुर्थ खण्ड

**ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीतोमिति ह्युद्गायति तस्योपव्याख्यानम् ॥ १ ॥**

ॐ ह्या अक्षररूप उद्गीथाची उपासना करावी. ॐ असें म्हणूनच उद्गाता गायन करितो. त्याचें व्याख्यान.

**देवा वै मृत्योर्बिभ्यतस्त्रयीं विद्यां प्राविशंस्ते छन्दोभिरच्छादयन्यदेभिरच्छादयंस्तच्छन्दसां छन्दस्त्वम् ॥ २ ॥**

मृत्युपासून भय पावणारे देव (ऋग्यजु:साम) वेदविद्येंत प्रविष्ट झाले. (विस्मृतीमुळें नष्ट होऊं लागलेल्या देवतांचा समावेश मंत्रांत करण्यांत आला.) ते (देव) स्वत:ला छंदांनीं आच्छादित करते झाले, हेंच छंदांचें छंदत्व होय. (आच्छादित करणारे म्हणून त्यांना 'छंद' म्हणावयाचें.)

**तानु तत्र मृत्युर्यथा मत्स्यमुदके परिपश्येदेवं पर्यपश्यदृचि साम्नि यजुषि । ते नु वित्त्वोर्ध्वा ऋच: साम्नो यजुष: स्वरमेव प्राविशन् ॥ ३ ॥**

जसा पाण्यांत मासा दिसावा तसे ते (देव) मृत्यूला ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद ह्यांत दिसूं लागले. त्यांनीं (देवांनीं) तें ओळखून, वर चढत ऋग्वेद, सामवेद व यजुर्वेद यांचा स्वर म्हणजे मूळ वर्ण जो ॐकार त्यांत प्रवेश केला.

**यदा वा ऋचमाप्नोत्योमित्येवातिस्वरत्येवं सामैवं यजुरेष उ स्वरो यदेतदक्षरमेतदमृतमभयं तत्प्रविश्य देवा अमृता अभया अभवन् ॥ ४ ॥**

ज्यावेळीं (कोणी) ऋग्वेद म्हणूं लागतो त्यावेळीं ॐ हाच प्रथम उच्चार करितो. त्याचप्रमाणें सामवेद व यजुर्वेद. जो हा ॐकार स्वर

आहे तेंच अक्षर, तेंच अमृत व अभय (तत्त्व) होय. त्यांत प्रवेश केल्यानें देव अमृत व अभय झाले.

**स य एतदेवं विद्वानक्षरं प्रणौत्येतदेवाक्षरं स्वरममृतमभयं प्रविशति तत्प्रविश्य यदमृता देवास्तदमृतो भवति ॥ ५ ॥**

जो ह्याप्रमाणें जाणणारा ( ह्या ) अक्षराचें स्तवन ( उपासना ) करितो, तो स्वररूप असून, अभय अशा अक्षरांत ( ॐ कारांत ) प्रवेश करितो. त्यांत प्रवेश केल्यावर जसे देव अमृत झाले तसा तोहि अमृत होतो.

## पंचम खण्ड

**अथ खलु य उद्गीथः स प्रणवो यः प्रणवः स उद्गीथ इत्यसौ वा आदित्य उद्गीथ एष प्रणव ओमिति ह्येष स्वरन्नेति ॥ १ ॥**

आतां जो उद्गीथ तोच प्रणव आणि जो प्रणव तोच उद्गीथ होय. ( ऋग्वेदांत ज्याला प्रणव म्हणतात त्यालाच छांदोग्यांत उद्गीथ म्हणतात.) हा सूर्य उद्गीथ आहे व तोच प्रणव आहे. हा ( सूर्य ) ॐ असा नाद करीत प्राप्त होतो.

**एतमु एवाहमभ्यगासिषं तस्मान्मम त्वमेकोऽसीति ह कौषीतकिः पुत्रमुवाच रश्मींस्त्वं पर्यावर्तयाद्बहवो वै ते भविष्यन्तीत्यधिदैवतम् ॥ २ ॥**

मी ह्या आदित्याचेंच स्तवन केलें, म्हणून तूं माझा एक पुत्र झाला आहेस. तूं किरणांचें वारंवार स्तवन कर, तुला पुष्कळ पुत्र होतील; असें कोषीतकि ऋषी पुत्राला म्हणाला. हा आधिदैवत विचार होय.

**अथाध्यात्मं य एवायं मुख्यः प्राणस्तमुद्गीथमुपासीतोमिति ह्येष स्वरन्नेति ॥ ३ ॥**

आतां आध्यात्म विचार सांगतात. जो हा मुख्य प्राण ( आहे ) त्याची उद्गीथ रूपानें उपासना करावी. कारण हा ( प्राण ) ॐ असा नाद करीत येतो. ( प्राणवायु आंत घेतांना ॐ असा नाद होतो.)

**एतमु एवाहमभ्यगासिषं तस्मान्मम त्वमेकोऽसीति ह कौषीतकिः पुत्रमुवाच प्राणांस्त्वं भूमानमभिगायताद्बहवो वै मे भविष्यन्तीति ॥ ४ ॥**

मीं ह्याचें ( मुख्य प्राणाचें ) स्तवन केलें म्हणून तूं माझा एक पुत्र झाला आहेस. तुला पुष्कळ व्हावेत अशा हेतूनें तूं प्राणांचें व्यापक स्वरूप जाणून स्तवन कर असें कोषीतकि ऋषी पुत्राला म्हणाला.

**अथ खलु य उद्गीथः स प्रणवो यः प्रणवः स उद्गीथ इति होतृषदनाद्धैवापि दुरुद्गीथमनुसमाहरतीत्यनुसमाहरतीति ॥ ५ ॥**

आतां जो उद्गीथ तोच प्रणव ( आणि ) जो प्रणव तोच उद्गीथ असल्यामुळें, होता आपल्या स्थानावरूनच ( उद्गात्याचें ) खंडित गायन ( ॐकारानेंच ) पुढें जोडतो; म्हणजे अखंडित करतो.

## अष्टमोध्याय, सप्तम खण्ड

**य आत्मापहतपाप्मा विजरो विमृत्युर्विशोको विजिघत्सोऽपिपासः सत्यकामः सत्यसंकल्पः सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः स**

सर्वांश्च लोकानाप्नोति सर्वांश्च कामान्यस्तमात्मानमनुविद्य विजानातीति ह प्रजापतिरुवाच ॥ १ ॥

जो आत्मा आहे तो निष्पाप, जरारहित, नाशरहित, शोकरहित, क्षुधारहित, तृषारहित असून सत्यकाम आणि सत्यसंकल्प असा आहे. त्याचें संशोधन करावें. त्याविषयीं जिज्ञासा ठेवावी. जो आत्म्याला अनुक्रमानें प्राप्त होऊन विशेष रीतीनें जाणतो तो सर्व लोकांना आणि सर्व मनोरथांना प्राप्त होतो, असें प्रजापति ( ब्रह्मदेव ) म्हणाला.

तद्धोभये देवासुरा अनुबुबुधिरे ते होचुर्हन्त तमात्मानमन्विच्छामो यमात्मानमन्विष्य सर्वांश्च लोकानाप्नोति सर्वांश्च कामानितीन्द्रो हैव देवानामभिप्रवव्राज विरोचनोऽसुराणां तौ हासंविदानावेव समित्पाणी प्रजापतिसकाशमाजग्मतुः ॥ २ ॥

हें देव व असुर हे दोघेहि जाणते झाले. ते म्हणाले कीं, ज्या आत्म्याचें संशोधन केल्यानें सर्व लोक व सर्व मनोरथ प्राप्त होतात, त्या आत्म्याचा आपण शोध करूं या. देवांपैकीं इंद्र व असुरांपैकीं विरोचन निघाले. ते एकमेकांच्या न कळत समिधा हातांत घेऊन प्रजापतीकडे गेले.

तौ ह द्वात्रिंशतं वर्षाणि ब्रह्मचर्यमूषतुस्तौ ह प्रजापतिरुवाच किमिच्छन्ताववास्तमिति तौ होचतुर्य आत्मापहतपाप्मा विजरो विमृत्युर्विशोको विजिघत्सोऽपिपासः सत्यकामः सत्यसंकल्पः सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः स सर्वांश्च लोकानाप्नोति

**सर्वांश्च कामान्यस्तमात्मानमनुविद्य विजानातीति भगवतो वचो वेदयन्ते तमिच्छन्ताववास्तमिति ॥ ३ ॥**

ते दोघे ३२ वर्षें तेथें ब्रह्मचर्यानें राहिले. त्यांना प्रजापति म्हणाला कीं कोणती इच्छा करून तुम्हीं राहिलां आहां ? ते म्हणाले कीं, जो आत्मा आहे तो निष्पाप, जरारहित, नाशरहित, शोकरहित, क्षुधा-रहित व तृषारहित असून सत्यसंकल्प, सत्यकाम असा आहे. त्याचें संशोधन करावें; त्याविषयीं जिज्ञासा करावी, जो त्या आत्म्याला क्रमानें प्राप्त होऊन विशेष रीतीनें जाणतो तो सर्व लोकांना व सर्व मनोरथांना प्राप्त होतो; असें आपलें वचन सर्वांना विदित आहे. या आत्मज्ञानाचे इच्छेनें आम्हीं येथें आलों आहों.

**तौ ह प्रजापतिरुवाच य एषोऽक्षिणि पुरुषो दृश्यत एष आत्मेति होवाचैतदमृतमभयमेतद्ब्रह्मेत्यथ योऽयं भगवोऽप्सु परिख्यायते यश्चायमादर्शे कतम एष इत्येष उ एवैषु सर्वेष्वन्तेषु परिख्यायत इति होवाच ॥ ४ ॥**

प्रजापति त्या दोघांना म्हणाला—जो हा पुरुष डोळ्यांमध्यें दिसतो तोच आत्मा, तेंच अभय, तेंच ब्रह्म होय. हे भगवन्, जो पाण्यामध्यें किंवा जो आरशामध्यें दिसतो त्यापैकीं कोणता आत्मा ? ह्या पदार्थांमध्यें किंवा कोणत्याहि पदार्थांमध्यें हा आत्माच दिसतो, असें प्रजापति म्हणतात.

### अष्टम खण्ड

**उदशराव आत्मानमवेक्ष्य यदात्मनो न विजानीथस्तन्मे प्रब्रू-**

**मिति तौ होदशरावेऽवेक्षांचक्राते तौ ह प्रजापतिरुवाच किं पश्यथेति तौ होचतुः सर्वमेवेदमावां भगव आत्मानं पश्याव आलोमभ्य आनखेभ्यः प्रतिरूपमिति ॥ १ ॥**

प्रजापति म्हणाला, उदकाच्या पात्रामध्यें स्वतःला पाहून जर तुम्हीं स्वतःला जाणलें नाहीं तर मला सांगा. ते उदकाच्या पात्रामध्यें स्वतःचें प्रतिबिंब पहाते झाले. तुम्हाला काय दिसतें? असें प्रजापति त्या दोघांना म्हणाला. आम्हीं केसांसुद्धां आणि नखांसुद्धां सर्व ह्या प्रतिबिंबांत स्वतःला पहात आहों असें ते दोघे म्हणाले.

**तौ ह प्रजापतिरुवाच साध्वलंकृतौ सुवसनौ परिष्कृतौ भूत्वोदशरावेऽवेक्षेथामिति तौ ह साध्वलंकृतौ सुवसनौ परिष्कृतौ भूत्वोदशरावेऽवेक्षांचक्राते तौ ह प्रजापतिरुवाच किं पश्यथ इति ॥ २ ॥**

प्रजापति त्या दोघांना म्हणाला, चांगले संस्कारयुक्त (स्वच्छ) होऊन चांगले अलंकार घालून, चांगलीं वस्त्रें परिधान करून उदकपात्रांत पहा. ते दोघे चांगले संस्कारयुक्त होऊन, चांगले अलंकार घालून, चांगलीं वस्त्रें परिधान करून पाण्याच्या पात्रांत पाहते झाले. काय दिसतें? असें त्यांस प्रजापति म्हणाला.

**तौ होचतुर्यथैवेदमावां भगवः साध्वलंकृतौ सुवसनौ परिष्कृतौ स्व एवमेवेमौ भगवः साध्वलंकृतौ सुवसनौ परिष्कृतावित्येष आत्मेति होवाचैतदमृतमभयमेतद्ब्रह्मेति तौ ह शान्तहृदयौ प्रवव्रजतुः ॥ ३ ॥**

ते म्हणाले कीं भगवन्, ज्याप्रमाणें आम्हीं संस्कारयुक्त अलंकृत वस्त्रें परिधान केलेले आहों तसेंच दिसतो. हाच आत्मा, हेंच अमृत, हेंच अभय व हेंच ब्रह्म होय, असें प्रजापति त्यांना म्हणाला. ते शांत चित्त होऊन निघून गेले.

**तौ हान्वीक्ष्य प्रजापतिरुवाचानुपलभ्यात्मानमननुविद्य व्रजतो यतर एतदुपनिषदो भविष्यन्ति देवा वासुरा वा ते पराभविष्यन्तीति स ह शान्तहृदय एव विरोचनोऽसुराञ्जगाम तेभ्यो हैतामुपनिषदं प्रोवाचात्मैवेह महय्य आत्मा परिचर्य आत्मानमेवेह महयन्नात्मानं परिचरन्नुभौ लोकाववाप्नोतीमं चामुं चेति ॥ ४ ॥**

प्रजापति त्या दोघांकडे पाहून (आत्मगत) म्हणाला, आत्मप्राप्ति झाल्यावांचून (आत्मज्ञान संपादन केल्यावांचून) हे इंद्र व विरोचन जात आहेत. जे कोणी देव किंवा असुर त्यांच्या तत्त्वज्ञानाचे अनुयायी होतील ते पराभूत होतील. तो विरोचन शांतचित्तानें असुर समाजांत गेला आणि त्यांना त्यानें आपलें तत्त्वज्ञान सांगितलें. इहलोकीं देहरूपी आत्माच श्रेष्ठत्वास योग्य आहे. आत्म्याची (देहाचीच) सेवा केली पाहिजे. जो देहाचें श्रेष्ठत्व मानितो व ह्या देहाची उपासना करितो त्याला इह व पर दोन्ही लोक प्राप्त होतात.

**तस्मादप्यद्येहाददानमश्रद्दधानमयजमानमाहुरासुरो बतेत्यसुराणां ह्येषोपनिषत्प्रेतस्य शरीरं भिक्षया वसनेनालंकारेणेति संस्कुर्वन्त्येतेन ह्यमुं लोकं जेष्यन्तो मन्यन्ते ॥ ५ ॥**

म्हणून आज सुद्धां व्यवहारांत दान किंवा परोपकार न करणाऱ्या श्रद्धाहीन अशा मनुष्याला अयजमान म्हणजे अनुपासक (अधार्मिक किंवा अभक्त) व असुर असें म्हणतात. (देहात्मवादी) तत्त्वविद्या असुरांची होय. ते प्रेताचें शरीर भिक्षा, वस्त्र, व अलंकार यांनीं संस्कारयुक्त करितात. या संस्कारानें तीं मृत मनुष्यें परलोकाला जिंकतात असें असुर मानितात.

## नवम खण्ड

**अथ हेन्द्रोऽप्राप्यैव देवानेतद्भयं ददर्श यथैव खल्वयमस्मिञ्छरीरे साध्वलंकृते साध्वलंकृतो भवति सुवसने सुवसनः परिष्कृते परिष्कृत एवमेवायमस्मिन्नन्धेऽन्धो भवति स्रामे स्रामः परिवृक्णे परिवृक्णोऽस्यैव शरीरस्य नाशमन्वेष नश्यति नाहमत्र भोग्यं पश्यामीति ॥ १ ॥**

इकडे इंद्र देवाकडे पोंचण्याचे अगोदरच आपल्या तत्त्वज्ञानाबद्दल भय म्हणजे भीतिजनक शंका पहाता झाला. ती अशी कीं, ज्याप्रमाणें हें शरीर चांगलें अलंकृत केलें असतां हा देहरूपी आत्मा चांगला अलंकृत होतो, चांगलें वस्त्र परिधान केलें असतां सुवसन दिसतो, सुसंस्कृत केला असतां सुसंस्कृत दिसतो, त्याप्रमाणेंच हा देह अंध असेल तर आत्मा अंध असा वाटतो, (स्वेदादि) मल स्रवूं लागले असतां तो मल स्रवणारा दिसतो, व्यंग असेल तर व्यंग वाटतो, आणि ह्या शरिराचे नाशाबरोबरच या देहरूपी आत्म्याचाहि नाश होणार. ह्यांत ग्राह्य असें कांहींच दिसत नाहीं.

**स समित्पाणिः पुनरेयाय तं ह प्रजापतिरुवाच मघवन्यच्छान्तहृदयः प्राव्राजीः सार्धं विरोचनेन किमिच्छन् पुनरागम इति स होवाच यथैव खल्वयं भगवोऽस्मिञ्छरीरे साध्वलंकृते साध्वलंकृतो भवति सुवसने सुवसनः परिष्कृते परिष्कृत एवमेवायमस्मिन्नन्धेऽन्धो भवति स्रामे स्रामः परिवृक्णे परिवृक्णोऽस्यैव शरीरस्य नाशमन्वेष नश्यति नाहमत्र भोग्यं पश्यामीति ॥ २ ॥**

तो समिधा घेऊन पुन्हां प्रजापतीकडे आला. त्याला प्रजापति म्हणाला, इंद्रा, तूं शांतचित्त होऊन विरोचनासह गेला होतास, तो पुन्हां कोणत्या इच्छेनें परत आलास ? तो इंद्र म्हणाला, ज्याप्रमाणें हें शरीर चांगलें अलंकृत केलें असतां हा देहरूपी आत्मा चांगला अलंकृत होतो, चांगलें वस्त्र परिधान केलें असतां सुवसन दिसतो, सुसंस्कृत केला असतां सुसंस्कृत दिसतो, त्याप्रमाणेंच हा देह अंध असेल तर आत्मा अंध असा वाटतो, ( स्वेदादि ) मल स्रवूं लागले असतां, मल स्रवणारा तो दिसतो, व्यंग असेल तर व्यंग वाटतो आणि ह्या शरिराचे नाशाबरोबरच या देहरूपी आत्म्याचाहि नाश होणार. यांत ग्राह्य असें कांहींच दिसत नाहीं.

**एवमेवैष मघवन्निति होवाचैतं त्वेव ते भूयोऽनुव्याख्यास्यामि वसापराणि द्वात्रिंशतं वर्षाणीति स हापराणि द्वात्रिंशतं वर्षाण्युवास तस्मै होवाच ॥ ३ ॥**

तो प्रजापति म्हणाला, इंद्रा, हा देहरूप आत्मा असाच आहे. याच आत्म्याचें मी पुन्हां व्याख्यान करितों, आणखी बत्तीस वर्षें रहा. तो इंद्र आणखी बत्तीस वर्षें राहिला. नंतर प्रजापति त्याला म्हणाला.

## दशम खण्ड

**य एष स्वप्ने महीयमानश्चरत्येष आत्मेति होवाचैतदमृतमभयमेतद्ब्रह्मेति स ह शान्तहृदयः प्रवव्राज स हाप्राप्यैव देवानेतद्भयं ददर्श तद्यद्यपीदं शरीरमन्धं भवत्यनन्धः स भवति यदि स्राममस्रामो नैवैषोऽस्य दोषेण दुष्यति ॥ १ ॥**

जो हा स्वप्नामध्यें सामर्थ्यवान होत्साता संचार करितो तो आत्मा होय आणि तेंच अविनाशी भयरहित ब्रह्म होय, असें प्रजापति म्हणाला. तो इंद्र शांतचित्तानें तेथून निघाला. पण देवांकडे जाण्यापूर्वींच त्याला भीतिजनक शंका उत्पन्न झाली. हें शरीर अंध असलें तरी तो स्वप्नस्थ आत्मा अंध नसतो. शरीर स्रावयुक्त असलें तरी तो आत्मा स्रवत नाहीं. शरीराचे दोषानें हा आत्मा दूषित होत नाहीं.

**न वधेनास्य हन्यते नास्य स्राम्येण स्रामो घ्नन्ति त्वेवैनं विच्छादयन्तीवाप्रियवेत्तेव भवत्यपि रोदितीव नाहमत्र भोग्यं पश्यामीति ॥ २ ॥**

ह्या देहाच्या वधानें स्वप्नस्थ आत्म्याचा वध होत नाहीं. त्याच्या स्रावादि दोषानें तो स्रावयुक्त होत नाहीं. परंतु स्वप्नजन्य भ्रम ह्याला जणु काय मारतात; जणुं काय आच्छादित करितात; तो दुःखी होतो किंबहुना रूदन करितो. म्हणून स्वप्नदेहामध्येंहि मला प्राह्यांश ( भोग्य ) दिसत नाहीं.

**स समित्पाणिः पुनरेयाय तं ह प्रजापतिरुवाच मघवन्यच्छान्तहृदयः प्राव्राजीः किमिच्छन् पुनरागम इति स होवाच तद्यद्यपीदं**

**भगवः शरीरमन्धं भवत्यनन्धः स भवति यदि स्राममस्रामो नैवैषोऽस्य दोषेण दुष्यति ॥ ३ ॥**

इंद्र समिधा हातांत घेऊन पुन्हां परत आला. तेव्हां प्रजापति त्याला म्हणाला, इंद्रा तूं शांतमनानें गेला होतास तो पुनः कां आलास ? इंद्र म्हणाला कीं, भगवान, जरी हें स्थूल शरीर अंध असलें, तरी स्वप्नांतील आत्मा अंध नसतो; जरी तें शरीर स्रावयुक्त असलें, तरी तो स्रावयुक्त होत नाहीं; म्हणजे ह्या स्थूल शरीराचे दोषानें हा स्वप्नांतील आत्मा दोषयुक्त होत नाहीं.

**न वधेनास्य हन्यते नास्य स्रामेण स्रामो घ्नन्ति त्वेवैनं विच्छादयन्तीवाप्रियवेत्तेव भवत्यपि रोदितीव नाहमत्र भोग्यं पश्यामीत्येवमेवैष मघवन्निति होवाचैतं त्वेव ते भूयोऽनुव्याख्यास्यामि वसापराणि द्वात्रिंशतं वर्षाणीति स हाऽपराणि द्वात्रिंशतं वर्षाण्युवास तस्मै होवाच ॥ ४ ॥**

ह्या स्थूल देहाच्या वधानें हा आत्मा वधिला जात नाहीं, त्याच्या स्रावादि दोषानें तो स्रावयुक्त होत नाहीं, परंतु स्वप्नजन्य भ्रम याला जणूं काय मारतात, जणूं काय आच्छादन करितात. तो दुःखी होतो किंबहुना रूदन करितो. म्हणून स्वाप्नदेहामध्यें मला भोग्य ( ग्राह्यांश ) दिसत नाहीं, असें इंद्र म्हणाला. प्रजापति म्हणाला, हे इंद्रा, हा स्वप्नांतील आत्मा तूं म्हणतोस असाच आहे. ह्या आत्मतत्त्वाचें मी पुनः स्पष्टीकरण करितों. आणखी ३२ वर्षें रहा. नंतर तो इंद्र पुनः बत्तीस वर्षें राहिला.

## एकादश खण्ड

**तद्यत्रैतत् सुप्तः समस्तः संप्रसन्नः स्वप्नं न विजानात्येष आत्मेति होवाचैतदमृतमभयमेतद्ब्रह्मेति स ह शान्तहृदयः प्रवव्राज स हाप्राप्यैव देवानेतद्भयं ददर्श नाह खल्वयमेवं संप्रत्यात्मानं जानात्ययमहमस्मीति नो एवेमानि भूतानि विनाशमेवापीतो भवति नाहमत्र भोग्यं पश्यामीति ॥ १ ॥**

तें असें आहे; जेव्हां प्राणी सुषुप्ति अवस्थेंत जातो तेव्हां प्रसन्न असा होऊन रहातो; तो स्वप्न जाणत नाहीं; तोच आत्मा, तेंच अभय आणि अमृतस्वरूप होय, असें प्रजापति म्हणाला. तो इंद्र शांतचित्त होऊन निघाला. तो देवांकडे जाण्याच्या अगोदरच त्याला ही भीतिजनक शंका उत्पन्न झाली कीं, या सुषुप्तिकालीं हा मी आहें, अशा प्रकारें हा स्वतःला जाणत नाहीं. ह्याचप्रमाणें हीं भूतें तो जाणत नाहीं. तो नाशालाच प्राप्त झालेला असतो. म्हणून या आत्मज्ञानामध्यें मला भोग्य ( ग्राह्य ) असें कांहींच वाटत नाहीं.

**स समित्पाणिः पुनरेयाय तं ह प्रजापतिरुवाच मघवन्यच्छान्तहृदयः प्राव्राजीः किमिच्छन्पुनरागम इति स होवाच नाह खल्वयं भगव एवं संप्रत्यात्मानं जानात्ययमहमस्मीति नो एवेमानि भूतानि विनाशमेवापीतो भवति नाहमत्र भोग्यं पश्यामीति ॥ २ ॥**

समित्पाणी होऊन तो इंद्र प्रजापतीकडे परत आला. हे इंद्रा, तूं शांतमनानें गेला होतास तो कोणत्या इच्छेनें पुन्हां परत आलास, असें

प्रजापति त्याला म्हणाला. तो इंद्र म्हणाला कीं, भगवन्, हा आत्मा या सुषुप्तावस्थेंत स्वतःला मी असें जाणत नाहीं. ह्याप्रमाणेंच या भूतांना देखील जाणत नाहीं. तो नाशालाच पावतो. मला यांत भोग्य ( ग्राह्यांश ) दिसत नाहीं.

**एवमेवैष मघवन्निति होवाचैतं त्वेव ते भूयोऽनुव्याख्यास्यामि नो एवान्यत्रैतस्माद्वसाऽपराणि पञ्च वर्षाणीति स हापराणि पञ्च वर्षाण्युवास तान्येकशतं संपेदुरेतत्तद्यदाहुरेकशतं ह वै वर्षाणि मघवान्प्रजापतौ ब्रह्मचर्यमुवास तस्मै होवाच ॥ ३ ॥**

प्रजापति म्हणाला, इंद्रा, हा आत्मा तसाच आहे. ह्या आत्म्याचेंच तुला पुन्हां व्याख्यान करून सांगतों. या स्वरूपाहून दुसरीकडे आत्मतत्त्व शोधतां यावयाचें नाहीं. आणखी पांच वर्षें रहा. तो आणखीं पांच वर्षें राहिला. तीं एकंदर १०१ वर्षें झालीं; म्हणून ह्याविषयीं असें म्हणतात कीं, इंद्र प्रजापतीकडे एकशें एक वर्षें ब्रह्मचर्यानें राहिला होता. त्याला प्रजापति म्हणाला.

## द्वादश खण्ड

**मघवन्मर्त्यं वा इदं शरीरमात्तं मृत्युना तदस्यामृतस्याशरीरस्यात्मनोऽधिष्ठानमात्तो वै सशरीरः प्रियाप्रियाभ्यां न वै सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोरपहतिरस्त्यशरीरं वाव सन्तं न प्रियाप्रिये स्पृशतः ॥ १ ॥**

हे इंद्रा, हें मर्त्य शरीर मृत्युनें ग्रासलेलें आहे. परंतु हें मर्त्य शरीर अविनाशी व अशरीरी आत्म्याचें अधिष्ठान आहे. तो आत्मा शरीरयुक्त

असेपर्यंत प्रिय व अप्रिय यांनीं युक्त असतो. शरीरयुक्त अशा त्याचें प्रिय व अप्रिय यांचा विनाश असतच नाहीं, ( परंतु ) ज्याचा शरीराशीं संबंध असत नाहीं त्याला प्रिय व अप्रिय यांचा स्पर्श होत नाहीं.

**अशरीरो वायुरभ्रं विद्युत्स्तनयित्नुरशरीराण्येतानि तद्यथैतान्यमुष्मादाकाशात्समुत्थाय परं ज्योतिरुपसंपद्य स्वेन रूपेणाभिनिष्पद्यन्ते ॥ २ ॥**

ह्याविषयीं दृष्टांत—वायु शरीररहित आहे. ढग, विद्युत व गर्जनायुक्त मेघ हेहि शरीररहित आहेत. ज्याप्रमाणें हे ( सूर्याच्या ) परम तेजाशीं संयुक्त होऊन या आकाशापासून उत्पन्न होऊन आपआपल्या रूपानें प्रकट होतात,

**एवमेवैष संप्रसादोऽस्माच्छरीरात्समुत्थाय परं ज्योतिरुपसंपद्य स्वेन रूपेणाभिनिष्पद्यते स उत्तमः पुरुषः स तत्र पर्येति जक्षन्क्रीडन्रममाणः स्त्रीभिर्वा यानैर्वा ज्ञातिभिर्वा नोपजनं स्मरन्निदं शरीरं स यथा प्रयोग्य आचरणे युक्त एवमेवायमस्मिञ्छरीरे प्राणो युक्तः ॥ ३ ॥**

त्याप्रमाणें हा संप्रसादस्थितींत सुषुप्तावस्थेंत असलेला आत्मा या शरीरांतून उठून परमतेजः स्वरूपाला प्राप्त होऊन आपल्या मूळस्वरूपांत लीन होतो. तो उत्तम पुरुष होय. तो ह्या उत्पन्न झालेल्या ( स्थूल ) शरीराचें भान नसतांना, स्त्रिया वाहनें आप्तेष्ट ह्यांच्यासह क्रीडा करणारा किंवा भक्षणादि व्यवहार करणारा संचार करितो. ज्याप्रमाणें कोणत्याहि कार्यामध्यें प्रयोज्य म्हणजे हाताखालील सहकारी नेमलेला म्हणून

कार्य करीत असतो, त्याप्रमाणेंच हा प्राण या शरीरामध्यें आत्म्यानें नेमलेला म्हणून कार्यकारी असतो.

**अथ यत्रैतदाकाशमनुविषण्णं चक्षुः स चाक्षुषः पुरुषो दर्शनाय चक्षुरथ यो वेदेदं जिघ्राणीति स आत्मा गन्धाय घ्राणमथ यो वेदेदमभिव्याहराणीति स आत्माभिव्याहाराय वागथ यो वेदेदं शृणवानीति स आत्मा श्रवणाय श्रोत्रम् ॥ ४ ॥**

आतां जें हें चक्षुरिंद्रिय आहे तें आकाशांत समाविष्ट आहे. या चक्षुरिंद्रियाच्या ठिकाणीं असणारा अंशरूप आत्मा हा चाक्षुष पुरुष होय; आणि अवलोकन क्रियेच्या उपयोगी पडणारें तें चक्षुरिंद्रिय होय. आतां जो मी वास घेत आहे असें समजतो तो आत्मा होय; आणि गंधग्रहण करण्याच्या क्रियेला उपयोगी पडणारें तें घ्राणेंद्रिय होय. आतां मी हें बोलतो, असें जो जाणतो तो आत्मा; व बोलण्याच्या क्रियेला उपयोगी पडणारें तें वागिंद्रिय होय. जो मी ऐकतों आहे असें समजतो तो आत्मा; आणि श्रवणाला उपयोगी पडणारें जें इंद्रिय तें कर्णेंद्रिय होय.

**अथ यो वेदेदं मन्वानीति स आत्मा मनोऽस्य दैवं चक्षुः स वा एष एतेन दैवेन चक्षुषा मनसैतान् कामान् पश्यन् रमते य एते ब्रह्मलोके ॥ ५ ॥**

आतां जो हें मी समजतों असें जाणतो तो आत्मा होय. अन्तः-करण ही त्याची दैवी दृष्टि होय. तो आत्मा या दैवी दृष्टीनें जे हे (विषय) ब्रह्मलोकांत आहेत त्या विषयांना पहात रममाण होतो.

**तं वा एतं देवा आत्मानमुपासते तस्मात्तेषां सर्वे च लोका आत्ताः सर्वे च कामाः स सर्वांश्च लोकानाप्नोति सर्वांश्च कामान्यस्तमात्मानमनुविद्य विजानातीति ह प्रजापतिरुवाच प्रजापतिरुवाच ॥ ६ ॥**

देव त्या आत्म्याचीच उपासना करितात. त्या उपासनेच्या योगानें त्यांना सर्व लोक व सर्व मनोरथ प्राप्त झालेले असतात. जो त्या आत्म्याला समजून घेऊन विशेष प्रकारें जाणतो म्हणजे त्याचा साक्षात्कार संपादन करितो तो सर्व लोक व सर्व मनोरथ पावतो. म्हणजे त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतात, असें प्रजापति म्हणाला.

## छांदोग्य अध्याय २, खण्ड २३

**प्रजापतिर्लोकानभ्यतपत्तेभ्योऽभितप्तेभ्यस्त्रयी विद्या संप्रास्रवत्तामभ्यतपत्तस्या अभितप्ताया एतान्यक्षराणि संप्रास्रवन्त भूर्भुवः स्वरिति ॥ २ ॥**

प्रजापतीनें लोकांविषयीं विचार केला. तो विचार केल्यावरून तीन वेदांची विद्या निघाली (सारभूत वाटली) त्या वेदविद्येचा विचार केल्यावरून भूः भुवः स्वः अशीं हीं तीन अक्षरें (व्याहृति) निघालीं.

**तान्यभ्यतपत्तेभ्योऽभितप्तेभ्य ॐकारः संप्रास्रवत्तद्यथा शंकुना सर्वाणि पर्णानि संतृण्णान्येवमोंकारेण सर्वा वाक् संतृण्णोंकार एवेदं सर्वमोंकार एवेदं सर्वम् ॥ ३ ॥**

(त्यानें) त्या व्याहृति अक्षरांचा विचार केला. त्यांचा विचार

केल्यावरून ॐ हें अक्षर निघालें (सारभूत ठरलें). ज्याप्रमाणें बारीक काडीनें सर्व पानें ओवलेलीं असतात त्याप्रमाणें ॐकारानें सर्व वाणी ओवलेली आहे (सर्व वाणीला ॐकार ह्याच आधार आहे). हें सर्व ॐकार रूपच आहे. (द्विरुक्ति समाप्तिदर्शक आहे.)

---

# प्रश्नोपनिषद्

## पांचवा प्रश्न

(ह्या प्रश्नांत ॐकाराचें वर्णन आहे.)

**अथ हैनं शैब्यः सत्यकामः पप्रच्छ । स यो ह वै तद्भगवन्मनुष्येषु प्रायणान्तमोङ्कारमभिध्यायीत । कतमं वाव स तेन लोकं जयतीति ॥ १ ॥**

नन्तर त्याला (पिप्पलाद ऋषीला) शिबिकुलोत्पन्न सत्यकाम नांवाचा ऋषी विचारता झाला कीं, महाराज, मनुष्यांपैकीं जो कोणी ॐकाराचें यावज्जीव चिंतन करितो तो त्या चिंतनानें कोणता लोक मिळवितो?

**तस्मै स होवाच । एतद्वै सत्यकाम परं चापरं च ब्रह्म यदोंकारः । तस्माद्विद्वानेतेनैवायतनेनैकतरमन्वेति ॥ २ ॥**

त्याला तो (पिप्पलाद) म्हणाला, हे सत्यकाम, जें ॐकारस्वरूप (ॐकाराचा ज्याच्याशीं संबंध आहे) तेंच शुद्ध ब्रह्म आणि तेंच शबल ब्रह्महि असतें. म्हणजे ॐकार हें शुद्ध व शबल ह्या दोन्ही

ब्रह्मस्वरूपाचें प्रतीक (वाचक) आहे. म्हणून विद्यासंपन्न मनुष्य ह्या ॐकाराचे उपासनेनेंच (शुद्ध किंवा शबल—सगुण) कोणत्या तरी एका गतीला जातो.

**स यद्येकमात्रमभिध्यायीत स तेनैव संवेदितस्तूर्णमेव जगत्यामभिसंपद्यते । तमृचो मनुष्यलोकमुपनयन्ते । स तत्र तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संपन्नो महिमानमनुभवति ॥ ३ ॥**

तो (मनुष्य) जर ॐकाराचें एक मात्रा म्हणजे अंशरूपानें (केवळ आधिभौतिक स्वरूपाचें) ध्यान करील तर तो त्याच आधिभौतिक ज्ञानानें लवकर पृथ्वीशीं संयुक्त होतो. ऋग्वेद त्याला मनुष्य लोकाला पोंचवितात. तेथें तो तपाचरण, विद्याभ्यास व अस्तिक्य बुद्धि ह्या गुणांनीं संपन्न होऊन महत्त्व पावतो.

**अथ यदि द्विमात्रेण मनसि संपद्यते सोऽन्तरिक्षं यजुर्भिरुन्नीयते सोमलोकं । स सोमलोके विभूतिमनुभूय पुनरावर्तते ॥ ४ ॥**

आणि (मनुष्य) जर दोन मात्रास्वरूप (आधिभौतिक आणि आधिदैविक स्वरूप) ॐकाराचें ध्यान करील तर यजुर्वेद त्याला अन्तरिक्षांत सोमलोकाला नेतो. तो तेथें सोमलोकांत वैभवाचा उपभोग घेतल्यानंतर पुन: (भूलोकीं) परत येतो.

**यः पुनरेतं त्रिमात्रेणोमित्येतेनैवाक्षरेण परं पुरुषमभिध्यायीत स तेजसि सूर्ये संपन्नः । यथा पादोदरस्त्वचा विनिर्मुच्यत एवं ह वै स पाप्मना विनिर्मुक्तः स सामभिरुन्नीयते ब्रह्मलोकं । स**

**एतस्माज्जीवघनात्परात्परं पुरिशयं पुरुषमीक्षते ॥ तदेतौ श्लोकौ भवतः ॥ ५ ॥**

जो कोणी तीन मात्रांनीं युक्त (आधिभौतिक, आधिदैविक आध्यात्मिक स्वरूपानें युक्त) ॐ अशा त्या अक्षर मंत्रानेंच परमात्म्याचें ध्यान करितो तो तेजोमय सूर्यमंडळांत प्राप्त होतो. ज्याप्रमाणें सर्प जुनी त्वचा (कात) टाकून मोकळा होतो त्याप्रमाणें तो (पुरुष) सर्व दोषांपासून मुक्त होतो. त्याला सामवेद ब्रह्मलोकाला नेतो, आणि सर्व जीवांचा श्रेष्ठ आधार अशा शबल ब्रह्माहून श्रेष्ठ (शुद्ध) भूतमात्रांत वास्तव्य करणाऱ्या (सर्वव्यापी) पुरुषाला तो पाहतो; म्हणजे त्याला शुद्ध ब्रह्माचा साक्षात्कार होतो. ह्याविषयीं प्राचीन दोन मंत्र असे आहेत—

**तिस्रो मात्रा मृत्युमत्यः प्रयुक्ता अन्योन्यसक्ता अनविप्रयुक्ताः ॥ क्रियासु बाह्याभ्यन्तरमध्यमासु सम्यक् प्रयुक्तासु न कम्पते ज्ञः ॥ ६ ॥**

ॐकाराच्या तीन मात्रांची स्वतंत्रपणानें उपासना केल्यास त्या विनाशफलदायक होतात. त्याच जर एकमेकाशीं संबद्ध असल्या तर परस्परसंबद्धफलदायक होतात; म्हणजे आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक फळें परस्परपोषक रूपानें देतात. त्या मात्रा म्हणजे ॐकाराच्या तीनही शक्ति बाह्य कर्में, बौद्धिक कर्में व मानसिक कर्में ह्यामध्यें योग्य रीतीनें योजल्या असतां, ज्ञानी पुरुष कशानेंहि विचलित होत नाहीं.

**ऋग्भिरेतं यजुर्भिरन्तरिक्षं सामभिर्यत्तत्कवयो वेदयन्ते ॥ तमो-**

**कारणैवायतनेनान्वेति विद्वान्यत्तच्छान्तमजरममृतमभयं परं चेति ॥ ७ ॥**

विद्यासंपन्न पुरुष ऋग्वेदाच्या साह्यानें या ( मनुष्य ) लोकाला ( पोंचतो ), यजुर्वेदाच्या साह्यानें ( सोम ) लोकास पोंचतो. ज्ञात्यांना जो कळतो त्या ( ब्रह्म ) लोकाला सामवेदाच्या साह्यानें पोंचतो. जें शांत ( आनंदमय ), निर्विकार, अविनाशी, निर्भय व शुद्ध ब्रह्म त्याला संयुक्त ॐकाराच्या उपासनेनेंच ज्ञानी मनुष्य पोंचतो. (असे हे दोन प्राचीन मंत्र आहेत. )

---

# तैत्तिरीयोपनिषद्

( शिक्षावल्ली, अनुवाक आठवा )

**ओमिति ब्रह्म ॥ १ ॥**

ॐ हें ब्रह्म होय.

**ओमितीदं सर्वम् ॥ २ ॥**

( कारण ) हें सर्व ॐकारस्वरूप आहे.

**ओमित्येतदनुकृतिर्ह स्म वा अप्योश्रावयेत्याश्रावयन्ति । ओमिति सामानि गायन्ति । ओंशोमिति शस्त्राणि शंसन्ति । ओमित्यध्वर्युः प्रतिगरं प्रतिगृणाति ॥ ओमिति ब्रह्मा प्रसौति ॥ ओमित्यग्निहोत्रमनुजानाति ॥ ३ ॥**

ॐ (होय) हें अनुकृतीचें ( सांगितल्याप्रमाणें करण्याचें ) दर्शक आहे, हें प्रसिद्ध आहे. मंत्र ऐकवा असें म्हटल्यावर ॐकारपूर्वक ऐकवितात. ॐकारपूर्वक सामगायन करितात. ॐ ( किंवा ) शोम् म्हणून शस्त्रें ( सूक्तें ) वर्णितात. ॐ असें म्हणून अध्वर्यू प्रत्येक मंत्र उच्चारितो. ॐ म्हणून ब्रह्मा प्रेरणा करितो, ॐ म्हणून अग्नींत आहुती देण्यास अनुमोदन देतात.

**ओमिति ब्राह्मणः प्रवक्ष्यन्नाह ब्रह्मोपाप्नवानीति । ब्रह्मैवोपाप्नोति ॥ ४ ॥**

ॐ म्हणणारा ब्राह्मण ब्रह्म प्राप्त करून घेईन असें म्हणतो, आणि त्याला ब्रह्म प्राप्त होतें.

---

# कठोपनिषद्

**सर्वे वेदा यत्पदमामनन्ति तपांसि सर्वाणि च यद्वदन्ति । यदि-च्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेण ब्रवीम्योमित्येतत् ॥**

( प्रथम अध्याय, द्वितीय वल्ली श्लोक १५ )

जें प्राप्तव्य म्हणून सर्व वेद सांगतात आणि जें सर्व प्रकारची मतें प्रतिपादितात, ज्याची इच्छा करणारे ब्रह्मचर्यव्रताचें आचरण करितात, तें पद तुला संक्षेपानें सांगतों, ॐ हेंच तें पद होय. म्हणजे ॐ हेंच त्या ब्रह्माचें नांव किंवा प्रतीक आहे.

# मुंडकोपनिषद्

प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ॥ अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत् ॥

( द्वितीय मुण्डक, द्वितीय खण्ड, श्लोक ४ )

ॐकार हेंच धनुष्य, जीवात्मा हा बाण आणि ब्रह्म हेंच त्याचें लक्ष्य असें म्हणतात. हें लक्ष्य एकाग्र चित्तानें वेधावें आणि बाण जसा लक्ष्यांत प्रविष्ट होतो त्याप्रमाणें त्या ब्रह्मरूपी लक्ष्यांत लीन व्हावें.

# इतर उपनिषदें

## श्वेताश्वतरोपनिषद्

स्वदेहमरणिं कृत्वा प्रणवं चोत्तरारणिम् । ध्याननिर्मथनाभ्यासादेवं पश्येन्निगूढवत् ॥ ( प्रथम अध्याय श्लोक १४ )

## नृसिंहपूर्वतापिन्युपनिषद्

नृसिंहपूर्वतापिन्युपनिषद् व नृसिंहोत्तरतापिन्युपनिषद् ह्यांत मांडुक्योपनिषदांतील मंत्र आहेत. 'नृसिंहा' च्या निरनिराळ्या अंगांना ते मंत्र लावून दाखविले आहेत.

## ध्यानबिंदूपनिषद्

ओंकारप्रभवा देवा ओंकारप्रभवाः स्वराः । ओंकारप्रभवं सर्वं त्रैलोक्यं सचराचरम् ॥ १६ ॥

## योगचूडामण्युपनिषद्

अकारो जाग्रति नेत्रे वर्तते सर्वजन्तुषु । उकारः कण्ठतः स्वप्ने मकारो हृदि सुप्तितः ॥ ७४ ॥

## नादबिंदूपनिषद्

श्रूयते प्रथमाभ्यासे नादो नानाविधो महान् । वर्धमाने तथाभ्यासे श्रूयते सूक्ष्मसूक्ष्मतः ॥ ३३ ॥

अन्तरंगसमुद्रस्य रोधे वेलायतेऽपि वा । ब्रह्मप्रणवसंलग्ननादो ज्योतिर्मयात्मकः ॥ ४६ ॥

टीप—या उपनिषदाप्रमाणेंच अभ्यासाच्या परिणत स्थितींत प्रणव किंवा ॐकार किंवा तत्सदृश असे जीवाला गुंगविणारे आवाज ऐकूं येतात असा आणखी कांहीं उपनिषदांमध्यें उल्लेख आहे.

समाप्त

# श्री. कृ. प्र. खाडिलकरांचीं नाटकें

**संगीत माला**

मेनका—किं. १२ आणे.
द्रौपदी—किंमत १२ आणे.
स्वयंवर—किंमत १२ आणे.
विद्याहरण—किंमत १२ आणे.
मानापमान—किंमत १२आणे.
सावित्री—किंमत १२ आणे
बायकांचें बंड—किं. १२ आ.
त्रिदंडी संन्यास—
किंमत १२ आणे.

**गद्यमाला**

कीचकवध—किं. १ रु.
कांचनगडची मोहना—
किंमत १२ आ.
सवाई माधवराव—
यांचा मृत्यु—किंमत १२ आणे.
भाऊबंदकी—किंमत १२ आणे.
प्रेमध्वज—किंमत १२ आणे.
सत्त्वपरीक्षा—किंमत १२ आणे.
सवती-मत्सर—
किंमत १२ आणे.

सर्व नाटकें सचित्र छापलीं असून संगीत 'बायकांचें बंड' नाटकांतील फोटो सुलोचना संगीत मंडळीच्या नटनटींचे, त्याखेरीज बाकीच्या सर्व संगीत नाटकांतील फोटो गंधर्व नाटक मंडळींतील नटांचे, आणि गद्य नाटकांतील फोटो महाराष्ट्र नाटक मंडळींतील नटांचे आहेत.

पहिलें महायुद्ध (भाग ५) श्री. कृ. प्र. खाडिलकरकृत
पांचहि भागांची किंमत ५। रुपये.

**नवाकाळ ऑफिसमध्यें मिळणारीं पुस्तकें—**

श्री. य. कृ. खाडिलकरकृत कादंबऱ्या:—
संसार शकट, सदानंद, आजकाल; प्रत्येकीं किं. १॥ रु.
श्री. के. रा. पुरोहितकृत:—शून्यजगत्, आकाशपुष्प; प्रत्येकीं किं. २ रु.
श्री. भा. रा. धुरंधरकृत:—९० रुपयांचा चेक किं. १॥ रु.
गीता बोध किं. ६ आणे.

मॅनेजर—नवाकाळ, मुंबई, ४.

आध्यात्मिक ग्रंथमाला

खाडिलकरांचा

# याज्ञवल्क्य-मैत्रेयी संवाद

लवकरच प्रसिद्ध होईल.

आध्यात्मिक ग्रंथमाला

## (१) खाडिलकरांचा रुद्र (२) खाडिलकरांचें संध्यावंदन व पुरुषसूक्त (३) खाडिलकरांचें ऐतरेय आणि ईशावास्योपनिषद (४) खाडिलकरांचें तैत्तिरीयोपनिषद् (५) खाडिलकरांची ॐकाराची उपासना.

श्री. कृष्णाजी प्रभाकर उर्फ काकासाहेब खाडिलकर यांनीं वैदिक वाङ्मयाचें सतत भक्तिपूर्वक मननचिंतन करून वरील ग्रंथ तयार केले आहेत. या पांचहि ग्रंथांत मूळ मंत्र सार्थ व सटीप दिलेले आहेत. वैदिक शिकवण दररोजच्या संसारापासून ब्रह्मप्राप्तीपर्यंत सर्वत्र उपयुक्त कशी आहे याबद्दलचा अभिनव प्रकाश पाडणारीं त्या त्या ग्रंथावरील विस्तृत व तेजस्वी विवेचनें प्रत्येक पुस्तकांत दिलेलीं आहेत. त्यामुळें नित्य पाठांतरासाठीं व अध्ययनमननासाठीं हे ग्रंथ अत्यंत संग्राह्य असे झाले आहेत. किंमत प्रत्येकीं १ रुपया.

ग्रंथ मिळण्याचीं ठिकाणें:—नवाकाळ ऑफिस, मुंबई नं. ४.

चित्रशाळा प्रेस, पुणें, दत्त एजन्सी, बुधवार पेठ, पुणें.